# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख १ माहे नोवेंबर सन १८८० इसवी अंक ४२

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हासील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल

## नोटिसांबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | |
| १० ओळींवर दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्रेजी लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

विद्यमान डिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हा बुलढाणे यांजकडून सर्व लोकांस या जाहिरनाम्यानें कळविण्यांत येतें कीं, मेहेकर तालुक्यांतील लोणारचे तलावांतील खार काढून विकण्याचा मक्ता पांच वर्षांकरितां मेहेरबान डिपुटी कामिशनर साहेब बहादूर जिल्हा बुलढाणे यांचे समोर मेहकर मुक्कामीं तारीख १७ नवंबर सन १८८० इसवी रोजीं १२ वाजतां खालील शर्तींवर हराश होणार आहे.

सदर्हू मक्ता तारीख १ माहे जानेवरी सन १८८१ इसवीपासून पांच वर्षांकरितां हराश होणार आहे. परंतु या मक्त्यांत सरकारास कांहीं फेरफार करणें जरूर वाटल्यास मक्त्याचे हराशीचे तारखेपासून दोन वर्षें पर्यंत कायम राहून नंतर तो मक्ता बंद व्हावा असें सरकारास वाटेल तर त्याबद्दल प्रथम १२ महिने अगाऊ नोटिस दिली जाईल.

मक्तेदार यांणीं सदर्हू मक्त्याचे रकमेचे मानानें योग्य लायक जामीन दिला पाहिजे.

मक्त्याचा पैसा दरमाहाचे दरमहा अगाऊ मक्त्याचे नियमाप्रमाणें दिला पाहिजे.

मक्तेदार लोक मक्ता हराश होण्यापूर्वी जे बोलतील त्यांत जो इसम ज्यास्त बोलेल त्याचे बोलणें मंजूर किंवा नामंजूर करणें हें डिपुटी कमिशनर साहेब यांचे मर्जीवर आहे

सदर्हू मक्त्याचा हराश मेहेरबान कमिशनर साहेब बहादूर यांचे मंजुरीवर अवलंबून होईल कळावे.

| | |
|---|---|
| ता० २८ माहे आक्टोबर सन १८८० इ० मुक्काम देऊळगांव | ए. जे डन्लाप अ. डे कमिशनर बुलढाणें. |

## नोटिस.

नोटिस— बेशमी दत्तवा वल्लद तानबा कुणबी रहाणार मौजे परसोडी बुद्रूक प्रगणे वणी तालुके यवतमाळ यांस आनंदराव नागोराव देशमुख जहागिरदार रहाणार मौजे परसोडी बुद्रूक प्रगणे बेरी रहाणार पारस परगणे व तालुके केळापूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मौजे परसोडी एथील शेतें तुम्हाकडे वहितीस असलेले सर्वे नंबर १-२५-३२-४० या चार शेतांच्या प्रत्येक शेतास पन्नास रुपये प्रमाणें सारा एकंदर रुपये २०० तुम्हांस द्यावे लागतील याजबद्दल तुम्ही आम्हास कबुलायत देऊन नंतर आमचे शेते वहित करावी असाविषयीं लेखी नोटिस ता० ४ माहे मार्च सन १८८० इ. रोजीं ८ दिवसांचे मुदतीची दिली असतां तुम्ही त्याप्रमाणें न करितां सदरील लिहिलेलीं शेते हा सालाकरितां वहित केलीं आहेत करितां सदरील शेतांबद्दल प्रत्येक नंबरास ५० प्रमाणें रुपये २०० देण्याविषयीं आम्हांस देण्याविषयीं तुमची मन्यताच झाली आहे याकरितां या नोटिसीनें तुम्हास असें कळविण्यांत येतें कीं सदरील चार शेतांचे रुपये दोनशें सन १८८०-८१ इसवी सालचे स्वामित्वाबद्दल ता १ माहे जानेवारी सन १८८१ इ० रोजीं आम्हांस देऊन आमचे सहीची पावती घ्यावी याप्रमाणें तुम्हाकडून न झाल्यास या नोटिशीचे खर्चासुद्धां फिर्याद करून सदरील रुपये कोर्ट मार्फत घेण्यांत येतील. कळावे तारीख २५ माहे आक्टोबर सन १८८० इसवी.

(सही) आनंदराव नागोराव देशमुख पाटील मौजे परसोडी

दस्तुर गणपतराव नागोराव

## नोटिस.

गणाई जवजे विठोबा वल्लद माळी राहणार मौजे आकोली जहागिरदार तालुके अकोट इजला खली सही करणार विठोबा वल्लद चिंधाजी वल्लद माळी राहणार कसबे परगणे व तालुके आकोले याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तू माझी लग्नाची बायको असून दाहा वर्षें पर्यंत माझे घरीं होतीस आणि दाहा महिने झाले माझे घरीं रहात नाहीं पळून जातीस सबब नोटिसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटिस पावल्यापासून पंधरा दिवसांत माझे घरीं येऊन संसार करण्यास लागावे नाहींपक्षीं तुजवर लग्नाचे पैशाचा हक्क सह सावकी रुपयाबद्दल दिवाणीत फिर्याद करून नोटिसीचे खर्चासुद्धां सर्व पैसा भरून घेण्यांत येईल कळावे तारीख २४ माहे आक्टोबर सन १८८० इसवी

(सही) विठोबा वल्लद चिंधाजी माळी कसबे परगणे निशाणी हुद

## नोटिस

दगडाजी वल्लद लक्ष्मणजी वायकर माळी रहाणार कसबे अकोट यांस विठोबा वल्लद गनाजी गनूरकार माळी रहाणार अकोट याजकडून असें कळविण्यांत येतें कीं, माझी मुलगी नामे मनी ही तुमची लग्नाची बायको असून ती अज्ञान होती तेथपर्यंत तुम्ही तिची वागणूक केली हल्लीं ती दाहा वर्षें झाले शहाणी झाली असून तेव्हांपासून ती माझे घरीं आहे मध्यंतरीं पंचाचे म्हणण्यावरून दोन तीन वेळां तुमचे घरीं आणून घातले परंतु तिजला तुम्ही न वागवितां माझे घरीं पाठवून दिली असतां तुम्हांस नोटिस देण्यांत येते कीं, माझे मुलीस तुमचेकडून नांदविणे जात नाहीं याजकरितां हा नोटिस पावल्याचे तारखे पासून १५ दिवसांचे आंत तिजबद्दल फारकती व दाहा वर्षें माझे घरीं राहून निर्वाह केला त्याजबद्दल खर्च आंत द्यावे त्याप्रमाणे न झाल्यास अखेरीस मार्गें निकाल करून घेतल्या जाईल तेणेंकरून न कोर्टखर्च तुम्हावर बसेल व या नोटिसीचा खर्च तुम्हापासून घेतला जाईल. कळावे. तारीख २३ माहे आक्टोबर सन १८८० इसवी.

(सही) विठोबा वल्लद गणाजी गनूरकार माळी रहाणार अकोट.

## पत्रव्यवहार.

या सदरा खालीं मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मुक्काम भंडारा प्रांत नागपूर (मित्राकडून)

ह्या महिन्यांत मी सुमार ३०० कोसांचा प्रवास केला मागील महिन्यांत चहुंकडे अति वृष्टीची हाहाकार होती. परंतु हल्लीं वर्षाकडे दिसत नाहीं. व पिकेंही उत्तम आहेत. एकंदरीनें पाऊस चालू सालीं कमीच आहे.

भांडारा हे नागपूर इलाख्यांतील जिल्ह्याचें ठाणें आहे, परंतु रमणीय नाहीं. नागपुरापेक्षां एथें रीत भात बोलणें, ह्यांत बराच फरक आहे. सर्वांत मोठें उत्पन्न तांदुळ, त्याचा इतर प्रांताशीं व्यापार चालतो. मिडल क्लास स्कूल तेथील हेड मास्तरास पगार १०० रुपये आहे. लोअर क्लास स्कूल व मलीची शाळा त्याचेवर शिक्षक बायको दरमहा ४० रुपयावर आहे. सार्वजनिक लोकांची लायब्ररी आहे तिचे स्थिति उत्तम असून पत्रेंही वाचण्यास येत असतात. पोष्ट आफिसचे मास्तर हे सदा आगमीत असल्यामुळे हल्लाखोर लोक फार बेपर्वाईने वागतात तेणेंकरून बहुतेक लोकांस त्रास सोसावा लागतो तो हाहाकार पुरे कठीण. एथील सरकारी मंडळीचा जमाव उत्तम दिसतो.

पोलिस खात्याच हल्लीं असलेले सुपरिंटेंडेंट साहेब हे आल्या दिवसापासून खात्याची चांगली सुधारणा झाली आहे त्यांणीं आपल्या खात्यांत विद्वान मंडळी बरीच जमविली आहे. यांस मेहनती व चिरकाल असेल म्हणून पाहिजे ते त्यांस मेहनती असून लोकांस त्यांचे कडून चांगला न्याय मिळतो. उर्यांची सुकतानीं झाली असेल तो अन्याय म्हणल, परंतु हे त्यांचे म्हणणें रास्त नाहीं त्यांचे पोटी दया, ज्ञान, सदा घण हे गुण चांगले अवगत आहेत.

ता. २० मिनहू रोजीं मे० नीळ साहेब बहादूर किरमत कमिशनर हे रोशनाकरितां येणार आहेत तारीचा आजार जारी आहे. धान्याचा भाव दर रुपयास शेर तांदुळ १८ गहू १८, दाळ १६, तुप १२ रुपये मण आहे कळावे लोक अभाव ही विनंती ता. २० माहे अक्टोबर सन १८८० इ.

एक फिरस्ता क्ष.

## हायर व लोअर परिक्षेचे प्रश्न.

दिवाणी संबंधी.

१ जमीनींतील कांहीं पिकें काढण्याविषयीं हुकूमनाम्यांत ठराव केला आहे. पण हे हिस्से ५ एकरांहून कमी आहेत तर त्या हुकूमनाम्याची अमलबारी कोर्टानें कशी करावी.

२ दिवाणी दाव्यांत पुराव्यासाठीं दस्तऐवज हजर करण्याविषयीं काय तजवीज केली पाहिजे? अशा प्रकारचे दस्तऐवज कोर्टानें कोणत्या शर्तीवर दाखल करून घ्यावे? आणि ते दस्तऐवज प्रोसिडिंगांत दाखल करण्यापूर्वी काय तजवीज केली पाहिजे; जर एकादा दस्तऐवज दुकानांतील वहीचा उतारा असेल तर तो दाखल करून घेण्याविषयीं काय नियम आहेत?

३ अ याजला ब चे १०० रुपये, क चे ५०० रुपये, व ड चे १००० रुपये देणें आहेत व त्याजपाशीं १००० रुपयांची जिनगी आहे. ब आणि क यांनीं आपले पैशाबद्दल याजवर हुकूमनामे मिळवून त्यांची बजावणी होण्यासाठीं दरखास्ती दिल्या. हे हुकूमनामे मिळविल्याबद्दल व दरखास्ती दाखल झाल्याबद्दल पूर्ण माहिती असतां ब आणि क यांजला पैसा मिळूं नये म्हणोन ड याचें देणें आहे त्याजबद्दल अ आपले असलेले जिनगीचें ड याजला परोक्ष खत लिहून देतो व तो दस्तऐवज ड मान्य करितो तर हें विक्रीखत मान्य आहे कीं काय?

४ न्यायास कोणते दावे दाखल करितां येत नाहींत त्यांचीं नांवें सांगा. न्यायांत अपील केलें असतां स्पेशियल अपिलांतील शेवटचा फैसला होईपर्यंत विशेष तजवीज काय केली पाहिजे?

५ रेजिस्ट्रार यानें दस्तैवज रजिस्टर करण्यास नाकारिलें असतां काय तजवीज केली पाहिजे हें थोडक्यांत सांगा.

६ खालीं लिहिलेले दस्तैवजास कोणकोणते स्टांप पाहिजेत?

(१) अ पासून १०० रुपये घेतले.

(२) आपले मुलीचे लग्नासाठीं अ पासून १०० रुपये घेतले.

(३) साहा महिन्यांत फेड करीन म्हणून अ पासून १०० रुपये घेतले.

(४) व्याजासुद्धां फेड करीन म्हणून अ पासून १०० रुपये घेतले.

( अ ) अ नें ब याजला सांधे कागदाव र १००० रुपयांची पावती लिहू न दिली. अ पैसा घेतल्याचें नाकारतो. तर पैसा दिल्यांचे शाबिदी साठीं ही पावती ब याजला दाखलें करतां येईल काय? दावा दाखल करण्यापूर्वीं जर तिजवर स्टांप लावला तर ती पावती कोर्ट दाखल करून घेईल किंवा कसें? दावा दाखल झाल्यावर तिला स्टांप मारण्याविषयीं कोर्ट परवानगी देऊं शकतें किंवा कसें ?

७ अ हा अल्पवयी असतां विशेष करार पुरा करण्याविषयीं दावा करण्याचा हक्क त्यास प्राप्त होतो. व हा हक्क प्राप्त झाल्यानंतर दोन वर्षांनीं तो वयांत येतो, तर वयांत आल्यानंतर कोणत्या मुदतींत अ नें दावा करावा? वयांत आल्यानंतर अ लागलाच मरण पावतो तर त्याचे वारच्या मनुष्यानें कोणत्या मुदतींत दावा करावा? खालीं लिहिलेल्या दाव्यासाठीं काय मुदती आहेत. आणि प्रत्येक मुदत कोणते वेळेपासून चालू होते.?

१ अग्रक्रियाधिकार अमलांत आणण्या विषयीं.

२ लग्नसंबंधाचे हक्क परत मिळविण्याविषयीं

३ कपट केल्यामुळें दाद मागण्याविषयीं

४ रजिस्टर करून दिलेले लेखावरून करार अमलांत आणण्याविषयीं

५ मुसलमान जातीचे विधवेस अन्नवस्त्र मिळण्याविषयीं.

८ एकीं मिलाफ्यानें आपल्या मिलाफ्याविरुद्ध कांहीं कृत्य केलें असतां अथवा जबानी दिली असतां त्याजबद्दल कायद्यांत काय सांगितलें आहे?

९ प्रतिबंध ह्मणजे काय?

१० ज्या वस्तु मृत्युपत्रावरून दिल्या आहेत त्यांजविषयीं मृत्युपत्रावरून देणाराचा हक्क पुरा करून घेण्या साठीं कोणी काय करावें ?

११ वार्षिक नेमणूक बक्षीस केली आहे व शिलक असलेली जिनगी बक्षीस केलेली आहे तर त्यांपैकीं प्रथमचा हक्क कोणास प्राप्त होतो ?

१२ ज्यास जिनगी मिळाली आहे त्याजपासून सावकारानें पैसा परत मिळविण्याबद्दल कोणती मुदत आहे ?

फौजदारी.

१ सदोष मनुष्यवध खून केव्हां होतो?

२ मनुष्यवध याचे निरनिराळे प्रकार सांगा.

३ चोरीची व्याख्या सांगा. चोरी ही जबरीची चोरी, जुलमानें घेणें, व डाका केव्हां होईल ?

४ अपक्रियेची व्याख्या सांगा.

५ ठकबाजी ह्मणजे काय ? वेष घेऊन ठकबाजी ह्मणजे काय ?

६ मारामारी व गर्दी यांत काय फरक आहे ? त्यांचीं उदाहरणें द्या.

७ अ हा कपटानें शिपायाचा पोशाग करून माल मिळकत मिळवितो तर त्याजवर कोणता गुन्हा शाबीद होईल.

८ आरोपीस आपला बचाव करण्याचे काय काय हक्क आहेत?

९ धरलेले मनुष्यास माजिस्त्रेटासमोर नेण्यास पोलिसानें काय तजवीज करावी? आणि ज्यावेळेस पोलिस आफिसर अपले हाताखालचे मनुष्यास वारंटावाचून धरण्या करितां नेमितो त्यावेळेस त्यानें काय तजवीज केली पाहिजे.

१० इं० पि० कोडातील कोण कोणते अपराधाविषयीं साधारण सर्व लोकांनीं खबर दिली पाहिजे.?

११ माजिस्त्रेट व पोलिस यांस सर्व लोकांनीं कोणत्या प्रसंगीं मदत करणें भाग आहे ? आणी समजून-उमजून असें त्यानीं वर्जिल्यास कोणते शिक्षेस ते पात्र होतील ?

१२ दंड न दिल्यास कैदेची शिक्षा द्यावी याविषयीं काय नियम आहेत ?

१३ आरोपी मनुष्यास माफी देण्याविषयीं कायद्यांत काय नियम आहत ?

१४ शरीराचा व मालाचे संबंधी बचाव करण्याचा काय हक्क आहे ? व तो हक्क अपखुशीनें मरणास कारण होण्यास केव्हां वाढवितां येतो ?

१५ कैदेची आणी फटक्याची शिक्षा कोणते प्रसंगीं ठरवितां येते? आणी फटक्याची शिक्षा अमलांत आणण्याविषयीं काय नियम आहेत ?

१६ अ आणि ब यांचा समाईक एक घोडा आहे. तो ब च्या ताब्यांतून घेऊन बला अन्यायानें नुकसानी करण्यासाठीं अ त्या घोड्यास गोळी मारितो तर तो कोणता गुन्हा होईल? जर अ त्या घोड्यास गोळी न घालतां विकील आणि उत्पन्न झालेला पैसा आपले नांवें जमा करील तर हा कोणता गुन्हा होईल ? व अ हा या प्रत्येक गुन्ह्यांत कोणते शिक्षेस पात्र होईल?

१७ पोलिसांनें क्रि. प्रो. चें कलम ११७ प्रमाणें तपास करण्याची गरज नाहीं असा रिपोर्ट केला व माजिस्त्रेटाचें मत निराळें असून त्यास असें वाटलें कीं या बाबदींत पोलिसाची गैरसमजूत झाली आहे तर अधिकार असलेले माजिस्त्रेटानें काय तजवीज केली पाहिजे. !

१८ ( अ ) फिर्याद परभारें दाखल झाली असतां,

( ब ) जर पुढें काम चालविण्यास पुरतें कारण नाहीं असें वाटेल तर,

( क ) जर फिर्यादीच्या खरेपणाचा भरवसा मानण्यास कांहीं कारण न दिसेल तर,

इतक्या गोष्टींस माजिस्त्रेटानें काय तजवीज करावी ?

---

## वऱ्हाडसमाचार.

मिति आश्विन वद्य १४ शके १८०२

## हिंदुस्थानांतलि रेलवे

या विषयींची माहिती विलायतेस वार्षिक सभा भरल्यावेळीं प्रसिद्ध झाली आहे तींतील सारांश आह्मी आपले वाचकांकरितां लिहितो.

हिंदुस्थानांत एकंदर ८६११ मैल रेलवे तयार असून त्याजवर आगगाड्या चालू आहेत. यांपैकीं ६०७३ मैल रेलवे कंपन्यांचा आहे, २३६३ मैल सरकारचा आहे, व १७५ मैल नेटिव संस्थानिकांचा आहे. गेल्या वर्षीं ३९५ मैल रेलवे तयार झाला. कंदाहाराकडे रेलवेचें काम चालू आहे, पंजाब रेलवे पेशावरपर्यंत व्हावयाचा असून अटक जवळ सिंधू नदीला पूल होत आहे. मुंबईहून दिल्लीला अजमिराकडून जाण्याकरितां मधला फाटा तयार होत आहे तो या वर्षीं होईल. मग रजपुताना स्टेट रेलवे एकंदरच्या प्रवासाला सोईचीं होईल. पालनपुरापासून अमदाबादेपर्यंत ८२ मैल मात्र अरुंद रेलवे आहे. अजमीरचा दुसरा फांटा इंदुराकडे येत आहे तो पुढील वर्षीं पुरा होईल. अयोध्या रोहिलखंड कंपनी काशीस भागीरथीवर पूल करीत आहे. त्याची सुरुवात लवकरच होईल.

सन १८७९ सालांत हिंदुस्थानांतील सर्व रेलवे कंपन्यास ५,३७,२५,९६० रुपयांचें निव्वळ उत्पन्न झालें. ज्या रेलवे कंपन्यांस भांडवलास व्याज देण्याची सरकारानें हमी पतकरलेली आहे त्यांना गेल्या सालांत त्यांचें व्याज मिळून वर ३१,१९,५५० रुपये फायदा झाला. स्टेट रेलवेला निव्वळ उत्पन्न ३१,०४,०८० रुपये झाले. मागच्या सालीं फक्त १० लक्ष झालें होते; कंपन्यांचे रेलवेस एकंदर जमा ९८६५२८४० रुपये झाली व खर्च ४,७०,३०,९६० रुपये झाला. स्टेटरेलवेला जमा १,१६,९८,२४० रुपये झाली व खर्च १,१५,९४,१६० रुपये झाला.

रेलवेकडे भांडवल खर्चीं पडलें तें १,२३,१२,४५,१४० रुपये. यापैकीं स्टेट रेलवेकडे २४,४०,२७,९७० रुपये, व नेटिवसंस्थानांतील रेलवेकडे १३९२८६६० रुपये आहे.

आगगाडींतून गेल्या सालांत बसणारांची संख्या ४,३१,४४,४६८ झाली. आगगाडींत बसणारांचें प्रमाण पहिला क्लास शेकडा .॥, दुसरा क्लास २, व तिसरा क्लास ९७॥ असें आहे.

आगगाडींतून गेल्या सालांत माल ७८,७६,७६६ टन आला गेला. व त्याबद्दल ७,२४,८७,५२० रुपये मिळाले. रेलवेच्या संरक्षणाकडे १,४६,३५,५०० रुपये लागले व कामाकडे ४,३१,०९,६०० रुपये लागले. या हिंदुस्थानांत रेलवेकडे वाफेच्या गाड्या ( एंजिन्स ) १८५० आहेत, प्यासेंजरच्या गाड्या ४२९४ आहेत व ट्रूक्स ह्मणजे मालाच्या गाड्या ३४,८५१ आहेत.

रेलवे करितां विलायतेहून या सालांत १,५७,८४,०४० रुपयांचा माल आला. आगगाड्यांनां या सालांत ५,१२,८५८ टन कोळसे लागले. त्यांतून ३,६२,७६२ टन हिंदुस्थानांतून घेतले. व बाकीचे विलायतेहून विकत आणिले. कोळशाकरितां ११२५८९० रुपये खर्च झाला.

रेलवेवर १,४८,७२० मनुष्यें नोकर आहेत, युरोपियन ३७८१, ईस्ट इंडियन ३४८१ व बाकी इकडील लोक आहेत.

गेल्या सालांत कित्येक अपघात झाले. मद्रास रेलवेवर एक मोठा अपघात होऊन २२ मनुष्यें मेली व ४६ जखमी झाली. व राजपूत रेलवेवर एक अपघात होऊन ९ मनुष्यें मेलीं. हे दोन्ही नाइलाजाचे प्रसंग, या शिवाय निष्काळजीनें व वाईट वागणुकीनें १८ मनुष्यें मेलीं व ६७ जखमी झालीं.

This week has been very fruitful in accidents, and was ushered in first at the races. The races took place on the morning of the 26th of October at Malkapur a small village near Akola attended by a large number of upper and middle classes of Europeans as well as by a horde of natives of all grades. There was a grand stand erected for the elite, while the middle class of Europeans & natives were left to their own devices to shelter themselve. The race course was marked off with a fencing of rope (if fencing it may be called) against which the multitude thronged like bees and after two races for the officers, a race for natives was allowed. There were some fine mares among them in the last one; a spirited animal, the winner of the first prize, after passing the winning post was reined in, but regardless of the rider's endeavours, the animal pushed against the rope fencing and jammed a number of people resulting in one individual having his lip cut in twain, another having his finger smashed. this prelude was terminated by the mare dashing against the tonga of Mr. Jones the Head Clerk of the Judicial Commissioner's Office, in which were his wife and child. The mare hit against Mrs. Jones and hurt the poor lady in the face. Immediately after, the Deccan Derby was run, and one of the horses racing left the race course and ran headlong into the crowd which separated wildly to leave room for the horse but this was not unattended with injury, for a Patel had his calf (of his leg) cut. In other respects the races passed off very well.

---

On the 27th there was a cricket match played at Akola between the East and West. The East went in and scored a fine score of 184. Mr. Nicholetts and Revd Haden having made 58 & 50 respectively. The west had no opportunity of going in for their innings, it was therefore deferred till the 29th. After the cricket match Dr. Little with a few officers was driving in a carriage, which just as it was passing the gateway of the fencing, hit against the iron post of the gateway and upset. Dr. Little and the rest, beyond the shock of the fall, suffered no injury.

---

Dr. Hume had one of his fingers bit off by a horse, and his right hand is now carried in a sling.

---

The afternoon of the 27th October was spent by the officers of Akola on the esplanade where a large number of pigeons were collected, and the interest of the sport was (to those of our uninitiated readers we may as well explain) in shooting at a pigeon just as it escaped from one of the

traps. There were 5 traps placed about 8 feet apart and to each trap was attached a rope about 20 feet long held by one person, each trap contained a live pigeon. A sportsman placing himself about 20 feet from the traps watched to see which of the traps will be pulled open and it is the object of the man holding the ropes to dodge the sportsman and to pull a trap in the direction opposite to which the sportsman's attention is directed. Every time a trap is opend and a pigeon escapes or is killed, another live pigeon is immediately replaced. Mr. Nicholetts and Mr. wright made a very fair score.

On the night of the 27th October there was a fancy ball given at the Judicial Commissioner's Court house at Akola The building was very prettily decorated by Mr. Law whose exquisite good taste for decorations is admitted.

The ladies and gentlemen came in all manner of costumes, the main part of the ladies having French and Spanish costumes. One lady was in a queen's dress, while another was in that of a flower maid &c &c. The dresses were very varied and picturesque. Amongst the gentlemen were seen the costumes of a French Marquis, a Mogul, a Scotch Highlander, sailors, a General, a Parsee &c. The dance was over by 4 A. M. the following morning.

On the afternoon of the 28th October races were again renewed at Mulkapur and precautions were taken to prevent any accidents and for this arrangement Major Gunthorpe District Superintendent of Police is deserving of praise, ably carried out by Mr. Savielle the Inspector of Police. An incident occurred at the race course which was immeasurably amusing and one which the Police were unable to check till the last minute. A mendicant in ragged attire riding a half dead Yaboo, by some means endeavoured to fall in with the racers and as the animal was a mere skeleton it could not of course keep up with the spirited animals engaged in the equine contest. It, as a matter of fact, jogged along behind the racers, and the mean attire and ridiculous look of the mendicant clad in such cloth and ashes coupled with the emaciated look of the "tat" caused very great merriment, but before he could finish his race the Police had him in hand, and ordered him off the ground.

Another dance came off on the night of the 28th October, the band of the 5th Regiment Hyderabad Contingent having been in attendance.

The cricket match of the 27th October was continued on the 29th at Akola The West went in and scored 87 runs. The East, of course, beat the West by 97 runs in the first innings. The West were therefore permitted to begin the 2nd innings and Dr. Little and Mr. Reid began and played till the wickets were drawn making a splendid score of 119 runs between them both and not out. As the match is not to be played out it has been a drawn game. Although the West may have had the chance of beating the East had the match continued yet the East takes the credit of the beat on the result of the first inning.

To The Editor, Berar Samachar

Sir, Allow me to make a few suggesions through the medium of your widely circulated Journal regarding registration of letters containing Currency Notes.

Few people are acquainted with the Government of India's Order, making it now compulsory to register letters containing whole or portions of Government Currency Notes, and also of the orders issued to all the Currency Offices in India, not to communicate with the losers of half &c. notes [unless they appear in person or prosecute their claims through their agents] who have knowingly disregarded the rule of registration. This would encourage the unscrupulous [if any] menials in the Postal service as well as household domestic servants to abstract notes from unregistered covers and to destroy such letters. But I gather from the number of publications of whole and partial notes in the Government gazettes, appearing every week, and also from various claims that have been preferred to the respective Currency Offices, that very few people are aware of the compulsory registration of letters containing currency notes and why? Because the announcement of registration has been made through the medium of Government Gazettes and a couple of English Calenders. But this, I presume, is not quite sufficient for every one to know that compulsory registration is in force. It is necessary to insert in almost every Local as well as Government paper of such places where Currency Offices are established.

I have, of course, reason to believe that people, other than the educated class, are always in the habit of sending notes in unregistered covers, to save a few annas of the registration charges, and then to incur various other expenses to recover the value of such notes from the Currency Offices; many send notes in unpaid covers also, which surely paves a way of temptation to carriers and servants to abstract the contents of such letters and destroy them. Many a time the household servants, while taking such letters to the post, abstract the contents and destroy the letters and then deceive their masters by lulling them into a sense of security.

To remedy these evils it is necessary that Government should adopt a course calculated to make compulsory registration widely known; the educated class of people should think it a duty to put their ignorant brethren in the way of preventing loss by means of the post by resorting to registration.

Akola 24th October 1880 } K. M. Tata.

We cordially approve of our Correspondent's assertion, and if the course above alluded to, be adopted, we are confident, there will be very few complaints made of the loss of letters containing whole or partial notes. Ed. B. S.

## वऱ्हाड.

हवा या आठवड्यांत निरभ्र आहे. पहाटे थंडी पडते. दोन प्रहरीं कडक ऊन पडून ऊष्मा होतो. व रात्रीं शरदृतूचें चांदणें पडतें. गेल्या आठवड्यांतील ऐन वेळावर आलेल्या पावसाचा पिकास चांगला उपयोग झाला असें ह्मणतात.

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनेल इन्स्पेक्टर गुरुवारीं उमरावतीच्या हाय स्कूल परिक्षेस गेले. महिनाभर त्यांचा एक पाय दुखत असून शेवटीं त्यास फोड होऊन फुटला. आतां प्रकृती बरी आहे.

रा. रा. रामराव गोविंद मूर्तिजापुरचे व रा. रा. केशव महिपत अडगावचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर साहेब लोकांस भेटण्याकरितां या आठवड्यांत एथें आले होते. व रा. रा. गोपाळराव महादेव भिडे वाशिमचे क्लार्क आफ धि कोर्ट डिपुटी कमिशनर साहेबावरोबर या आठवड्यांत एथें आले होते.

मि० शाबासखान तहशिलदार मराठी भाषेच्या परीक्षेस आले होते. सोमवारीं त्यांची परीक्षा झाली. ते पुन्हा वाशिमास गेले आहेत. या आठवड्यांत बाळापुरास येतील.

रा. रा परशराम गणेश एथील डिपुटी कमिशनर आफिसांतील ९० रुपयांचे कारकून यांस अडगावास शिरस्तेदार नेमणार असे वर्तमान आहे. तसें झालें ह्मणजे रा. रा नरसो यशवंत आपले पूर्व स्थळास येतील. अडगावची जागा ७९ रुपयाची आहे ती तशीच तूर्त ठेवणार असेंही समजतें.

रा. रा. गणेश बापुजी उमरावतीचे डिपुटी क्लार्क यांस एथें जुडिशियल कमिशनर आफिसांत डिपुटी क्लार्क नेमिलें. त्यांस ७० रुपये पगार होता तो ७९ झाला. ते रजेवर असून परिक्षेस आले होते. व दिपवाळीकरितां वाशिमास घरीं गेले आहेत. या आठवड्यांत एथें येऊन आपले कामावर रुजू होतील.

कर्नल बुशबी साहेब जुडीशियल कमिशनर यांची स्वारी ४ थे तारखेस शिगावें खामगावाकडे फिरावयास जाणार. कर्नल बेल साहेब कमिशनर तूर्त बाहेर जात नाहींत.

हायर व लोअर स्टांडर्डच्या परीक्षा बुधवारीं संपल्या. सोमवारीं फौजदारी, मंगळवारीं दिवाणी व बुधवारीं मुलकी प्रश्न दिले होते. परीक्षेस आलेली मंडळी सर्व परत गेली.

एथें मंगळवारीं सकाळीं, गुरुवारीं सायंकाळीं, व शनिवारीं सकाळीं घोड्यांच्या शर्यती झाल्या. प्रत्येक वेळीं सारा गाव पहाण्यास लोटत असे. मधल्या दिवशीं दुसरे खेळ झाले. बुधवारीं मोठा बाल झाला. बहुत युरोपियन स्त्रिया पुरुष एथें या आनंदोत्साहाकरितां आलेले आहेत.

मि० अबदुल हक्क साहेब असिस्टंट कमिशनर रजेवर असून निजाम सरकारांत पोलिस सुपरिटेंडेंटचें काम करीत होते त्यांची स्वारी पुन्हा वऱ्हाडांत परत येत आहे असें कळतें. कारण काय असावें बरें!

कर्नल टर्टन साहेबांचें भरलेलें पिस्तुल होतें तें त्यांच्या नोकरानें न समजून हातीं घेऊन त्याचा चाप दाबला तो अवाज होऊन गोळी त्याच्या खांद्यावरून मानेंत शिरून तो तत्काळ मरण पावला.

## वर्तमानसार.

अमीर अबदुल रहमान मरण पावल्याचें पुन्हा लंडनकडून तारेंतून वर्तमान आलें आहे पण तें खोटें आहे असें कळतें.

प्रतापी वासुदेव बळवंत फडके कैदेंतून बेडी तोडून व दरवाज्याची बिजागरी उखळून जेलांतून पळून गेले होते. त्यांना पुन्हा एका स्वारानें पकडलें. त्याच्या सुटकेस कोणाची मदत होती असा संशय आहे.

हैदराबाद– मद्रास रेल्वेचे मुशाफरींत मि० के साहेब यांनीं एका युरोपियनावर असाल्टचा मुकदमा चालवून नुकसानीबद्दल २९ रु. मिळविले होते. त्या के साहेबावर अब्रू घेतल्याबद्दलची फिर्याद रेसिडेन्सी बाजारचे सुपरिटेंडेंट साहेबाचे समोर रा. रा. रामचंद्र पीलें वकील यानीं चालविली आहे. आरोपी यानें वकील मजकूर यास सिकंदराबाद एथील एका घराचे लिलाव वगैरे करण्याचे बाबदींत एक पत्र लिहिलें होते त्यांत "तुमची सनद हरण करून तुह्मास माफ मागण्यास लावीन" असे प्रकारचे शब्द लिहिले आहेत व त्यावरून फिर्याद दाखल झाली आहे. न्यायाधीश फार लोकप्रिय व अनुभविक असून चांगले न्यायी आहेत. तेव्हां ते न्यायच करितील.

शहरात नवीन दिवाण नेमण्याचा विचार चालू आहे. त्यांत मि० रंगाचार्ले यांचें व मि. कृष्णमूर्ती बी ए बी. एल. यांचें नांव पुढें आलें आहे.

गव्हरनर साहेबांनीं पुण्यात आपल्या प्रमुख कायदेकार मंडळीतर्फे आपल्या चेहऱ्यास कळविल्या असें समजतें.

जपानांतील कित्येक प्रांतांत महापुरांनीं नुकसान झालें आणि कित्येक प्रांतांत कसर पतंगामुळें भाताच्या पिकाचें अतिशय नुकसान झालें, तांदुळाचा भाव अतिशय वाढल्यामुळें गोर गरीब विपत्तींत आहेत आणि देशांत चोऱ्या मारामाऱ्या दंगे धोपे इत्यादिक गुन्ह्यांची संख्या वाढली आहे असें जपान हेरल्डावरून मुं ग्या. कर्ते लिहितात.

आफ्रिकेंतील भागांत सामान नेणाऱ्या जनावरांचा अतिशय नाश होऊन उंट, बैल व तट्टें यांच्या टांग्यांनीं किल्ला अवघड आणि केवळ पांजवळील रस्ता आहे भरून गेली आहे असें समजतें. ह्या ठिकाणीं चालत्या बोल्या व स्वतंत्र अशा हवेनें मारलेल्या प्राण्यांची कत्तल उडली त्या ठिकाणीं मुकाम व परतंत्र जनावरांचे शिरस्ते कय!

प्रथम राष्ट्रांचे मागर्न कुल कारणापेक्षां आपण गादी सोडून देऊं असें सुलतानानें प्रसिद्ध केल्याचं कलवितो. ह्या ता. ९ अक्टोबरच्या तारेवरून समजतें. ने. ओ

## सुत्रधार.

भाग पहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अप्रसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहार, राजनिती करून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषाशीं व्यवहारांत समयविशेषीं कसें वागावें व बोलावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखें आहे हा ग्रंथ जाड कागदावर शिळाछापानें छापून विकत तयार आहे किंमत ४॥० आणे टपाल खर्च ४८६ आम्हाकडे पत्र पाठविल्यास पुस्तक ताबडतोब रवाना केलें जाईल. कळावें ता. २६ अक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

## न्यायसार.

( नवीन मासिक पुस्तक. )

हें उमरावतीत प्रसिद्धीस छापखान्यांत छापत असते यांत इंडियन लॉ रिपोर्टांतील दिवाणी, फौजदारी, धर्मशास्त्र, कर, प्रमाणशास्त्र, करारशास्त्र व स्टांप, नोंदणी, मृत वगैरे प्रकरणाबद्दल निवाड्यांचें सार दिलेलें असते व वऱ्हाडांतील सदरहू वगैरे हमेश छापत असतात. याची सालीना किंमत डाक हांशिल्यासह ४८६ आहे. फुटकळ अंकास आठ आणे.

यंताजी गोविंद नकील.

## गारुडी विद्या.

अथवा.

गारुडयांच्या जादूचे मनोरंजक खेळ.

किलेक धूर्त व ठक लोक कांहीं युक्तीच्या साधनानें अनेक प्रकारचे चमत्कार करून लोकांत ठकवितात यासर्तीं अशा लोकांच्या कृति व कावेबाजीचें ज्ञान सर्व लोकांना व्हावें या हेतूनें आम्ही वरील नांवाचें पुस्तक तयार केलें आहे त्यांत युरोपियन तमाशगीर व एतद्देशीय जादूगार, मांत्रिक, टेवड्या, पंचाक्षरी, इल्मी, वैदू, भानामती, गारुडी, भुतें, इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असलेले धूर्त, ठक व ढोंगी लोक, आणि जादू, भूत, प्रेत, पऱ्या, जीन, वेताळ, वीर, यांच्या नांवानें पाहिजे तें करूं शकतों असें सांगून गूढ शक्ति, हातचलाखी, लोहचुंबक शक्ति, विद्युद्योग, रसायनप्रयोग आणि वनस्पतींचे चमत्कारिक गुण इत्यादिकांच्या साधनानें अनेक प्रकारचे चमत्कार करून लोकांस कसकसे ठकवितात याचें कारणासह रीतीनें निरूपण केलें आहे. ह्यांतील पृथक लागणारीं चित्रें व आकृतीही जागजागीं घातल्या आहेत. याची किंमत ॥ मेंबर असेर देणारांस फक्त १ रुपया व मागाहून १॥ रुपया पडेल. आगाऊ वर्गणी देणारांचीं नांवें पुस्तकांत छापली जातील. किंमत वगैरे देणें पाठविणें तो पुस्तककर्त्याकडे खालीं लिहिलेल्या ठिकाणीं पाठवावा. पुस्तकें नोवेंबर माहिन्यांत छापून तयार होतील. बाहेर गांवच्या लोकांस ट. ख बद्दल २ आणे जास्त पडतील.— ता. २० आगष्ट १८८० इ.

गोविंद मोरोबा कार्लेकर.

पत्ता — नळावर पंचमुखी मारुतीची, गल्ली घर नंबर २६ मुंबई.

## हुन्नरसंग्रह.

( मासिक पुस्तक )

चालू आगष्ट महिन्यापासून आम्हीं हें दर्हें पुस्तक काढण्याची सुरवात केली आहे त्यांत ह्या देशांत व परदेशांत चालणारे अनेक प्रकारचे धंदे, रोजगार, विद्या व कला कौशल्यें यांसंबंधी अनेक प्रकारच्या युक्ति, कल्पना व हुन्नर यांचा संग्रह होत जाईल.

त्यांत बागाइत व शेती, सुगंधी व अत्तरी, रंगारी, वैद्यकी, पाकशास्त्र, कुंभारकाम, कांचकाम, धातूकाम, दारूकाम इत्यादि कामांसंबंधीं अनेक प्रकारचे उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, कोणत्याही पदार्थावरील सर्व प्रकारचे डाग काढण्याच्या युक्ति, उपद्रवकारक प्राण्यांचा नाश करण्याचे उपाय, लवकर नासणारे पदार्थ पुष्कळ दिवस जसेच्या तसे टिकविण्याच्या युक्ति; कोणत्याही पदार्थावर पाहिजे त्या धातूचा मुलामा चढविण्याच्या कृति; फाटलेले पदार्थ सांधण्याच्या रीती लुकणें, सरस, धोंडे व औषधें इत्यादि तेलें व अर्क अनेक प्रकारच्या मद्या व रंगीत शाई, आगकाड्या, साबू, मेणबत्त्या, बाण, सरबतें, वार्निशें, टर्पेनटाइन, निकलेटिक, कोल्डक्रीम, पोमेटम, फ्रेंचपालिश, सिंदूर, एसेन्स आसिड, कोल्डवाटर इत्यादि सर्वोपयोगी उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृती, आणि सांकेतिकभाषा, कूटगणित, कूटकविता, कूटप्रश्न आणि अंकचमत्कार यांचा संग्रह होत जाईल.

याची किंमत आगाऊ एक वर्षाची २ पोस्ट ट. ख. ६ आणे, किंमत पाठविणें तो मनीआर्डर करून पुस्तककर्त्याकडे पाठवावी. प्रत्येक अंक डेमी अष्टपत्री ४० पृष्ठांचा निघतो आगाऊ वर्गणी आल्याखेरीज पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं. ता. २० आगष्ट सन १८८० इसवी.

गोविंद मोरोबा कार्लेकर,

हुन्नरसंग्रहकर्ते.

पत्ता - नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली, घर नंबर २६ मुंबई.

## मित्रचंद्र.

ह्या नांवाची एक नवीन कल्पित कादंबरी मी तयार केली आहे, व तीत वऱ्हाड व पुणें एथील दोन्ही प्राइज कमिटींनीं पसंत करून चांगलें बक्षीस दिलें आहे या गोष्टीवरून व तसेंच या पुस्तकाचे आरंभीं कांहीं विद्वान् लोकांचे अभिप्राय दिले आहेत त्यांवरून या पुस्तकाचें स्वरूप सहज लक्षांत येईल तरी सर्व लोक त्यास उदार आश्रय देऊन ग्रंथकारास उत्तेजन देतील अशी आशा आहे. ह्या पुस्तकाच्या प्रति अकोलें एथें रा. रा. सदाशिवराव विष्णु भागवत लोकल फंड अकौंटंट यांचेपाशीं दर प्रतीस रु० १८३ प्रमाणें पाठविल्यास मिळतील. बाहेरचे लोकांस टपालखर्चाबद्दल तीन आणे अधिक पडतील. कळावें. मुक्काम बाळापुर तारीख २६ माहे जुलै सन १८८० इसवी.

पांडुरंग गोविंद पारखी

हेड मास्तर स० शाळा बाळापुर.

## इंद्रजालीक सर्प.

अवश्य वाचा.

अद्भुत चमत्कार

(अवश्य पहा अवश्य पहा)

हा चमत्कारिक सर्प प्रत्येकानें अवश्य करून पहावा. रसायन क्रियेनें तयार केलेल्या काड्या पासून हा सर्प उत्पन्न होतो. एक इंच लांब कांडीचा सुमारें ३ हात लांब सर्प होतो, आणि त्याचा रंग व आकृति वगैरे खऱ्या सर्पाप्रमाणें असते एका डबीची किंमत २ रुपये व वांटी खर्च प्रत्येक डबीस ४ आणे मिळून २। रुपये मनीआर्डर करून खालीं सही करणाराकडे पाठवियात रवाना करण्यांत येईल. प्रत्येक डबींत एक इंच लांबीच्या २० कांड्या आहेत सर्प करण्याच्या कृतीविषयीं एकंदर माहितीचा कागद डबीबरोबर पाठविला जाईल.

गोविंद मोरोबा कार्लेकर

पत्ता—नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली घर नंबर २६ मुंबई

## धर्मशाळेची वर्गणी.

| | |
|---|---|
| जयवंतराव व्यंकटेश | ५१ |
| लक्ष्मीपति बारिस्टर | ५० |
| गोपाळ बाळाजी | २५ |
| मेघराज हणमंतबक्ष | ५ |
| मर्तंड आनंदराव | २१ |
| मटाजी शिवाजी पाटील | २० |
| हणुमिया अकोट | २० |
| गंगाराम रंगारी. | ७ |
| किसनसिंग जमादार | ७ |
| मुरलानंद भवानीराम | ७ |
| इनायतउल्ला याकुब | ७ |
| हुसेनखा महमदखा | ७ |
| महाप्पा अंडाप्पा | ७ |
| दलजीराम भजन | ७ |
| भिमणाजी पाटील | ६ |
| रामजी सितराम | ५ |
| गणपतलाल वलद चैतमल | ५ |
| रावजी वलद सखाराम पटील | ५ |
| राघोजी नाइक | ५ |
| दत्तुजी गोरे | ५ |
| बापु पाटील | ५ |
| नारायणदास हातेकर | ५ |
| राजाराम हिरालाल | ५ |
| रामलाल कुंजीलाल | ५ |
| अमराजी पाटील | ५ |
| सितराम सखाराम तल्हेकार | ५ |
| अनकानंद लक्षमणदास | ५ |
| बापूजी लटूजी | ५ |
| रावजी वलद जानजी डोंगरगाव | ५ |
| म्हेताजी पाटील | ५ |
| निंभनजी वलद कडताजी पाटील | ५ |
| त्रिंबक राजाराम माटरगाव | ५ |
| श्रीराम शालिग्राम | ५ |
| बापु वलद शिंगराजी | ५ |
| गुलज्यारखा वलद इमामखा | ५ |
| इच्छाजी वलद शिंगराजी पाटील | ५ |
| साळोबा चंद्रभान | ५ |
| हजारीमल वलद छोटमल | ५ |
| धनाप्पा मंजाळ | ५ |
| दत्तु बाळाजी पाटील | ५ |
| पांडु वलद इभान | ५ |
| नारायण काकड | ५ |
| कृष्णाजी पाटील सांगळूद | ५ |
| गोविंदराम गुरुप्रताप | ५ |
| देवराव विनायक वकील अकोला | ५ |
| मारुती गणेश | ५ |
| लक्ष्मण भाट | ५ |
| सोनाजी रंगारी | ५ |
| नारायण झाबु रंगारी | ५ |
| चिमणलाल मारवाडी | ५ |
| किसन सत्री दलाल | ५ |
| बापु बाळकृष्ण चितलवाडकर | ५ |
| रामजी पाटील पातुरनंदापुर | ५ |
| इंगाजी पाटील | ५ |
| रोडबा देशमुख शिरपुर | ५ |
| जयराम देशमुख शिरपुर | ५ |
| यशवंताजी पाटील | ५ |
| नागुजी पाटील चिखलगावकर | ५ |
| गोविंद माधव अकोलेकर | ५ |
| पांडु इंद्रजीत | ५ |
| रामसिंग देशमुख | ५ |
| पिरोबा वलद पांडोबा कासार | ५ |
| गेल तापन सौदागर | ५ |
| विष्णु आप्पा वाणी | ५ |
| शंकर सोनार | ५ |
| गोकुळलाल प्रभुदास | ५ |
| बालिंग वलद चंद्रभान पाटील | ५ |
| नारायणदास दयाराम | ५ |
| कालेखा वलद चांदखा | ५ |
| भीवराज दलाल | ५ |
| हकुमचंद जेठमल | ५ |

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत सदर व बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवर तारीख ८ माहे नोवेंबर सन १८८० इसवी अंक ४४


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु |
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१० |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिस

बुदू वल्लद रामजी भोई परदेशी रहाणार आकोट यास मखनलाल सुरजमल पैकी मखनलाल मयत वारसपुत्र सुरजमल अज्ञान पालन करणार आई जोधी मर्द मखनलाल याजकडून मुखत्यार रामजी नागो गुमास्ते रहाणार अकोट याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, संवत् १९३५ मिती वैशाख शुद्ध मासीं तुह्मी व आह्मी शेराकतींत मौजे सिनखेड तालुके मेळघाट एथील जमीन पांच वर्षांचे करारानें वहितीस केलेली असून त्या शेतांचे लागवडी बद्दल ४१९०११ चारशें एकुणीस रुपये अक्राआणे चिल्हरवार खर्च लागला त्याजपैकी उत्पन्न मालाचें ४४०८ चेवचाळीस रुपये आठ आणे झाले बाकी ३७५०३ तीनशें पंचाहात्तर रुपये तीन आणे आमचीं येणें निघाली त्यांत आमचे निमे हिशाबद्दल १८७०९०६ आह्मावर बसून १८७०९,६ एकशें सत्याशी रुपयेनऊ आणे सहापै तुह्माकडे येणें निघाले आहेत. हे रुपये तुह्मास पुष्कळवेळा मागितले पण ते तुह्मी अजून दिले नाहींत ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही मुद्दाम पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आपचे रुपयांची आदाई करावी. या प्रमाणें न केल्यास रीती प्रमाणें फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुध्धा रुपये भरून घेऊ. व कोर्टखर्च ही तुह्मावर बसेल कळावें तारीख २८ माहे आक्टोबर सन १८८० इसवी.

रामजी नागो गुमास्ते राहणार आकोट दस्तुर खुद्द

## पत्रव्यवहार.

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि. वि. खाली लिहिलेल्या चार ओळींस येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

मीं फिरत फिरत तालुके जळगांव येथें आलों हा गांव तालुक्याचा असल्यामुळें कारकून वगैरे मंडळीचा जमाव चांगला आहे. येथील वस्ती सुमोर ३ हजार घरांची असून ब्राह्मणांचीं घरेंही पुष्कळ आहेत. व कित्येक शास्त्री पुराणिक वैदीक असून विद्वान आहेत. मीं सरासरी ८ दिवस झाले सदर्हू गावांत आलों आहे. असें एकतो कीं सुमारें एक महिना झाला येथें मांगीण जातीची एक वेश्या येऊन तिनें आपली जात छपवून मुसलमानीण आहे असें प्रसिद्ध करून कळवंतिणीचा धंदा सुरू केला. त्यावरून गावातील कित्येक नवीन टोळ मंडळी तेथें पानसुपारीचे व गमनादिक व्यवहार करण्याचे इरादानें जाऊं लागली. पुढें ८।१० दिवसांनीं येथील एका इसमानें तिजला ओळखून सर्वांस कळविलें कीं, सदर्हू वेश्या जातीची मांगीण आहे. तें सर्व गावांत समजल्यावर जी मंडळी जात होती तींतील कांहीं मंडळी कबूल होऊन कांहीं नाकबूल झाली. जे कबूल झाले त्यांनां गावांतील शास्त्री, पुराणीक, जोशी, धर्माधिकारी व इतर संभावीत गृहस्थ यांनीं एके ठिकाणीं विचार करून शास्त्राप्रमाणें क्षौरांत प्रायश्चित्त ठरविलें व दोन तीन दिवसांनीं ब्राह्मणांपैकीं गेलेले २ इसमास धर्माधिकारी शास्त्री पुराणिक वगैरे मंडळीनीं व कुणबी तेली माळी शिंपी वगैरे जातीत जोशी मंडळीनीं क्षौरांत प्रायश्चित्त दिलीं त्यांत सोनारापैकीं दोन इसम राहिले होते. त्यांनांही दोन चार दिवसांनीं क्षौरांत प्रायश्चित्त देण्याचें ठरले व त्यांनां क्षौर करण्यास सांगितलें असतां आह्मी क्षौर करीत नाहीं असें सोनार बोलू लागले. तेव्हां जोशांतील एका विद्वान इसमासी व सोनाराशी या बद्दल बरीच झटपट होऊन शेवटीं ते क्षौरांत प्रायश्चित्त घेत नाहींत असें जाणून तो जोशी आपले घरीं गेला नंतर इतर जोशी व शास्त्रार्थ जाणणारे शास्त्री पुराणीक मंडळींनीं सदर्हू सोनारास क्षौरांत प्रायश्चित्त न देतां वृत्ती बुडते यास्तव सोनाराचे मर्जीप्रमाणें पंचगव्य व तीर्थ देऊन शुद्ध केलें. सदर्हू सोनार वैश्य जातीचे असून ब्राह्मण मंडळी त्याचे हातचें पाणी पिते व त्यांनां ब्रह्मकर्म आणि विष्णुपूजा करण्याचा अधिकार आहे असें असून त्यांनां इतर जोशी वगैरे मंडळींनीं क्षौरांत प्रायश्चित्त काय कारणांनीं दिलें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. त्यांत असें ऐकतो कीं, बाप जिवंत आहे. त्यास क्षौर वर्ज आहे हें कांहीं अंशीं खरें असावें परंतु असेंही ऐकतों कीं, बाप जिवंत असल्यास मुलास क्षौर वर्ज असून त्याचे बापानें करावें तेव्हां असेंही झालें नाहीं. आतां जोशी मंडळी ह्मणतात कीं, आमची वृत्ती बुडते सबब आह्मी सोनाराचे मर्जीप्रमाणें प्रायश्चित्त दिलें वृत्ती बुडते ह्मणून जर त्यांनीं सदर्हू इसमास क्षौर न करवितां शुद्ध केलें असेल तर तसें करणें शास्त्रास अनुसरून असेल असें मला वाटत नाहीं. व त्यांनीं कोणता विचार मनांत आणिला असेल तो न कळे. यावरूनच ऋगूवेदी व यजुर्वेदी यांचा तंट पडला आहे व ऋगूवेदी मंडळीपैकीं एक दोन विद्वान ब्राह्मण पुराणिक शास्त्रार्थ जाणणारे आहेत. त्यांनीं पुष्कळ सांगितलें असतां त्यांचें मत कोणीच न घेतां द्वेषबुद्धीनें त्यानां न विचारतां आपलेच मतानें सदर्हू इसमास पंचगव्य देऊन बाकीच्यानीं शुद्ध केलें. ज्यानीं सदर्हू प्रायश्चित्त दिलें त्यांतही विद्वान नाहींत असें नाहीं. चांगले विद्वान शास्त्रार्थ जाणणारे असून व त्यांचे हातूनच ब्राह्मणांपैकीं दोन इसमास क्षौरांत प्रायश्चित्त ठरवून देण्यांत आलें होतें. असें असून सदर्हू इसमाबद्दलच त्यांनां फक्त पंचगव्य देऊन शुद्ध करण्या विषयीं काय शास्त्रार्थ निघाला असेल तो कळत नाहीं. व या चमत्कारीक गोष्टीमुळें सुचेनासें झालें आहे त्याकारितां आपणास सदर्हू मजकूर छापून कसा काय शास्त्रार्थ आहे याजबद्दल विनंती करतो तरी विनंतीकडे लक्ष देऊन मागितलेल्या प्रश्नांचें संशय फिटण्याजोगें उत्तर मिळेलें असी आशा आहे कळावें. हे विनंती. ता. ३ आक्टोबर सन १८८० इसवी. मुक्काम जळगाव

आपला

एक क्ष

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

तारीख २७ माहे अक्टोबर सन १८८० मुकाम अंजनीबुजरुग

वि. वि. अंजनी बुजरुग तालुके मेहकर हा गांव बुल्ढाणें जिल्ह्यांत साधारण बरा आहे एथें सर्व प्रकारचें पीक एकंदर गांवापेक्षां फार चांगलें होतें. येथील गहू वाकदचे गव्हा सारखे चांगले आहेत. आज तारखे पर्यंत मेघराजानें आपलें काम फार चांगले रीतीनें बजाविलें, व स्वाती नक्षत्राचाही एक पर्जन्य चांगला झाला यामुळें एकंदर खरीप व रबी फार चांगली होणार आहे, पुढें ईश्वरेच्छा. एथें थोडे दिवसापूर्वीं एथील गुमास्ते पांडे नामें चिमणाजी भवानी ऊर्फ अण्णा जवळकर यानें आत्महत्या फारच विलक्षण रीतीनें करून घेतली त्याची हकीकत येणें प्रमाणें. मौजे आरेगांव येथें सदरहु गुमास्ते कुळकरण्याचें राहण्याचें ठिकाण होतें. त्या गांवीं आरेकस लोक तीन असामी आले, त्या लोकांनीं त्या पांड्यास अशी कांहीं भुलथाप दिली कीं, आह्मी भूमींतील द्रव्य काढूं शकतों. परंतु त्या भूमींतील द्रव्यास आपलें घरचें द्रव्य दाखविल्याखेरीज तें हस्तगत होत नाहीं या त्यांच्या बोलण्यावरून सदर्हु पांड्या व ते लोक रात्रीं जंगलांत द्रव्य काढण्याकरितां गेले. पांडे यानें त्या द्रव्यास दाखविण्यासाठीं आपले घरून रुपये २५० अडीचशें व दहा तोळे सोन्याचे डागिणे बरोबर नेले होते. तें बरोबर आणलेलें द्रव्य एका मडक्यांत घालून त्याचें तोंड फडक्यानें बांधिलें, नंतर त्यांनीं द्रव्य खोदण्यास प्रारंभ केला थोडेसें खादल्यावर त्या तिघां आरेकसांपैकीं एकानें अंगांत आणिलें व म्हणूं लागला कीं, साभाळा गडेहो, या द्रव्याचा राखणारा एक कोसावर माळ आहे तेथें आला आहे करितां त्याची पूजा लौकर कराल तर बरें, नाहीं तर फारच वाईट प्रसंग आहे. नंतर त्या लोकांनीं जें मडक्यांत कुळकर्ण्यानें द्रव्य आणलें होतें त्या मडक्यांतील द्रव्य हातचलाखीनें त्यास न कळत काढून घेतलें व त्या मडक्यांत माती घालून ठेविलें, व आपण तिघेही पूजा करण्यास गेले. बरोबर त्या कुळकरण्याचा मनुष्य गेला होता. थोडेसें दूर गेल्यावर त्यांनीं असा बहाणा केला कीं, पूजा करण्यास आपण विस्तू आणण्यास विसरलों नंतर त्या पांड्याचे मनुष्यास सांगितलें कीं, लवकर विस्तू घेऊनये त्यावरून तो गावांत गेला, जातानां त्यास त्यांनीं सांगितलें कीं, मागें पाहूं नको. जर मागें पाहशील तर तो राखणारा तुझें बोकांडीं बसेल. त्या प्रमाणें तो गेल्यावर या तिघांनीं "यःपलायसजीवति" केलें. पुढें तो मनुष्य विस्तु घेऊन परत आल्यावर पाहातो तों ते तिघेही त्या जागीं नाहींत, नंतर तो लागलीच पांड्यापाशीं आला व झालेली हकीकत त्यानें त्यास सांगितली. पांड्यानें तोंड बंद केलेलें मडकें सोडून पाहिलें तों त्यांत माती घालून ठेविली आहे. नंतर तो व त्याचा मनुष्य असे उभयतां तसेच पळत त्यांस शोधण्याकरितां पळत गेले, पण ते कोठें सांपडले नाहींत. घरीं परत आल्यावर पांड्यानें माझे घरीं चोरी झाली असा रिपोर्ट पोलिसाकडे केला. त्यावरून पोलीस अम्मलदार यांनीं तपास वगैरे सुरू केले पण कांहीं थांग लागेना. दुसरे दिवशीं तो बरोबर असलेला मनुष्य यानें गांवांत सर्वांस कळविलें की पांड्याची चोरी वगैरे कांहीं झाली नाहीं. व त्यानें वर लिहिलेली हकीकत इत्यंभूत सांगितली यामुळें पांड्यास दहशत प्राप्त झाली कीं आपली पुढे जगांत अपकीर्ति होईल व द्रव्याचें द्रव्य गेलें व सरकारांत खोटा रिपोर्ट केला त्या योगें आपली वाईट अवस्था होणार त्या पेक्षां देहत्याग करावा हें बरें असें वाटून त्यानें तारीख ११ सप्तंबर १८८० इ० रोजीं मागील रात्रीं उठून अंजनीबु॥ येथील जंगलांतील विहिरींत बाराशेर वजनाचा धोंडा कमरेस बांधून जीव दिला. व चार दिवसांनीं पाण्यावर तरंगून आला. प्रेत अगदीं सडलें होतें. सदरहु कुळकर्णी तालुके चिखली एथील नायब तहाशिलदाराचा जावई होता. याचे मरणामुळें त्याचे इष्टमित्रास व आप्तवर्गास जें दुःख झालें आहे तें सांगतां पुरवत नाहीं. कारण सदरहु पांडे चांगला सुशील असून लिहिण्याचे कामांत चांगला प्रवीण असे यावरून असा पुतळा अपघातें करून नाहींसा झाला याचें फार दुःख वाटतें कळावें हे विनंती.

आपला एक

बातमीदार क्ष

वऱ्हाडसमाचार.

मिति कार्तिक शुद्ध ६ शके १८०२

## बाबू लाल मोहन घोष.

हे कलकत्याकडील विद्वान बालिष्टर विलायतेस गेले होते व तिकडे आपल्या उत्तम वक्तृत्वानें चांगले प्रसिद्धीस आले हें आमच्या वाचकांस माहीत आहे. व त्यांचें एक भाषणही मागें आमचे पत्रांत प्रसिद्ध झालें आहे. ते गृहस्थ कलकत्यास परत जाण्याकरितां गेले आठवड्यांत मुंबईत आले. तेव्हां त्यांचा मोठा सन्मान झाला. व त्यांनां मुंबईच्या मंडळीनें मोठी सभा भरवून एक मानपत्र दिलें. या प्रसंगीही त्यांनीं उत्तम भाषण केलें. त्यांतील हकीकत आम्ही पुढें लिहू. आज हाशील कळवितों ते ह्मणालेः—

आमचे विरुद्धपक्षी असें ह्मणत असतात कीं हिंदुस्थानच्या लोकांमध्यें इतक्या निरनिराळ्या जाती आणि भेद आहेत कीं त्यांजमध्यें कोणत्याच प्रकारचा परस्पर संबंध व ऐक्य नाहीं. बंगाली लोक जें कांहीं ह्मणतात तें मुंबईतील लोकांस मान्य व लागू नाहीं; मुंबईचे लोक ह्मणतात तें मद्रासच्या लोकांस मान्य व लागू नाहीं असा प्रकार आहे. तेव्हां हिंदुस्थानच्या सर्व लोकांचें मत काय आहे हें जाणणें अशक्य आहे, व असें एकमत होणारही नाहीं. तेव्हां, अशा लोकांचीं तोंडें बंद करण्याचा उपाय हा आहे कीं या देशांतील निरनिराळ्या प्रांतांच्या व शहरांच्या लोकांनीं एक विचारानें वागावें आणि एकमेकांच्या उद्योगास मान्यता व साहाय्य करावें. इंग्लंडांतील लोकांप्रमाणें स्वतंत्रतेचे भोक्ते पृथ्वीवर दुसरे लोक नाहींत, त्यास या देशांतील लोकांचीं दुःखें काय आहेत तीं पक्कीं समजलीं आणि तीं दूर व्हावीं एतद्विषयीं येथील सर्व लोकांचें एकमत आहे अशी खातरी झाली ह्मणजे ते त्यांकडे कधीं दुर्लक्ष करणार नाहींत. याजकरितां आपणास ज्या गोष्टी प्राप्त व्हाव्या अशा असतील त्यांविषयीं धीर न सोडतां या देशांतील सर्व लोकांनीं विलायतेच्या पार्लमेंन्ट सभेकडे अर्ज्या कराव्या. विलायतेस अर्ज्या करणें त्या फार लहान ह्मणजे नुसत्या दहा बारा ओळींच्या असतील तर चांगलें, परंतु त्यांजवर सह्या पुष्कळ ह्मणजे निदान पांच लाख तरी असाव्या. ह्याच्यापेक्षां कमी सह्यांची अर्जी विलायतेस पाठवून कांहीं उपयोग नाहीं.

दुसरें असें सांगितलें कीं हल्लींच्या प्रधान मंडळींतील गृहस्थांनीं अधिकार प्राप्त होण्या पूर्वी ज्या गोष्टी कराव्या ह्मणून प्रतिपादिलें होतें त्या त्यांनीं अजून केल्या नाहींत ह्मणून त्यांच्या सत्य वचनाविषयीं निराश होण्याचें आपणास कारण नाहीं. कारण राज्यकारभार करणाऱ्या लोकांस आपल्या मनप्रमाणें कोणतीहि गोष्ट एकाएकीं करण्यास मोठ्या अडचणी येत असतात त्यांचा अनुभव इतर लोकांस नाहीं. परंतु या प्रधान मंडळींतील ग्लाड्स्टन, ब्राइट, फासेट वगैरे गृहस्थ हे या देशाचें हित करण्याविषयीं मनापासून उत्सुक आहेत यांत तिळमात्र संशय नाहीं, आणि तसें करण्याची संधि ते आपल्या हातून जाऊं देणार नाहींत. परंतु आपण धीर धरला पाहिजे, आणि आपलें कार्य दुसरे करतील अशा भरंवशावर स्वस्थ न बसतां आपणच परिश्रम करून व स्वकर्तव्य बजावून सर्वोपरी त्यांचें साहित्य केलें पाहिजे.

## गांवसफाईचें बुकसर्क्युलर

नंबर १६ सन १८८०

( ता. ४ आक्टो. चे अंकावरून पुढें चालू. )

लोकांस पिण्याकरितां स्वच्छ पाणी मिळावें अशा स्थितींत गांवांतल्या विहिरी ठेवण्याकरितां पाटलांनीं आपल्या हातून होईल तितकी खटपट करावी. येथकरितां त्यांनीं खालीं सांगितलेल्या तजविजी केल्या पाहिजेतः—

( अ ) दरवर्षी पावसाळा लागण्याचे सुमारास ज्या विहिरीचें पाणी साधारण लोक नेतात त्यांतील गाळ वगैरे काढून त्या साफ कराव्या.

( ब ) या विहिरींजवळच्या जमीनीवरून सर्व प्रकारची घाण व केरकचरा काढून ती अगदीं स्वच्छ ठेवावी.

( क ) प्रत्येक विहिरीच्या तोंडाभोंवताली जरूर असेल तर लहानशी भिंत बांधावी आणि तिच्या भोंवतालीं उतरती गच्ची बांधावी ती अशी कीं सांडलेलें पाणी विहिरींत न जाईल. विहिरीजवळ खळगे होऊन त्यांत पाणी सांचेल तर लहानशी नाली बांधून तें कांहीं अंतरावर सोडून द्यावें.

२ लोक नाल्याचें किंवा नदीचें पाणी पीत असतील तेथें पाटलानें खालीं लिहिल्या गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे.

( अ ) नाल्याच्या कांठीं किंवा नजीक मनुष्यें घाण न करितील असा बंदोबस्त केला पाहिजे.

( ब ) ज्या ठिकाणावरून लोक पाणी नेतात तें होऊं शकेल तर गांवाच्या वरच्या बाजूस असावें.

( क ) गुरांस पाणी पाजणें, कपडे धुणें, आणि अंग धुणें हें दुसऱ्या ठिकाणीं खालच्या बाजूस होईल असा बंदोबस्त करावा.

( ड ) जर होऊं शकेल तर नदीच्या कांठीं विहीर बांधावी आणि ती अशा ठिकाणीं असावी, कीं अगदीं मोठा पूर येईल तरच तिच्या जवळ पाणी येईल.

४ लोक तळ्याचें पाणी पीत असतील तर पाटलानें त्याच्या सभोंवतालच्या जमीनीवर कोणत्याही प्रकारची घाण होऊं देऊं नये, आणि होऊं शकेल तर बंधाऱ्याच्या बाहेर एक विहीर बांधावी. या विहिरीचें पाणी तळ्याच्या पाण्यापेक्षां स्वच्छ राहील, कारण स्नान करणें, कापड धुणें, आणि गुरें पाण्यावर नेणें यांच्या योगानें तळ्यांतलें पाणी वारंवार खराब होतें.

५ गांवांतले सार्वजनिक रस्ते रोज झाडले पाहिजेत आणि झाडून जो कचरा निघेल तो जाळून टाकला पाहिजे किंवा नेमलेल्या, जागेवर नेऊन टाकला पाहिजे. ही जागा बहुशः गांवांतील घरांपासून शंभर पावलां पेक्षां कमी दूर नसावी. ज्या दिशेकडुन बहुतकरून कधीं वारा येत नाहीं तिकडे ही जागा असावी. हें काम गांवच्या महारांकडुन करविलें पाहिजे परंतु घरधन्याला आपल्या घरापुढचा रस्त्याचा भाग झाडण्यास सांगण्याचा पाटलास अधिकार आहे.

६ पाटलानें गांवच्या प्रत्येक बाजूला हद्द ठरविली पाहिजे आणि तिच्या पलीकडे लोक शौचास जातील असा बंदोबस्त ठेविला पाहिजे. या हद्दी बहुशः गांवांतील घरांपासून १५० पावलांपेक्षां कमी दूर नसाव्या. या हद्दी ठरविल्यानंतर लोक त्याच्या आंत न बसतील किंवा रस्त्यावर, सार्वजनिक जागेवर, अथवा विहिरीच्या, तळ्याच्या, किंवा दुसऱ्या पाणी मिळण्याच्या जागांच्या नजीकचे जमीनीवर घाण न करितील असा बंदोबस्त ठेवावा.

७ मेलेल्या ढोरें कातडी काढण्याच्या पूर्वी गांवापासून निदान ३०० कदमांवर तरी टाकून द्यावीं. ज्या दिशेकडे वारा वाहतो तिकडे हीं नेऊन टाकावीं. हा नियम पाळण्याचा पाटलानें बंदोबस्त करावा.

८ पाटलानें वर्षांतून दोन वेळां, ह्मणजे जून आणि सप्टेंबर या महिन्यांत गांवाच्या ज्या भागांत वस्ती आहे त्यांतील ज्या खांचखळग्यांत पाणी सांचलें असेल तें सर्व मातीनें भरून टाकावें, आणि पावसाचें पाणी लवकर जावें याकरितां जितक्या होतील तितक्या रस्त्यांतून नाल्या बांधून काढाव्या. हर घरधन्यांकडुन त्यांच्या घरापुढच्या नाल्या करण्याच्या कामांत मदत घ्यावी.

९ गावाबाहेरच्या बाजूस गुरें बांधण्याविषयीं लोकांचें मन वळविण्याचा पाटलानें होईल तितका प्रयत्न करावा. गांवठाण्यांत गोठे बांधण्याची लोकांस परवानगी मिळेल परंतु त्यांचा गुरें बांधण्याशिवाय दुसरे कामाकडे उपयोग करतां येणार नाहीं.

१० वर्षांतून एकदां सप्टेंबर महिन्यांत गांवाच्या भोंवतालें शंभर कदमांच्या आंतील आपोआप वाढलेलीं निरुपयोगी झाडें, निवडुंग, गवत वगैरे सर्व नाहींसें करून टाकावें; आणि फार रुंदीचीं किंवा उंचीचीं कुंपणें असतील तर तीं कापून नेमस्त करावीं. सप्टेंबर महिन्यांत वर सांगितलेलीं झाडें उपटून टाकलीं ह्मणजे तीं वाढणार नाहींत आणि पुन्हा उगवणार नाहींत.

११ गावांत किंवा नेमलेल्या जागेवांचून इतर ठिकाणीं प्रेतें न जाळूं देण्याची व न पुरूं देण्याची जबाबदारी पाटलाकडे आहे. तसेंच प्रेतें नदींत किंवा नाल्यांत कधींही टाकूं न देण्याची, किंवा त्यांच्या अथवा पाण्याचा पुरवठा जेथून होतो अशा दुसऱ्या जागेच्या नजीक प्रेतें पुरूं न देण्याचा बंदोबस्त करण्याचें काम पाटलाचें आहे. ज्या जागेवर प्रेतें पुरण्याचें व जाळण्याचें काम हल्लीं चालू आहे त्यावर तें काम न होऊं देण्याचा हेतु ह्मणजे दुसऱ्या जागा ठरविल्या जातील तोंपर्यंत या नियमाचा उद्देश नाहीं.

१२ पांचवे ६ वे आणि ११ वे नियमाप्रमाणे हद्दी ठरवितांनां अंतराच्या संबंधानें निरनिराळ्या तील अधिकाऱ्यांचे जे हुकूम वेळोवेळीं होत जातील ते पाटलानें मानले पाहिजेत.

( हुकुमावरून )

जी एच. ट्रेवर

सेक्रेटरी.

## हायर व लोअर परीक्षेचे प्रश्न.

### मुलकी.

१ हल्लीं मुलकी कामाची जातवारी कोणकोणत्या पद्धतीनें होते तें पूर्णपणें सांगा. आणि मुलकी काम या शब्दाची व्याख्या द्या. आणि तुमच्यानें सांगवेल तितकी मुलकी कामाचे जे मुख्य तीन भाग आहेत त्यांत कोणकोणती निरनिराळीं प्रकरणें येतात तें सांगा.

२ पत्रव्यवहार वार करण्याकरितां जी पूर्वी वारनिशीची पद्धत होती त्यांत काय कमीपणा होता आणि हल्लीं वहिवाट कोणती चालू आहे व हल्लींचे वहिवाटीप्रमाणें वहिवाट कशी चालते तें सांगा व त्याचें उदाहरण द्या.

३ रिकार्डाचे खोलींत मुलकी रिकार्डाची व्यवस्था कशी होती ती सांगा आणि व्यवस्था करण्याबद्दल जे नियम आहेत ते तुमच्यानें सांगवेल तेवढे सांगा.

४ पाटील पटवारी लोकांस मुशाहिरा देण्याचे नियम काय आहेत तें सांगा आणि मशाहिऱ्याची रकम कशी आकारतात तें सांगा.

५ वहीत जमीनींतून व वहीत होण्याजोग्या पडीत जमीनींतून आणि देवस्थान जमीनींतून घर बांधण्याकरितां माती कोणत्या शर्तीवर नेतां येते? दगडाची खाण कोणत्या शर्तीवर नेतां येते? व घर कोणत्या शर्तीवर बांधतात आणि वर लिहिलेल्या उद्देशाकरितां जमीनीचा उपयोग परवानगीवाचून जे लोक करतील त्यांस काय शिक्षा आहे?

६ रयतेनें जर आपल्या बांध बरोब्या दुरुस्त न केल्या तर त्या दुरुस्त करण्याविषयीं कसा हुकूम आहे?

७ जमीनीचें पिकांवर सरकारचे हक्काचे संबंधानें काय हुकूम आहेत?

८ दोन किंवा अधिक गावचे संबंधानें जसें उदाहरण अ ब क या गावच्या संबंधानें कागद तयार झाल्यावर रिकार्डाचे खोलींत गेल्यावर त्यांची व्यवस्था कशी करावी.

९ अ. ब. क. व ड. हे पोट हिस्सेदार आहेत ड हा आपला हिस्सा अ ला विकायास इच्छितो तर ब क यांजला अग्रक्रयाधिकाराचा हक्क आहे कीं काय? असेल तर कोणता.

१० अ व या दोघांचे शेतें एकाशीएक लागून आहेत तर या दोन्ही शेताचे बांधवरीळचे दरम्यान जी जमीन राहते ती वहीत करण्याचा कोणास हक्क आहे.

११ तरम जमाबंदीचे वेळेस पाटील पटवारी लोकांनी कोणकोणते कागद तयार केले आहेत आणि त्यांपैकीं तहशीलींत कोणते ठेविले आहेत.

१२ पटवाऱ्यानें कोणकोणते कागद ठेवावे त्यांचीं नांवें सांगा व पटवारी लोक तहशिलदारास दर वर्षी कोणकोणतें कागद देतात त्यांचीं नांवें सांगा. आणि हुझी केव्हां

पंटवीन्याचे तऱ्हाची तपासणी करिता यावेळे स कोणकोणत्या गोष्टीकडे लक्ष दिल पाहिजे.

१३ पोट हिस्सेदार व पोटकूळ यांत दरम्यान काय फरक आहे तो सांगा

१४ रयतेने माल काढीचा पैसा पाटील लोकाकडेस दाखल केल्यापासून व तहशिलीचे हिशेबांत व सदरचे हिशेबांत अखेर जमाखर्चापर्यंत काय काय व्यवस्था होती ती सांगा.

१५ अ आणि ब आह्मी वतनदार महार आहो असें सांगतात आणि आपल्या हिशाबद्दल तंटा करितात तर असे तंटे निकाल करण्याविषयीं काय हुकूम आहेत ते सांगा.

---

### PARTING ENTERTAINMENT TO MAJOR R.S. THOMPSON.

A crowded meeting of the leading inhabitants of Malkapur was assembled at the premises of Mr. Raoji Raghao Vakeel, in the Nabob's Haveli on the evening of friday the 22nd Instant to give a parting entertainment to Major Thompson, Assistant Commissioner, who shortly intends to leave for home on two years furlough. As Major Thomson's intentions of summarily leaving Mulkapur had not been learnt early enough the arrangements for the meeting were got up with some hurry but excellently enough under the supervision of the Vakeels. The Hall on the second story of the Nabob's Haveli was tastefully decorated and seats after English form beautifully arranged. In the centre was placed a state chair for the honourable guest with a fitely furnished table in front. The brilliant illuminations in the hall and outside transformed an evening as it were into a bright summer noon, the open terrace in front allowing ventilation full scope inside. Tomtoms commenced to beat in front of the Haveli at about sunset and the road was hardly passable on account of the crowds that gathered to see what was passing. At about 7 o'clock the sounds grew louder as Major Thompson's palanquin approached the Haveli nearer and nearer. The shopkeepers of the Motha Bazar were ranged on the roadside to pay their respects to the popular Sahib as he was borne along. The entry into the Haveli was signalled by fireworks and Major Thompson appeared into the hall in his fine durbar dress and approached his conspicuous seat amidst the salams of the assembly who kept standing till he took his seat. Mr. Damoder Hari Vakeel, who had prepared a brief address in Marathi for the occasion then rose and read it and was followed by a little boy who beautifully sang a few Marathi verses composed in praise of Major Thomson. Mr. Hari Moreshwar then rose and made a short speech in English eulogizing among the acknowledged merits of Major Thomson, his thorough impartiality in the administration of justice his most genial and peaceful disposition, his generally kind feelings towards the natives and concluded with wishes of long life and prosperity and a prayer to the Almighty to send out to India men of true English worth, men whose education had raised them above the natural frailties of humanity, in fine men of noble hearts whose presence alone was likely to bless India and shorten the wide gulf now subsisting between the rulers and the ruled. The termination of each speech was of course followed by a loud applause.

Major Thompson then returned a reply to the following effect which was interpreted to the assembly at his desire by Mr. Hari Moreshwar,

That Major Thompson felt himself very much honoured by the entertainment which the citizens gave him that evening and was very thankful to them for their kindness. He would also thank the speakers for their eulogistic utterances and said he had not done any thing to deserve them. He did not seek for popularity but it always afforded him great pleasure to make friends with natives of whom he had always held a favourable opinion. He would ever be very glad to do what he could for them and carry with him wherever he went reminiscences of the good wishes they cherished towards him. As a proof of his sympathy with natives he wished to inform his hearers that he was in correspondence with some of his native friends and acquaintances in the Madras Presidency where he had been years back. He was of opinion that Europeans had no reason to estrange natives beyond the fact of their own white skin and the dark of the latter. Englishmen he observed, were nothing more than barbarians more than fifteen hundred years ago while the natives of India were then a highly civilized nation; and taking this view Englishmen ought not to consider themselves any way superior to the natives of India. He always took interest in matters relating to the well-being of India and it was his intention he said, to enlist himself as a member of the East India association when he went to England.

A repitetion of thanks for the kind evening entertainment concluded the speech which was followed by a hearty loud applause. The dancing girls who were quite in readiness immediately commenced their work singing the usual songs so very popular with Europeans that is the Persian Gazuls. The dances and singing continued for about half an hour during the course of which Major Thompson, apparently not satisfied with his all alone seat, neared to where the prominent native gentlemen were seated and engaged in a lively conversation on Indian matters and forms and being a man of varied information had to tell them many new things about their own country. Pansupari, attar and Gulab went their round as usual while the noble guest was decked with garlands and nosegays. Major Thompson behaved quite a native and the people forgot for a time that they had a Sahib amongst them. In short the entertainment was a matter of great pleasure to the guest and the hosts and the occasion will long be remembered. Clouds threatening a heavy shower, the people dispersed in great hurry and Major Thompson returned accompanied by some of the principal men and with fire works let-off before him as he passed. He left for Buldana the same night.

---

**Locusts**—From a letter received from a friend at Jalgaum. Jamode, we learn that a swarm of locusts have lately made their appearance there and are greatly destroying the Jawaree and other crops. To destroy or drive away these numberless depredators, we are glad to see our worthy Commissioner has immediately sent some instructions to our energetic Tehsildar, Mr. Ardeseer Dinsajee Chinoy of that place.

## वऱ्हाड

कर्नल बुशबी साहेब जुडिशियल कमिशनर यांची स्वारी खामगावाकडे आहे व ती बुलढाण्यास इतक्यांत जाईल. तेथें १२ वे तारखेस सेशन आहे.

---

उमरावतीची व खामगावची आगगाडी सरकार मार्फत चालू होती ती या महिन्याचे पहिले तारखेपासून जी. आय पी रेल्वेकडे दिली.

---

बुलढाण्याचे आसि० कमिशनर मे० थांपसन साहेब विलायतेस जाणार ह्मणून मलकापुरचे पुढारी मंडळीनीं त्यांस पानसुपारीस बोलाविलें होतें. त्या प्रसंगी चांगलीं भाषणें झालीं. व साहेबांनीं नेटिवाविषयींचें आपलें प्रेम चांगलें व्यक्त केलें. तो मजकूर इंग्लिशमध्यें सविस्तर आहे.

---

मेहकराहून पत्र आल्यांवरून समजतें कीं, मि० डनलप साहेब डिपुटी कमिशनर यांची स्वारी तिकडे आहे. ते कामाचा निकाल उत्तम प्रकारचा व तावडतोब करितात अशी लोकांत बोलवा आहे— तहशिलदार ही तूर्त तेथें चागले गेलेले आहेत. तासगावकरांचें नाटक बरेच दिवस तेथें तळ देऊन राहिलें आहे.

---

मि० काटेग्रेव्ह साहेब पोलिस सुप्रिंटेंडेंट रजेवर गेल्याच्या संबंधानें खालीं लिहिल्याप्रमाणें बदलाबदली झाली आहे.

---

मी० मोफट साहेब फोर्थक्लास होते. ते थर्डक्लास सुप्रिंटेंडेंट झाले. मि० हाबसन साहेब असिष्टंट होते ते फोर्थक्लास सुप्रिंटेंडेंट झाले. व मि० फ्रेजर साहेब त्यांचे जागेवर आफिशियेटिंग असिष्टंट सुप्रिंटेंडेंट झाले.

---

मि. विथम साहेब वऱ्हाडांतील पोस्टांवरील सुप्रिंटेंडेंट यांची स्वारी नांदुऱ्याकडे गेली आहे व मि० हुइंपर साहेब पोस्टाकडील एक्झामिनर खामगाव पोस्टाच्या तपासणीस गेले आहेत. इंगोलीचे पोस्टमास्तर मि. लागींचल यांस बहार प्रांताकडें दिनापुरास पोस्टमास्तरची जागा मिळाली व ते त्या जागेवर रुजू होण्याकरितां इकडून निघून गेले. इंगोलीची जागा अद्यापी भरली नाहीं. ती हक्काप्रमाणें योग्य मनुष्यास मिळाल्यास चांगलें होईल. रा. रा. वासुदेव बळवंत इन्स्पेक्टरचे क्लार्क यांनां बढतीची जागा मिळण्याविषयीं शिफारसी झाल्या आहेत, निकाल अजून समजला नाहीं.

---

पेपरकरेन्सी आफिसाकडील ५० रुपये पगांराचे टेलर रा. रा. विठ्ठल यशवंत यांनीं पेनशन घेतलें त्यांचे जागेवर रा. रा. वामन गणेश यांस नेमिलें व त्यांची ५० रुपयांची जागा रा रा. नारायण सखाराम जयवंत यांस दिली. व त्यांचे ३५ चे जागेवर रा. रा. विठूजी नारायण यांस कायम केलें व त्यांची ३० ची जागा मोगलाईंतून आलेले रा. रा. भिकाजीपंत यास दिली असें समजतें.

---

खामगाव व जळगांव तालुक्यांत टोळधाड आली होती. ही धाड आली ह्मणजे पिकांचें फार नुकसान होतें. सबब रेसिडेंट साहेबानीं हुकूम दिले आहेत कीं लागेल तो खर्च करून टोळांचा नाश करावा.

---

### NOTICE.

Is hereby given to Mr. Manasse Clerk in the Judicial Commissioner's Office H. A. Districts, that in December last he borrowed from the undersigned Rs. 20 with interest at 2 per cent, under a promise that the amount would be faithfully repaid on the issue of pay for that month. The undersigned is sorry to say that Mr. Manasse has not only broken his promise for the return of the money, but, has put off payment up to this date. Mr. Manasse is therefore informed that if the whole amount with interest as stated above, be not paid within one week from this date, the undersigned will be obliged to take legal steps against him for the recovery of this debt. Mr. Manasse should also remember that the undersigned lent this amount to him when he begged and said that he wanted this sum most urgently on account of his father, whom he expected to meet here in December last.

Akola, dated 8th November 1880

Khanderao Balaji Fadkay
Editor of B. S.

---

## वर्तमानसार.

नगरचे असिस्टंट कलेक्टर मि. क्यांडी साहेब यांस कारवाडास अक्टिंग कलेक्टर नेमिलें.

पुण्यास येत्या जानेवारीपासून केसरी या नावाचें मराठी एक वर्तमानपत्र दर आठवड्यास निघणार आहे त्याजबद्दल बी ए., एम. ए., एल एल बी अशा ५।४ गृहस्थांनीं आपल्या सहीची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. पत्र सुबोधपत्रिके एवढें निघून किंमत १ रुपया व शिवाय डाकहशील पडेल.

नगरच्या सिटी स्कुलावर रा. रा गोविंद केशव साबदे यांस नेमिलें.

मुंबई इलाख्यांतील मुनसफ कोर्टें या महिन्यापासून फिरतीं झालीं. दर कोर्टाला स्थलसीमापाहून ३।४ गाव नेमून दिलें आहेत त्या त्या ठिकाणीं पक्षकार लोकांची सोय पाहून कोर्टें भरवीत जावीं असा हेतु दिसतो.

रशिया देशांत पिकें बुडाल्यामुळें कित्येक लोकांचे हाल होऊं लागेल आहेत असें समजतें.

विलायतेंत आस्टन एथें एका नवरा बायकोंचें भांडण होत असतां नवऱ्याच्या अंगावर दिवा पडून तो भाजून मेला.

आन. शेट मुरारजी गोकुळदास यांच्या कायेद कौन्सलांतील रिकाम्या जागेवर रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक सी. एस. आय. यांची नेमणूक झाली असें समजतें.

आस्त्रियाच्या बादशहाची भेट घेण्यासाठीं एक डेप्युटेशन गेलें होतें तेव्हां बादशहानीं असें भाषण केलें कीं तहानुसार वर्तन होऊन शांतता राखण्याच्या कामीं आपण अतिशय श्रम केले आहेत परंतु या सर्वांपेक्षां स्वराज्यसंरक्षण हें आपलें मुख्य कर्तव्य होय असें आपण समजतों.

मि. लायल आणि सर राबर्ट सांडिमन हे तारीख २९ अक्टोबर रोजीं कंदाहारास पोचले.

चमत्कारिक दावा— गवरनर जनरल यांच्या इंग्रजी बाज्यावरील मास्तर मि० लिंडा हे गेल्या मे महिन्याच्या १५ वीस घरांतील गच्चीवरून जात असतां पायाखालची फळी घसरून ते खालीं पडले व त्यांस दुखापत होऊन ते सुमारें महिन्यावर आजारी होते. सबब घराच्या धन्यापासून १००० रुपये नुकसान मिळावें ह्मणून दावा केला. न्यायाधिशानें ठराव केला कीं फिर्यादी आजारी होता तरी त्यास सरकारी पगार मिळत होता ह्मणून मागितलेली रकम फार आहे. माझ्या मतें २५० रु. नुकसानीबद्दल पुष्कळ आहेत.

आर्य कोण— या प्रश्नाच्या संबंधानें रेव्हरेंड जे. हस्किन्य एब्राहाल, लंडन टैम्स पत्रास लिहितात कीं "आर्य या संस्कृत शद्बाचा अर्थ कुलीन असा असून तो प्राचीन काळीं ज्ञातिवाचक होता त्या शद्बातील यँ च्या ठिकाणी जर ग किंवा जं असतां तर तो ग्रीक भाषेंतील आर्गास ( स्वच्छ ) या शद्बापासून निघून त्याचा अर्थ सफेत असा होऊन तो गोऱ्या लोकांस लागला असता"

अयुबखानानें आपलें ठाणें हिरात एथें मोठ्या बंदोबस्तानें बसविलें आहे. हल्मंड नदीवरचे नदीला हें ठाणें हस्तगत करण्याचा त्याचा विचार आहे. तेथील बलुची लोक इराणास शरण गेले आहेत.

तुर्कस्थानांत दंगे सुरू झाल्यामुळें काबूलचा रस्ता बंद झाला. अमिराची सत्ता गिझनीच्या अलीकडे चालत नाहीं आणि हजारा आणि गिल्झै लोकांनीं दंगा करण्याची तयारी केली आहे.

नागपूर एथील एका गिरणींत रात्रीचें काम चालणार असून त्या वेळेस उजेड असावा ह्मणून ६० हजार रुपये किंमतीचें एक विद्युत्प्रकाशयंत्र मागविलें आहे असें समजतें. ने. ओ.

कलकत्यांत दोघां गांधीनीं साधारण औषधाच्या ऐवजी विषारी औषधें विकलीं ह्मणून त्यांस दोन दोनशें रुपये दंड झाला.

कच्छचे माजी दिवाण मि० मणिभाई जसभाई यांस बडोद्यास सर टी माधवराव यांनीं जाइंट सर सुभ्याची जागा देऊन त्यांस बडोद्याच्या प्रधान मंडळीच सभासद केलें, ही नेमणूक मुंबई सरकारानें मजूर केली.

जर्मनी, आस्ट्रिया आणि फ्रान्स यांच्या आग्रहमुळें दुल्सिग्नो प्रांत ५ दिवसांत हवाली करण्याचा सुलतानानें हुकूम केला आहे होडोपाच्छास कान्स्टांटिनोपल एथें परत येण्याचा हुकूम झाला असतां त्यानें तो अमान्य केला बादशहास पदच्युत करण्याच्या संबंधानें गुप्त मसलती चालू आहेत व त्यांत सामील असलेले कित्येक गृहस्थांस पकडलें आहे.

अपूर्व चमत्कार— हुबळी तालुक्यांत अदरगुंची ह्मणून खेडें आहे तेथें भव्य शिलाप्रतिमा आहे त्यास लोक 'अदरगुंची दोडप्पा' ह्मणतात अलीकडे १०।१२ दिवसांपासून त्या प्रतिमेचे पाठीस पडलेल्या दोन नवीन घायांतून रक्तस्राव होत आहे हुबळी पोलिसास रिपोर्ट आल्यावरून त्यानें तथें जाऊन घाय धुवून वगैरे पाहिलें; परंतु रक्तस्राव बंद होत नाहीं. आसपासचे लोक हा चमत्कार पहाण्यास येत आहेत असें धारवाडचे ज्ञा. बो. पत्रांत लिहिलें आहे.

कलकत्याचे मि. लालमोहन घोस हे विलायतेहून हिंदुस्थानांत येण्याकरितां निघाले असून ते लवकरच मुंबईस येणार असें ह्मणतात.

मुरारजी गोकुळदास यांच्या गिरणी वरील व्यवस्थापकांनीं विलायतेहून त्यांचा एक पुतळा बनवून आणविण्याचा विचार केला असून तो पुतळा त्याच गिरणींत स्थापित करणार असें ह्मणतात.

आजपर्यंत फ्रान्स देशांत प्रेसिडेंट, जज्ज आणि सरकारी अधिकारी यांणीं मिशा काढून आपल्या कामावर असण्याचा जो हुकूम असे तो हल्लींचे मिनिस्टर एम० केझट यांणीं रद्द केला आहे.

निजाम सरकारच्या इलाख्यांत आजपर्यंत अफूचें पीक होत होतें तें अतां अफूचें पीक पुढें निजाम सरकारानें करूं नये असा ठराव झाल्याचें मुंबई ग्याझेटवरून कळतें.

मुंबईचे मेसर्स बी० आणि ए० हारमसजी यांनीं मोरोशिअस एथून पुष्कळ साखर मागितली आहे ती लवकरच मुंबईस येईल. हे गृहस्थ चिनांतील एका साखरेच्या पेढीचे एजंट आहेत तिकडूनही त्यांणीं पुष्कळ साखर मागितली आहे. हा सांठा मुंबईस येऊन दाखल झाल्यावर साखरेची लखलूट होऊन हा व्यापार [illegible] असें ह्मणतात.

हल्लीं करवतांत अशी सुधारणा झाली आहे कीं करवताचे दांत हालवितां येतात. हे दांत करवताचे अंगचे नसून त्यापासून निराळे असतात व ते निरनिराळ्या घरांत बसविले असतात. त हवे तेव्हां काढून त्या ठिकाणीं दुसरे बसवितां येतात जर एकादा दांत मोडला किंवा बोथा झाला तर सर्व करवत निरूपयोगी होत नाहीं. मोडलेला दांत काढून तेथें दुसरा घातला ह्मणजे झालें, तसेंच करवताचे दात करवताच्या धातूपेक्षां कठीण व चांगल्या धातूचे करितां येतात.

गव्हरनर जनरल लार्ड रिपन यांणीं कलकत्याच्या जनरल लायब्ररीस ५०० रुपये दिले.

---

## नोटिस.

रा. गोविंदराम दयाराम रहाणार जळगांव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आमचे जावई जे बेरगावांस आहेत ते अगरवाले असून सोनार आहेत असा आमचे जातींत बराच बोभाटा केला आहे ही गोष्ट तुह्मी पुष्कळ लोकांस उघडपणें प्रसिद्ध केल्यामुळे आमचे मुलांची व मुलींचीं लग्न कार्यें होण्यास अटकाव होणार आहे. यापासून आमचें किती नुकसान व दुर्लौकिक होणार आहे याचा अदमास आज सांगतां येत नाहीं. तथापि ही नोटिस तुह्मास पावल्या दिवसांपासून ८ दिवसांच आंत आमचे जावई सोनार आहेत अशा विषयींचा पुरावा जातींचे पंचांत दाखल करावा असें होत नसल्यास तुह्मी ह्या केलेल्या चुकीबद्दल आमची पंचाचे समोर माफी मागावी या दोन्ही गोष्टी पैकीं एकही गोष्ट तुह्मी मुदतीचे आंत न केल्यास आह्मी तुह्मावर कायद्याप्रमाणें तजवीज करणार आहो. सबब या नोटिसीचे द्वारें तुह्मास अगाऊ कळविलें आहे कळावें तारीख १ माहे नवंबर सन १८८० इसवी.

( सही ) रामलाल हरसुकदास रहाणार जळगांव दस्तुर खुद्द.

---

## नोटिस.

उकर्डा वल्लद विक्रम वानेखडे जात कुणबी राहणार मौजे देऊळगाव प्रगणें पातुर शेखबाबू तालुके बाळापूर यांस बालचंद चिमणलाल राहणार बाळापूर हल्लीं दुकान देऊळगाव प्रगणें व तालुके मजकूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, गेले दोन वर्षांत तुह्मी आमचे शराकतींत रोजगार केला त्यांत ९०० रुपये नफा मिळाला असून त्याबद्दल तुह्मी पंचांचे समोर २५० आमचें हिशाबद्दल आह्मास देण्यास कबूल झाले तें आह्मी कबूल न करितां सर्व हिशेब आह्मास दाखवा असें आह्मी ह्मटलें पण ते तुह्मी मान्य केलें नाहीं. ह्मणून ही मुद्दाम नोटिस देण्यांत येते तर ही पावल्यापासून ८ दिवसांचे आंत आमचे हिशावर नफ्याबद्दल ४५० रुपये आले ते द्यावे नाहीं पेक्षां सर्व कागदपत्र तपशीलाचे दाखवावें या शिवाय आमचा खासगत संदुक १ असबाबासह आह्मी बाहेर गावी लग्नास गेल्यामुळें तुमचे घरीं ठेविला तो ही आह्मास परत द्यावा. त्यांत माझे दस्ताऐवज पावत्या व १३ माशांची सोन्याची मुदी एक व गुंड्या चांदीच्या ३ व गाग णीपैकीं १७५ रुपये आणि खुर्दा होता असें सामान आहे ते संदूक ही परत द्यावा. व आपसांत समजूत करावी. नाहीं पेक्षां कोर्टमार्फत तजवीज करणें भाग पडेल तेणें करून कोर्ट खर्च तुह्मावर बसेल. या नोटिशीचाही खर्च तुह्मापासून भरून घेऊ कळावें तारीख ५ माहे नोवेंबर सन १८८० इसवी,

( सही ) बालचंद चिमणलाल गुजराथी दस्तुर खुद्द.

---

## धर्मशाळेची वर्गणी.

| | |
|---|---|
| उंबर शरिफ कछी | ४ |
| शाबुदीन याबुदीन | ४ |
| हानी करीम ज्यानमहंमद | ४ |
| एकोबा वेकार | ४ |
| देवराव चांदुरकर | ४ |
| काशिनाथ चांदुरकर | ४ |
| गंभिरराव चांदूरकर | ४ |
| बालाभाई | ४ |
| गंगाराम जोहरी | ४ |
| सुबा परशराम पाटील | ४ |
| रामशिंग जोहरी | ४ |
| अकाजी नवलाजी | ४ |
| रंभाजी गुडधीकर | ४ |
| सरदार यातेजमल | ४ |
| जयशिंगदास हंसराज | ४ |
| लक्ष्मणदास ईश्वरदास | ४ |
| पुरणमल वल्लद जेमदार | ४ |
| राजाराम जोहरी | ४ |
| देवराव शिवराव देशमुख | ४ |
| पक्षकार देवराव विनायक | ४ |
| रघुनाथदास रामगोपाळ | ४ |
| गणपती गंभिर पाटील | ४ |
| सरदारमल तेजमल साहु | ३ |
| दवलतराव देशमुख | ३ |
| गणेशदास | ३ |
| तुळसीदास सुकदेव | २ |
| कृष्णाजी वल्लद मानसिंग | २ |
| विलायत हुसेन लालखा | ३ |
| उबारखा वल्लद लालखा | ३ |
| कालेखा वल्लद दुर्गाखा | २ |
| जानकीराम | २ |
| करीमखा वल्लद सुलतानखा | ३ |
| गोविंद वल्लद येडजी | ३ |
| किसनजी वल्लद प्रयागजी | ३ |
| रामचंद्र मोतीराम | ३ |
| आनंदजी भाटे | २ |
| रोड्या मारवाडी | ३ |
| जगदेव व दावल वगैरे | ३ |
| नारायण पांडुरंग | ३ |
| देवराव रामराव गुमास्ते | ३ |
| जानजी पाटील | ३ |
| सखाराम तळेकार | ३ |
| बाबुजी अमृत | ३ |
| बिरदीचंद देवाकिसन | २ |
| तयबनूर कछी | ३ |
| शिवप्रसाद भवानीराम | ३ |
| नूर महंमद कछी | ३ |
| हरीराम आनंदराम | ३ |

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

स्तक १४ अकोला, सोमवार तारीख १५ माहे नोवेंबर सन १८८० इसवी अंक ४५

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशिल. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

### लोहमार्ग

अथवा.

### मराठी आगगाडी.

( ९० आकृती )

मुद्दपसंत व्हन रेलवेकडील लोकांकरितां व ज्यांस शास्त्रीय विषयाची अभिरुचा आहे अशांकरितां आगगाडीच्या विशेष माहितीचें मराठी भाषेत नवीन पुस्तक. किंमत २ रुपये आणि टपाल खर्च ४ आणे पुस्तकें मुंबईंत इंदुप्रकाश छापखाना, गोपाळ नारायण आणि कंपनी, काळबादेवीचा रस्ता आणि पुण्यांत ज्ञानप्रकाशांत रोख किंमतीस ता० १५ नोवेंबर पासून विकत मिळतील.

विशेष सचना — सदर विषय इतर देश भाषांतून प्रसिद्ध व्हावा व तशा कृत्यास सदर पुस्तकापासून यत्किंचित् मदत व्हावी ह्मणून ह्या पुस्तकांत, उर्दू हिंदी आणि गुजराथी टाईटल व अनुक्रमणिका हीं घातलीं आहेत शिवाय मराठो मुळाक्षरांत तारायंत्र द्वारा ( इंग्रजी मुळाक्षरांप्रमाणें ) पाठवितां यावे ह्मणून तारायंत्राच्या खुणा बसवून घातल्या आहेत.

विष्णु चिमणाजी कर्वे,
स्टेशनमास्तर सनावद.
होळकर स्टेटरेलवे.

## शोध पाहिजे.

अवश्य वाचा.

जिल्हा खानदेश पैकीं तालुका चाळिसगांव यांतील चाळिसगांवीं एक मुलगा राम नांवाचा उमर वर्षे अजमासें १३।१४ चा आला असून सांगतो कीं सोलापूराकडील दुष्काळाच्या वेळीं माझी विधवा आई नांवें काशीबाई ही मला बरोबर घेऊन देशावर निघाली, आणि सुरत मुक्कामीं मला निजलेला ठेवून निघून गेली. कोठें गेली हें मला माहित नाहीं आई सांगत असे कीं आपण ऋग्वेदी ब्राह्मण असून कोल्हापुराकडे- निंब गांव आहे तेथील राहणारे आहोंत. मला भाऊबंद वगैरे हे आहेत कीं नाहीं हें मला माहित नाहीं, व माझी मौंज झाली नाहीं अशी हकीकत आहे.

ह्मणून आह्मी सर्व देशबंधु व वर्तमानपत्रकर्त्यांस विनंती करितों कीं, उदार बुद्धीनें ह्या गरीब मुलाच्या आईचा व जातीचा अगर त्याच्या आप्तवर्गाचा शोध खालच्या पत्त्यावर कळवावा व सर्व वर्तमानपत्रकर्त्यांनीं माय लेकरांची गांठ घालण्याकरितां किंवा त्याची जाती कळल्यास चाळिसगांवीं आलीं त्याची मौंजी बंधन करूं द्याकरितां ही जाहिरात निदान तीन वेळ तरी पत्रांत घ्यावी.

मुक्काम चाळिसगांव ता. १२
नोवेंबर स. १८८०

माधवराव रघुनाथ देवभानकर
व वासुदेव रामचंद्र मोहनी हेडमास्तर
चाळिसगांव.

## ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवे.

### खामगांव स्टेट रेलवे.

या लेखाच्या द्वारानें जाहिर करण्यांत येते ऐसें कीं, तारीख १५ माहे नोवेंबर सन १८८० रोज सोमवार या दिवशीं आणि या दिवसा नंतर खामगांव स्टेट रेलवे, उतारू लोक आणि व्यापारी माल नेण्या आणण्याकरितां पु : सुरू केली जाईल. हिची वहिवाट ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवे कंपनीचे मार्फत चालेल.

सदरील तारखेस व या तारखेपासून पुढें नवीन नोटिस येई तों पर्यंत दररोज दोन मिश्र गाड्या, जालम आणि खामगांव यांच्या दरम्यान, नागपुराकडून मुंबईस किंवा मुंबईकडून नागपुरास जाणाऱ्या व येणाऱ्या ट्रेनीच्या मुख्य लैनीच्या फांट्यांच्या धोरणानें, खालीं लिहिल्याप्रमाणें जातील व येतील

(डौन ) ह्मणजे जालमकडून खामगांवास जाणारी.

| | सकाळीं | संध्याकाळीं |
|---|---|---|
| जालम सुटणें | ११–० | ५–१५ |
| खामगांव पोंचणें | ११–४५ | ६–० |

(अप ) ह्मणजे खामगांवाहून जालमेस येणारी.

| | सकाळीं | संध्याकाळीं. |
|---|---|---|
| खामगांव सुटणें | ९–१५ | ३–१५ |
| जलम पोंचणें | १०–० | ४–० |

उतारू लोक, माल आणि पारसलें, खामगांव व सदरील रेलवेवरील सर्व स्टेशनें यांच्या दरम्यान. आणि खामगांव व तहत पोंचविण्याची व्यवस्था ज्या दुसऱ्या रेलवेशीं केली आहे त्या रेलवेवरील स्टेशनें यांच्या दरम्यान ही तहत आणण्या नेण्याकरितां नोंदली जातील.

जी. आय. पी. रेलवेवर उतारू लोक, माल इत्यादि नोंदण्याच्या संबंधानें ज्या सर्व रूळी व कानू चालू आहेत त्याच रूळीं व कानू खामगांव स्टेट ( सरकारी ) रेलवेतही लागू राहतील

भाव, दर वगैरे बद्दलची माहिती स्टेशनावर अथवा खालीं सही करणार यांजकडून मिळाळी जाईल.

मुंबई तारीख ५ वी माहे
नवेंबर सन १८८०

HENRY CONDER.
जनरल ट्राफिक म्यानेजर.

## वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक मंडळीकडून.

देण्यांत येते कीं, येत्या डिसेंबर महिन्याची तारीख २४ रोज शुक्रवार पासून या मंडळीचा पुढें लिहिले विषयांत उमेदवारांची परीक्षा घेऊन बक्षिसें देण्याचा वार्षिक समारंभ सुरू होणार आहे. यांजकरितां ज्या उमेदवारांची परीक्षेस येण्याची इच्छा असेल त्यांचे लेखी अर्ज खालीं सही करणाराकडे "प्रमोदसिंधु" छापखान्याच्या पत्त्यावर तारीख १२ माहे डिसेंबरच्या आंत पोंचतील असे यावे.

विषय १ ला—" आपल्या देशांत पूर्वी प्रत्येक गावीं पंच मार्फत पंचायती होत असत त्यांपासून कोणकोणते फायदे होत होते त्याविषयीं माहिती देणें हल्लीं सरकारची ह्या कामांत कोणत्या प्रकारची मदत आहे व पंचमार्फत आतां कोणचीं कामें होण्यासारखीं आहेत हें सांगावें पंचाचे आंगीं कोण कोणते गुण असावेत."

विषय २ रा—" सुधारलेल्या देशांत खानेसुमारी करितात, तींत कोणती माहिती साधारणपणें मिळवितात, त्या माहिती पासून जे फायदे होतात ते कांहीं देशांतील खानेसुमारीचे आंकडे घेऊन स्पष्ट करून दाखवावे. आपल्या देशांत खानेसुमारी विषयीं लोकांचे वाईट समज असतील ते दूर करावे,'

येणेंप्रमाणें दोन विषय नेमिले आहेत. पहिल्या विषयांत पहिलें बक्षीस रुपये ३० चें व दुसरें रुपये २० चें नेमिलें आहे. दुसऱ्या विषयांत पहिलें बक्षिस रुपये २५ चें व दुसरें रुपये १५ चें नेमिलें आहे.

परीक्षेस येणारे उमेदवारांनीं समारंभाचे पूर्व दिवशीं या सभेच्या चिटणिसास भेटावें.

उमेदवारांस लागू असण्याचे नियम खालीं दिले आहेत त्यांकडे अवश्य लक्ष द्यावें.

१ उमेदवाराचें वय १६ वर्षांपेक्षां कमी नसावें.

२ उमेदवारानें उभे राहून भाषण करावें व जवळ लेखी टिपण वोलते वळीं ठेवूं नये.

३ प्रत्येक उमेदवारानें अर्ध्या तासावर भाषण करूं नये. परंतु जरूर वाटल्यास भाषण करणारास अर्ध्या तासापूर्वीच रजा देण्याचा व वाटल्यास मुदत अधिक एक तासपर्यंत वाढविण्याचा अधिकार परीक्षकांस आहे कोणी कोणाही व्यक्तीस अनुलक्षून लागून भाषण करील किंवा सरकारच्या किंवा धर्माच्या विरुद्ध भाषण करील किंवा बा भत्स शद्ब भाषणांत घालील तर त्यांचे भाषण करण्यांत येईल.

४ ज्या उमेदवारांचे निरनिराळ्या विषयांत अधिक गुण लागतील त्या उमेदवारांस बक्षिसें दिलीं जातील परंतु एक तृतीयांशापेक्षां गुण कमी लागल्यास मुळींच इनामें दिलें जाणार नाहीं.

सन्मानार्थ नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर कोणाची भाषण करण्याची इच्छा असल्यास त्यांस परवानगी आहे.

उमरावती तारीख २८ अक्टोबर १८८०

यशवंत गोविंद
सभेचे चिटणीस.

## नोटिस.

भगवान वल्लद एकोजी तेली रहाणार मौजे निमकर्दे तालुके बाळापुर यास रेणकाई मर्द भगवान तेली रहाणार मौजे व तालुके मजकूर इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून आज ४० वर्षे पर्यंत मी तुझ्याशी संसार केला मला पुत्र संतान नाहीं ह्मणून तुह्मी मला दत्तक घेऊन दिला व तो गत वर्षांपर्यंत वहिवाट करितही होता. सुमार ८ वर्षांपूर्वी तूं गंधर्वाची दुसरी बायको केली तरी तिलाही पुत्रसंतान नाहीं. आजवर मी तुझे घरांत असून गतवर्षांपर्यंत माझे अन्नवस्त्राची तूं फिकर ठेविली पण या वर्षांत तूं मला अन्नवस्त्र बिलकूल दिलें नाहीं तेणेंकरून मला १५० रुपये कर्ज झालें आहे. तें कर्ज ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत द्यावे व पुढेंही माझे अन्न व वस्त्राची तजवीज ठेवावी. आपण असतांनांच आपले दुर्लक्ष्य माझे पोटखर्चाकडे झालें ते व्हां आपले मागे माझा उदर निर्वाह कसा चालावा याविषयीं मला मोठी भीति पडली आहे. करितां आपण आपले समोरच स्थावर जंगम जिनगीचा माझा वाटा माझे स्वाधीन कराल तर बरें होईल. असें न केल्यास मला सरकार दरबार करून दाद मागणें जरूर होईल. व तेणेंकरून कोर्ट खर्चही तुह्मावर बसेल या नोटिशीचा खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल. कळावें तारीख ६ माहे नोवेंबर सन १८८० इसवी.

( सही ) रेणकाई मर्द भगवान तेली
निशाणी हातची बांगडी.

## नोटिस.

गोपाळदास श्रीराम दुकान अहमदनगर यास खाली सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडेस आमची रकम ऐन रुपये ५२५ पांचशेंपंचवीस रुपये अजमासानें या शिवाय व्याज घेणें आहे. ते तुह्मी आजपर्यंत पाठविले नाहींत तर हल्लीं नोटिसही दिली आहे तर ही पावल्या पासून ८ दिवसांचे आंत आमचे रकमेचा निकाल करून द्यावा आठ दिवसांचे आंत निकाल न केल्यास शिरस्त्या प्रमाणें फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां रुपये भरून घेऊ कळावें. तारीख ६ माहे नोव्हेंबर सन १८८० इसवी.

( सही ) श्रीराम शाळिग्राम
दुकान अकोलें
दस्तुर दयाराम

वऱ्हाडसमाचार.

मिति कार्तिक शुद्ध १४ शके १८०२

## व्हाईसराय साहेब.

लार्ड रिपन साहेब व्हाईसराय ह्मणजे आपले हिंदुस्थानचे मुख्याधीपती यांची स्वारी फिरावयास निघाली आहे. व ती हल्लीं पंजाबप्रांतांत लाहोरास आहे. १० वे तारखेस तेथें त्यांचा मोठ्या समारंभानें शहरांत प्रवेश झाला. हत्तीवर स्वारी होती व दुसरे हत्ती समागमें होते ५० राजे, संस्थानीक व इतर सरदार लोक तेथें पुष्कळ आले आहेत मोठाले राजे १० व संस्थानिक ४०० आहेत त्यांतून कित्येकांच्या भेटी घेणें व परत भेटीस जाणें, आणि मानपत्रें स्वीकारणें, त्यांवर उत्तरें देणें, लेव्ही भरविणें यामध्यें निमग्न होते. शनिवारीं तेथें जमलेल्या दहा हजार फौजेची कवाईत झाली व सायंकाळीं एक मोठी-मेजवानी झाली- आज आर्डर आफ धि ब्याथचे सन्मान कित्येकास देऊन नंतर मोठा दरबार भरविणार आहेत. त्या संबंधी हकीकत पुढील आठवड्यांत येईल. आजच सायंकाळीं लढाईंत विजयी होऊन आलेल्या लष्करी आफिसराचा मोठा बाल होणार आहे त्यासही व्हाईसराय साहेब जाणार आहेत. इतकें झालें ह्मणजे तेथील समारंभ समाप्त झाला. मग उद्या मूलतानाकडे जातील तेथें लेव्ही होईल. व मुंबईस येईपर्यंत आणखी दोन तीन ठिकाणीं लेव्ही होतील.

व्हाइसराय साहेबांची स्वारी २० वे तारखेच्या सुमारास मुंबईस येणार आहे व तेथें एक आठवडा मुक्काम आहे. मुंबईस दरबार होण्याविषयीं कांहीं प्रसिद्ध झालेलें नाहीं. व संस्थानिकांस निमंत्रणेंहि झालेलीं नाहींत. तरी व्हाइसराय साहेब लेणीं पहावयास जाणार आहेत-व तेथें रोशनाई होणार आहे. व एवढ्या मोठ्या शहरांत स्वारी येणार तेव्हां कांहीं विशेष गोष्टी मुंबईसही झाल्यावाचून रहाणार नाहींत. व ज्या काय होतील त्या पुढें प्रसिद्धास येतील.

---

याकूबखान-- काबूलचे माजी अमीर याकुबखान पंजाबांत आहेत. त्यांनीं आतां इकडे बेंरच कर्ज लागलें आहे. कित्येक दिवस ते शिकारीस गेले होते ते नुकतेच परत आले. त्यांच्याकरितां कांहीं सुंदर हत्ती इंग्लिश सरकार खरेदी करणार आहे व त्यांची घोड्यांची पागा वाढविणार आहे. सरकारानें त्याला कांहीं मोजकी नेमणूक करून दिली नाहीं. त्यांनां जो कांहीं खर्च करावा अशी इच्छा असेल तो सरकारांतून केला जातो. त्यांच्या बायका आणि मुलें त्यांच्या जवळ आणून ठेविल्यापासून त्यांची वृत्ती समाधानी दिसते व काबुलचें तोंड पहाण्याचा त्यांचा अगदी इरादा दिसत नाहीं. त्यांनां आत लाहोरास किंवा दिल्लीस कायमचे रहावयास सांगतील असें दिसतें.

छोटा उदेपुर प्रकरणाचे चांगलें चिन्ह दिसत नाहीं. मि० वर्डउड साहेबांनीं चौकशी करून जो अभिप्राय सरकारास पाठविला तो राजपुत्रास प्रतिकूळ दिसतो व त्याची चौकशी होईल अशी गुणगुण निघाली-आहे दुसरीही अशी बातमी आहे कीं नेटिव संस्थानकांच्या हक्कांत हात घालून मुंबई सरकारानें चौकशी करून लोकटीकेस आपणास प्राप्त करून घेतलें हें हिंदुस्थान सरकारास आवडलें नाहीं. तेव्हां आतां अखेर काय होते पहावें.

---

## बाबू लालमोहन घोस. यांचें संभाषण.

एतद्देशिय लोकांचे हक्काच्या संबंधानें जे गृहस्थ विशेष रीतीनें पुढारीपणा पतकरतात त्यांस इंग्लिश लोक कोणत्यारीतीनें लेखितात ह्या विषयाच्या संबंधानें बाबूनीं जे अभिप्राय प्रदर्शित केले ते येणेंप्रमाणें:— नेटिव लोकांस राजकीय हक्क पाहिजेत व त्यांस गोठमोठाल्या अधिकाराच्या जागा पाहिजेत असें ह्मणणोर लोक फारच थोडे असून ते हा उपद्व्याप विनाकारण उभा करितात व त्यांचें ह्मणणें सर्व हिंदु प्रजेस एकसारखें अनुमत नसतें असें पुष्कळ इंग्रजांचें ह्मणणें आहे परंतु हा अपवाद सर्वथैव निराधार व खोटा आहे. अशाच अभिप्रायाचे पुष्कळ निबंध विलायतेंत व इकडे इंग्रजी बर्तमानपत्रांतून प्रसिद्ध [illegible] त परंतु ह्या लोकांस जर बुद्धिपूर्वक खोटें लिहिण्याची इच्छा नसेल तर त्यांनीं आमच्या सभेची हकीकत वाचावि ह्मणजे त्यांची खात्री होइल. इंग्लंड देशांतील जे इंग्लिश लोक अशा एकतर्फी लिहिण्यानें फसल जातात ते दुराग्रही नसल्यामुळें त्यानीं ह्या सभेची हकीकत बाचली असतां त्यांस आपली चूक उत्तम रीतीनें दिसून येइल. एतद्देशिय वर्तमानपत्रकर्त्यांनीही ही गोष्ट लक्षांत बाळगून आपलें कर्तव्यकर्म केलें पाहिजे. व अशा एकतर्फी लिहिण्यांतील खोटसाळपणा सर्व जगास महशूर केला पाहिजे. एतद्देशीय लोक हल्लीं राजकीय हक्क संपादन करण्याविषयीं जी मोठी खटपट करीत आहेत यांत त्यांस यश मिळविणें असेल तर त्यांजमध्यें चांगल्या रीतीची एकी असून ही एकी शक्तिमान इंग्लिश लोकांस जाहीर झाली पाहिजे. इंग्लिश लोकांपैकीं पुष्कळ लोक फार न्यायी आहेत व त्यांच्या हातून अन्याय कधींही घडावयाचा नाहीं परंतु अशा लोकांस आपल्या संबंधाची खरी माहिती समजली पाहिजे. व ही माहिती त्यांस करून देणें हें आपले काम आहे. जर इंग्लिश लोकांची एकवेळ अशी खात्री होईल कीं हिंदु प्रजेचे नावानें ज्या मागण्या होतात त्या सर्व राष्ट्रांचीं आहेत व ती खरी असून कोणी उद्दिष्ट इसमानें उत्पन्न केलेलीं नाहीत तर निःसंशय इंग्लिश लोकांसारखे स्वतंत्र लोक ही मागणी कबूल केल्यांवाचून कधींही रहाणार नाहींत.

हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेच्या संबंधानें हल्लींच्या लिबरल सरकारचें वतन कोणच्या प्रकारचें आहे ह्या विषयाच्या संबंधानें बाबू-लालमोहन घोस यांणीं जे मत प्रदर्शित केलें तें येणेंप्रमाणें:— हलाच्या नव्या सरकारानें जीं वचनें दिलीं आहेत तिकडे लक्ष दिलें असतां त्यानीं राजकीय संबंधानें आजपर्यंत केलेलीं कामें फारच अपुरतीं आहेत असे अभिप्राय कित्येक एतद्देशीय वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत. एतद्देशीय लोकांचा वर लिहिल्याप्रमाणें अभिप्राय व्हावा व ते हल्लींच्या राज्यव्यवस्थापक मंडळीचे संबंधानें निराश व्हावे हें योग्यच आहे व आमचाही कांहीं वेळपर्यंत असाच अभिप्राय होता, परंतु आलीकडे इंग्लंडांतील कांहीं विख्यात पुरुषांशीं ह्या विषयाचे संबंधानें आमचें बोलणें झाल्यामुळें व ह्या संबंधानें आह्मास बरीच नवी माहिती मिळाल्यामुळें आमचा असा अभिप्राय झाला आहे कीं, ह्या नवीन राज्यव्यवस्थापक मंडळीचे कर्तृत्वशक्तीच्या संबंधानें अभिप्राय देण्याच्या कामांत हिंदु लोकांनीं मोठा धिमेपणा व शांतता दाखविला पाहिजे. मागील व्यवस्थापकांनी केलेले अनेक घोटाळे ह्या नवीन व्यवस्थापकांस निस्तरणें भाग झाले आहे व त्यांचे आंगावर पडलेलें हें काम सोपें आहे असें कोणीही समजूं नये. हल्लींच्या नवीन व्यवस्थापकांस प्रथमदर्शनीं हा अफगाणिस्थानांतील लढाईचा बखेडा मोडणें भाग झालें आहे. ही लढाई लिबरल पक्षाच्या लोकांनीं सुरू केली नाहीं व तिजबदल त्यांच्या शिरावर यत्किंचित जबाबदारीही नाहीं ही गोष्ट सर्वत्रांस माहितच आहे. ह्या लढाईच्या संबंधानें जितकें थोडें बोलावें तितकें अधिक बरें होईल असें आह्मास वाटतें. व अशा प्रकारची लढाई बंद करण्याविषयीं हल्लींच्या राज्यव्यवस्थापकांनीं जितकी मेहेनत करावयाची तितकी निःसंशय केली आहे. अफगाणिस्थानांतील लढाई शेवटास लागण्याच्या पूर्वीं ह्या नवीन राज्यव्यवस्थापकांस दुसऱ्या राजकीय गोष्टींकडे लक्ष लावण्यास फुरसत मिळेल असें मुळींच संभवत नाहीं. हिंदुस्थान देशांतील राज्यव्यवस्थेंत ज्या सुधारणा करणें इष्ट आहेत त्या लार्ड हार्टिंगटन यांस सुचविण्याकरितां त्यांजकडे जें डेप्युटेशन गेलें होतें त्यांसही लार्ड साहेबानीं मोकळ्या अंतःकरणानें असें सांगितलें कीं, ह्या सूचनांकडे लक्ष पुरविण्यास तूर्त फुरसत मिळत नाहीं. लार्ड हार्टिंगटन यांचा हा जबाब ऐकून आमचे मनांतील उत्साहबुद्धि फारच दबून गेली होती, परंतु एक दोन दिवसांनीं मि० ब्राईट साहेब यांची आह्मी गांठ घेतली व हिंदु प्रजेचे हिताबदल त्यांस जितकी कळकळ आहे तितकी दुसऱ्या कोणत्याही इसमास नसतां त्यानीं आह्मास असें सांगितलें कीं, तुह्मी लार्ड हार्टिंगटन यांचे संभाषणांतील गर्भित अर्थाचा विचार केल्यास व त्यांची सांप्रतची स्थिति लक्षांत आणिल्यास तुह्मास निराश होण्याचें कारण नाहीं. मि० ब्राईट साहेबांसारिखा दुसरा दयाळू गृहस्थ कोठेंही सांपडणें कठीण आहे, व त्यांच्या ह्या अभिप्रायास फारच महत्व दिलें पाहिजे. मि० ब्राईट साहेबांचे अभिप्रायाप्रमाणें दुसरे पुष्कळ इंग्लिश लोकांचा अभिप्राय आहे व हे अभिप्राय ऐकून आमच्या मनांत जी निराशा पूर्वीं उत्पन्न झाली होती ती पुष्कळ अंशानें नाहींशी झाली. जे गृहस्थ राज्यकारभार चालवितात त्यांस येणाऱ्या अनेक दुर्घट अडचणींची कल्पना बाहेरील लोकांकडून योग्य रितीनें होत नाहीं व प्रसंगविशेषीं असें घडून येतें का, ह्या राज्य व्यवस्थापकांस न्याय करण्याची पूर्ण इच्छा असून व त्यांचें मन सुविचारांनीं पूर्ण रितीनें व्यापिलें असून ज्या गोष्टी अमलांत आणणें त्यांस मोठें इष्ट वाटत असतें त्या गोष्टी त्यांच्या हातून कांहीं कारणामुळें तिळमात्र अमलांत येत नाहींत. पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानचे प्रतिनिधी ह्मणून कोणी एकही इसम नाहीं व हिंदु लोकांत प्रत्यक्ष अथवा परंपरेनें कोणत्याही प्रकारचा राज्याधिकार नाहीं. या शिवाय इंग्लंड देश हिंदुस्थानापासून फार अंतरावर असून तेथील लोकांस हिंदु प्रजेच्या संबंधानें चांगल्या प्रकारची माहिती नाहीं व या कारणामुळें हिंदुस्थानच्या संबंधानें विलायतेंत जे वाद विवाद होतात ते आपल्या इच्छेरूप होत नाहींत. आह्मी लिबरल पक्षाचे वकीलपत्र घेऊन त्यांची बाजू साजरी करण्याकरितां येथें आलों आहोत असें कोणी समजूं नये.. एखादे पक्षास मदत देण्यापेक्षां त्याजवर हल्ला ह्मणजे टीका करणें ही गोष्ट आह्मास फार प्रिय आहे. परंतु असें असतां ही न्यायदृष्टी सोडून देणें योग्य नाहीं. सबब आमचा असा अभिप्राय आहे कीं. आपला मागणी पुढें करण्याच्या कामांत नेहमीं अधिकाधिक मेहेनत घेत जावी व ह्याच वेळेस व्यवस्थापकांच्या अडचणी मनांस आणून त्यांस घाईनें विनाकारण दूषण देऊं नये. वर लिहिलेल्या कारणामुळें आमचा असाही अभिप्राय झाला आहे कीं, इंग्लंड देशांतील प्रधान मंडळांत नुक्ताच जो फेरफार झाला आहे तो फार अभिनंदनीय आहे. हल्लींचे प्रधानमंडळास सर्व रयतेस न्याय करण्याची खरोखर जितकी मनापासून इच्छा आहे तितकी दुसरे ठिकाणीं सांपडणें अशक्य आहे, व ज्या प्रधान मंडळाचें अध्यक्षपण मि० ग्याडस्टन यांजकडे असून ज्यांत मि० ब्राईट व मि. फासेटसारखे जगविख्यात पुरुष आहेत त्या प्रधान मंडळावर हिंदु प्रजेनें भरवसा ठेवून शांतता धरावी व घाईनें निराश होऊं नये हेंच योग्य आहे. ज्याप्रमाणें इंग्लंडांत राज्यव्यवस्थापकांची बदली झाली त्याप्रमाणें हिंदुस्थान देशांतही थोडीसी बदली झाली आहे ही गोष्ट मोठ्या आनंदाची आहे. राणी सरकारचे प्रतिनिधी ह्मणून जे ग्रहस्थ इकडे आले आहेत ते आपले कामास नीटे आहेत ह्मणून त्यांच्या संबंधानेंही शांतता धरणें बाजवी आहे. हल्लींच्या व्हाईसराय साहेबांची कारकीर्द रयतेस मोठी हितावह व फायदेशीर होईल असें मानण्यास चांगला आधार आहे. कारण इंग्लंडांत जे अति विख्यात राजनीतिज्ञ ग्रहस्थ आहेत त्यांचा लार्ड रिपन साहेबांवर पूर्ण भरवसा आहे.

---

We have received the Report on the administration of the Registration Department of the Hyderabad Assigned District for the year 1879—80.

The opening of the Registration Department began in the year 1868—69 and the number of documents registered has increased from 6000 in that year to 20,000 in the year under review, a marvellous increase no doubt, but the great strides made in the registration of documents is owing a great deal to compulsory regis-

tration which in the year 1878-79 aggregated 9658 while in 1879-80 it rose to 13514.

There has been an increase in the registration of optional documents, but these have maintained a steady increase by no means proportionate to that of compulsory registration.

There are 44 offices for registration now open in Berar of these 6 are district Registrar's offices viz, one in each District, 18 ex officio Sub-Registrars, or an average of 3¼ each District, 4 sub Registrars, 5 special sub-Registrars, and 11 Rural sub-Registrar's offices.

The Department began with 28 offices and there is no doubt that the flourishing condition of the Department notwithstanding that it has been very nearly doubled since its organization speaks volumes in favor of it. The inhabitants of Patoor in the Akola District have petitioned for the establishment of a rural registration office there. The officiating Commissioner Colonel Bell and the Resident Colonel Meade K. C. S. I. have noted this fact with satisfaction and the means of registration which is compulsory will soon be brought nearer to the doors of the people.

The Registration work during the year has been as follows, compared with the previous year.

| | 1878–79 | 1879–80 |
|---|---|---|
| Akola | 5334 | 7455 |
| Buldana | 2274 | 2823 |
| Bassim | 551 | 932 |
| Amraoti | 3863 | 5530 |
| Ellichpur | 2251 | 2886 |
| Wun | 366 | 710 |

The offices which have registered 1000 documents and upwards are the Sub-Registry offices at, Amraoti 1798.

| | |
|---|---|
| Amraoti | 1798 |
| Telhara | 1593 |
| Julgaum | 1483 |
| Akote | 1461 |
| Akola | 1180 |

Except at Jalgaum all the remaining offices have been worked by special sub-registrars.

The Jalgaum Tehsildar has deservedly won a well earned praise for the work of registration. Major Grant remarks "The Jalgaum Tehsildar Mr. Ardesar it will be observed registered more documents than four of the special sub-registrars, who have no other work to do. His office is reported as being in a very satisfactory state, and I think he deserves great credit for the care and attention he gives to registration work. It will be necessary I think to appoint a special Sub-Registrar here as it is hardly fair to expect him to carry on the amount of registration work in addition to his other duties."

The receipts in the year 1870-71 under ordinary fees paid for compulsory registrations amounted to Rs. 9611 while in 1878-79 they reached the high figure of 13,061 and in the year 1879–80 they amounted to 19,036. The total value of immovable property transferred rose from 25 57,120, in 1870-71 to 3940363 in 1879—80 The working of the Department has resulted in a surplus of Rs. 17920.

An Inspector of Registration has been newly appointed and the pay of the clerks at Akola and Amraoti have been raised. As far as we have had a knowledge of things it appears to us that the pay of these Registration Clerks at Akola and Amraoti is miserably small more so as they are obliged to possess a knowledge of Marathi as well as of English to perform their duties, and if it is expected that efficient and intelligent men should remain and render real service to the Department their salaries ought to be made worth their while to remain.

The abolition of commissions and the substitution of paid permanent establishments is an economical reform.

Major Grant has received the commendation of the Commissioner as well as that of the Resident for the services rendered by him in the Registration Department

---

There are in all 1289 candidates, who have applied for permission to attend the Matriculation Examination, which commences today, the 15th instant at Bombay. Of these 647 from Bombay; 225 from Poona; 226 from Ahmedabad; 143 from Belgaum and only 48 from Karachi.

As usual, the greatest number is of Hindus and Parsis and the least is of christians and Mohomedans.

Amongst the lot of candidates, whose names are published alphabetically in the Bombay Government Gazette ( Extraordinary ) of the 6th instant; there appears to be a name belonging to the delicate sex. Putlibai Dhunjibhoy Wadia, it is a Parsi name of lady ! This is the first instance of its kind this year, and it is really gratifying to see that a Parsi lady has rushed daringly forward, as a candidate for a difficult task of the Matriculation Examination.

Let us, on this perticular occasion, congratulate our Parsi-Brethren, wishing at the same time, the lady candidate, every success and happiness in her landable undertaking ! !

---

There is a woman in England says the Amrita Bazar Patrika, an English Weekly, published at Calcutta, who has been delivered of seven children in two years. Twins twice and a triplet. She is only 25 years of age. This is something very strange, indeed!

## वऱ्हाड

सर रिचर्ड मिड साहेब रेसिडेंट लाहोराकडून परत येऊन हैदराबादेस गेले. ९ वे तारखेस रात्रौ भुसावळ मुक्कामीं त्यांनां भेटण्यास कर्नल बेल साहेब कामिशनर गेले होते व भेट घेऊन दुसरे दिवशीं पहाटे परत आले.

---

कर्नल वुपवीं साहेब जुडिशल कमिशनर यांची स्वारी बुल्ढाणे जिल्ह्यांत आहे.

---

मेजर बुल्क साहेब विलायतेचे रजेवरून परत गुरुवारीं एथें आले. व उमरावतीस डिपुटी कमिशनरचे कामाचा चार्ज घेण्याकरितां शुक्रवारीं तिकडे गेले.

---

मेजर लेन साहेब इन्स्पेक्टर जनरल विलायतेहून मुंबईस परत आले. आज उमरावतीस जाऊन रुजू होणार होते.

---

मेजर फ्वारर साहेब विलायतेहून परत आले. त्यांची नेमणूक वाशिमास डिपुटी कमिशनरचे जागीं होऊन ते लवकरच तिकडे जाणार आहेत.

---

रेसिडेंट साहेब मार्च महिन्यांत विलायेतस जाणार व पुढे पेनशन घेणार असे इंग्लिश पत्रांतून वर्तमान आहे.

---

हल्लीं असेलेल इन्स्पेक्टर जनरल मेजर ग्रांट साहेब उमरावतीचे स्माल काज जडज होणार, व मि० किटस साहेब खानेसुमारीचे कामानिमित्त प्रांतांत फिरणार असे समजतें.

---

रा. रा. नारायण भाई साहेब दांडेकर विद्याखात्याचे डायरेक्टर यांची स्वारी प्रांतांतील शाळा पहाण्याकरितां गुरुवारीं, एथून निघाली. पहिला मुक्काम बोरगावचा होता.

---

उदईक एथील म्युनिसिप्यालिटीची जनरल कमेटी आहे. व पुढील वर्षाच्या जमाखर्चाचे बजेटाचा तींत विचार होणार आहे.

---

रा. रा. भास्कर महेश्वर खापर्डावले तहशिलदार ३ महिन्यांचे रजेवर जाऊन इलिचपुरचे डिपुटी क्लार्क रा. रा. गणेश गोविंद त्यांच्या जागेवर अकिंटग जाणार असें कळतें.

---

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार इजुकेशनल इन्स्पेक्टर शाळा पहायाण्यास निघाले व काल बाळापुरास गेले.

---

मि० ए. लिंवैथा व मि० एच आर. एफ. आश यांस सेकंड ग्रेड असिस्टंट इंजिनियर नेमिले.

---

मेजर लडलो साहेब सी. आय. ई असिस्टंट कामिशनर विलायतेस रजेवर आहेत त्यांस कामावर येण्याची परवानगी मिळाली.

---

मध्यप्रांत आणि वऱ्हाड याचे डिपुटी पोस्ट मास्तर जनरल १० वे तारखेस एथें आले होते. पोस्ट आफिसाची तपासणी करून नागपुराकडे गेले— मि० बिथाम साहेब पोस्टा कडील सुप्रिंटेंडेंट जालना औरंगाबाद वगैरेकडे गेले आहेत.

---

निजाम स्टेट रेलवेवरून आगष्ट महिन्यांत ९७९८ टन माल आला गेला व त्याजबद्दल ३९,८९२ रुपये मिळाले. हे गुदस्त सालांतलि या माहिन्याचे उत्पन्नापेक्षां ३,८३४ रुपयांनीं अधिक आहेत.

---

उमरावती रेलवेवर सपटंबर महिन्यांत १,००० टन माल आला गेला व त्याचें उत्पन्न १,६९७ रुपये झाले. गुदस्तां १,१९३ रुपये झाले होते.

---

मलकापुरचे पोस्टमास्तर आजारी होऊन त्यानीं रजा घेतली त्यांचे जागीं खामगावचे क्लार्क यांस नेमिलें. तेथें कोणा नवीनच मनुष्यास नेमणार अशी वदंता आहे. पण तसें न होईल तर चांगले असें एकजण लिहितात.

---

इलिचपुरचे डिपुटी कामिशनर मे० मेकेंजी साहेब व उमरावतीचे आफिशियेटिंग डिपुटी कामिशनर मि० निकोलेटस साहेब विलायतेचे रजेवर जाणार असें वर्तमान आहे.

---

अकोल्याच्या नेटि[illegible] जनरल कमिटी भ[illegible] व म्यानेजिंग कमि[illegible] झाल्या.

---

मि० हिजिन्स [illegible] म वऱ्हाडचे फर्स्ट-ग्रेड असिष्टंट इंजिनियर यांची पारिक्षा पास झाली व त्यांस टेंपररी फोर्थग्रेडएकझिक्युटीव इंजिनियर नेमिले

---

मेजर फार्बस साहेब टेंपररी फर्स्ट[illegible] ऑफिसिएटिंग इंजिनियर होते ते सपटंबरच्या १९ वे तारखेपासून कायम झाले.

---

अकोला, वाशीम, उमरावती आणि इलिचपुर या जिल्ह्यांतील लहान लहान पोस्ट आफिसांकरितां ६० रुपये पगाराचा एक इन्स्पेकटर नेमण्याचा विचार चालला आहे व ती जागा मंजूर झाल्यास सुप्रिंटेंडेंट साहेबाचे क्लार्क रा. रा वासुदेव बळवंत यांस ती देतील असें दिसतें.

---

मोर्शी तालुक्यांत वरूड येथें पोलिस आकटाचें ३४ वें कलम लागू केलें.

---

मि० डनलप साहेब बुलढाण्याचे आफिशियेटिंग डिपुटी कामिशनर यांस खाली लिहिलेले अधिकार दिले.

१ क्रिमिनल प्रोसिजर ३६ कलमांतील अधिकार.

२ कोणत्याही प्रकारचे व कितीही रकमाचे दिवाणी मूळ दावे पाहण्याचा अधिकार व एक हजार रुपयापर्यंतचीं अपिलें पाहण्याचा अधिकार

३ क्रिमिनल प्रोसिजर २७ कलमाप्रमाणे दुसरे व तिसरे वर्गाचे माजिस्त्रेटचे ठरावावर अपिलें घेण्याचा अधिकार व समरी चौकशी करण्याचा अधिकार

---

वर्तमानसार.

पार्लमेंटसभेच्या सभासदांच्या निवडणुकींत लाच खाणें वगैरे अनीतीचे प्रकार होत असतात असा बोभाटा झाल्यावरून त्याजबद्दलची चौकशी करण्याकरितां कांहीं मंडळ्या नेमल्या होत्या आणि त्यांनीं केलेल्या चौकशीवरून ही गोष्ट खरी ठरल्याचें समजतें.

कान्स्टांटिनोपल येथून ता० ३ नोवेंबर रोजीं आलेल्या तारेवरून असें कळतें कीं, तुर्कस्थान सरकारचें जें सैन्य हेतेलो व इपायर्स येथें आहे त्याची संख्या वाढविण्यांत येत आहे.

अमेरिका खंडांतील संयुक्त संस्थानांचे अध्यक्ष जनरल गारफिल्ड यांस नेमण्यांत आलें.

लंडन येथून ता० १ मिनहू रोजीं आलेल्या तारेवरून असें कळतें कीं, इराणच्या शहानीं खुर्द लोकांवर जें सैन्य पाठविलें होतें त्यांणीं खुर्द लोकांचा पूर्ण रीतीनें पराजय करून कुल्मीयह नांवाच्या शहराचें संरक्षण केलें, व हल्लीं खुर्द लोक तुलक येथून मागे हटले असून ते शरणागत झाले आहेत. खुर्द लोकांनीं शहाच्या मुलुखांत फार मोठी बंडाळी सुरू केली असून त्यांनीं आजपर्यंत सुमारें १७० लहान मोठीं शहरें लुटलीं अशी खबर आहे.

लंडन येथून आलेल्या तारेवरून असें कळतें कीं, बरमिनघम येथें लार्ड नार्थब्रुक यांणीं नुक्तेंच एक भाषण केलें. ह्या प्रसंगीं लार्ड साहेबांनीं नेटिव राजे रजवाडे यांच्या वर्तणुकीबद्दल व राजनिष्ठेबद्दल मोठी शिफारस केली. लार्ड नार्थब्रुक यांणीं या प्रसंगीं आणखी असेंही बोलून दाखविलें कीं, एतद्देशीय राजे रजवाड्यांच्या संबंधानें हिंदुस्थान सरकारानें तहनाम्यांबरहुकूम वर्तन ठेविलें पाहिजे, व सरदार आणि सुशिक्षित लोकांचे हितास अनुकूल अशा गोष्टी करून त्यांजकडे राज्य कारभाराचें काम जितक्या रीतीनें देववेल तितक्या रीतीनें दिलें पाहिजे. इंग्रज सरकारांनीं नेटिव आफिसर्स व शिपाई लोक यांस नेहमीं खुष ठेवून बक्षिसें दिलीं पाहिजेत, व लोकांवर शांततेनें व गांभीर्यानें राज्य करून एखादि नवीन व्यवस्था सुरू करणें झाल्यास ती क्रमाक्रमानें व सावधगिरीनें अमलांत आणिली पाहिजे. हिंदुस्थान सरकारचें वर्तन नेहमीं हिंदु प्रजेच्या हितावर अवलंबून असलें पाहिजे, व देशांत शांतता सदैव कायम ठेविली पाहिजे.

कंदाहार स्टेट रेल्वेचें काम सिबीचे पुढें १४ मैलपर्यंत तयार करण्याविषयीं सरकारचा हुकूम झाला आहे.

कंदाहारचा प्रांत सरकारानें कबजांत ठेविल्यास दरसाल ३ कोट रु० खर्च लागेल असा अंदाज आहे, व सदर्हू ठिकाणचें उत्पन्न सालीना पांच लक्ष रुपयांहून अधिक होईल असें वाटत नाहीं. कंदाहार रेल्वेनें द्रव्यद्वारा फायदा होईल असेंही सांगतां येत नाहीं. कंदाहार येथें सर्व बाजूनें जनावरांची फार तूट आहे. कंदाहारपासून तों किला अबदुला पर्यंत पेरणी वगैरे कांहीं एक झाली नाहीं, व पर्जन्यवृष्टीची नेहमीं तूट असल्यामुळें पिण्याचें पाणी फार दुर्मिळ आहे.

श्री० हरी गणेश ऊर्फ अण्णा साहेब पटवर्धन सांगली संस्थानचे माजी दप्तरदार हे बरेच दिवस आजारी असून औषधोपचार करण्यासाठीं काशीस नुक्तेच गेले होते, तेथून परत येतांना वाटेंत गेल्या शनवारीं त्यांस देवाज्ञा झाली. हें कळविण्यास वाईट वाटतें.

पुढील सालचे जानेवारीपासून दौन्ड व मनमाड स्टेट रेल्वेची लाईन जी. आय. पी. रेल्वे कंपनीचे ताब्यांत देण्यांत येणार.

मायजीची वार्षिक जत्रा येत्या फेब्रुवारीच्या २१ व्या तारखेस सुरू होईल.

डलसिगनो स्वाधीन करण्याचें काम रजापाच्छा यांस सोपलें असून तें स्वाधीन करण्याचा जाहिरनामा रजापाच्छा यानें एका जासुदाबरोबर देऊन पाठविला असतां वाटेंत त्या जासुदाचा खून झाला.

गेल्या पहिल्या तारखेपासून जबलपूर मेल आगगाडी दोन तास पूर्वीं म्हणजे सवा आठ वाजतां मुंबईस पोंचू लागली.

बलगेरियन लोक आपल्या हद्दींतील मुसलमान प्रजेस फार क्रूरपणानें वागवितात अशाबद्दल टर्कीच्या सुलतानानें आजपर्यंत तीन वेळ युरोपांतील बड्या राजांस लेखी कळविलें, पण अजून बड्या राजांनीं त्याचा कांहींच विचार केला नाहीं असें म्हणतात!

रंपा दर्‍यांतला वल्लहरी जगया हा फरारी झाला असून त्यास धरण्याबद्दल १००० रुपयांचा जाहिरनामा लागलेला आहे. त्याणें कित्येक लोकांसह नुकताच एक बडा दरवडा घातल्या वरून ३६ व्या पलटणीच्या ५० शिपायांस ता० ११ रोजीं त्या कामावर पाठविलें आहे.

लाहोर येथें लवकरच दरबार होणार असल्यामुळें शहरांतील सर्वांनीं आपलीं घरें रंग वगैरे लावून सुशोभित करावीं व दर्शनी बाजूस मोडकळीस आलेले भाग तावडतोब दुरुस्त करावे असा सक्त हुकूम झाला आहे.
ज्ञा. प्र.

धुळें - रा. ब. दप्तरदार साहेब यांची गाडी मागील दारीं ठेविलेली चोरीस गेली. तपास लागला नाहीं.
आ. ब.

धाराशिव तालुक्यांत ( मोगलाई ) गारांचा पर्जन्य पडून पिकांचें बरेंच नुकसान झालें असी खबर आहे.

सोलापुर— सालमजकुरीं या जिल्ह्यांत व हुतकरून पर्जन्याचे संबंधानें फारसा बोभाट नाहीं. तथापि दुष्टींचे कांहीं अकल्पित संकटें पिकांवर येऊं लागलीं आहेत हें पाहून कांहींशी भीति वाटते. सोलापुर तालुक्यापैकीं कांहीं गांवीं हुमणी म्हणून एक प्रकारचे किडे जमीनींत उत्पन्न झाले असून ते पेरलेले पिकास मोड आल्या कीं खाऊन टाकतात. यामुळें त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांनीं दोन दोन तीन तीन वेळ पेरण्या केल्या तरी त्यांचा या किड्यांनी फडशा उडविला. पेरलेला जो धळा किड्यांनीं खाला व नवीन पेरण्याचा आतां हंगाम नाहीं सबब कित्येक शेतकऱ्यांनीं आतां हरभरा पेरण्यास सुरुवात केली आहे असें कळतें.
क. त.

गेल्या ता. १८ जुलई पासून ता. २० अक्टोबर पर्यंत सुमार तीन महिन्यांत मुंबईहून मक्केस १०,००० मुसलमान यात्रेकरू गेले, व अद्यापि २,००० यात्रेकरू जावयाचेच आहेत असें समजतें.

मि. लायल आणि सर राबर्ट सांडिमन हे हिंदुस्थानास परत येण्याकरितां मागील रविवारीं कंदाहार येथून निघाले.

वायव्य प्रांतांत बरेच लोक अन्नास महाग झाले असून त्यांची स्थिति पाहण्याकरितां तेथील लेफ्टनंट गवरनर हे स्वतः जाणार आहेत असें कळतें.

काबुल येथील लोक अबदुल रहिमानावर फार नाखुष आहेत, व असें होण्याचें कारण त्याच्या मनाचा कल रशियाकडे आहे असें तेथील लोकांस वाटत आहे म्हणतात.

दुष्काळ कमिशनाच्या रिपोर्टाचा दुसरा भाग बाहेर पडला असून यांत शेतकी आणि दुष्काळ संबंधीं निराळें खातें काढून निराळे आफिसर नेमावे म्हणून सूचना केली आहे!!!
इं. प्र.

## आरोग्यशास्त्र

चहा— यांत दोन प्रकार आहेत; काळा व हिरवा चहा. काळ्याचे प्रकार सौच्याग, कांगू, ऊलांग आणि पीको. हिरव्याचे हैसन, हैसन स्केम, टवांके, केपर व गनपौडर. वाळलेल्या चहाच्या पानांत त्यांतील मुख्य तत्व "थीईन" शेकडा १.८ असतें. खेरीज २.६ आल्ब्युमेन, ५.७ डेक्स्ट्रीन; २२ तंतु; १९ ट्यानिन. खेरीज तेल, मेण व गोंद ही त्याच्या अंगीं असतात. थीईन जितकें जास्त तितका चहा जास्त मोलवान. चहाकरितां कढवलेल्या पाण्यांत जर चुना किंवा लोह ह्यांचा अंश असला तर चांगला चहा बनत नाहीं म्हणून असल्या पाण्यांत पूर्वीं थोडा शुद्ध पापडखार टाकावा व १५।२० मिनिटें पर्यंत पाणी कढत ठेवून नंतर चहावर आतावें व वर झांकण ठेवावें.

चहा प्याल्यानें मज्जा मंडळांत उत्तेजन येऊन अंगांत हुशारी आलीशी वाटते. गरम गरम चहा प्याल्यानें हुशारी जास्त वाटते. कोठल्याही कैफानें अशीच अंगांत पहिल्यानें हुशारी येते परंतु ती निघून गेल्यावर जसें गळाल्यासारखें वाटतें तसें चहानें होत नाहीं. चहानें नाडीची गति वाढते. श्वासोश्वासादि क्रिया जलद चालूं लागतात. अंगास थोडा घाम सुटतो. शौचाला थोडें कबज धरतें व लघवी जास्त होते. चहा हलका असतो व तो तयार करविण्यास फारसे श्रम पडत नाहींत म्हणून तो प्रवासांत नेहमीं बरोबर ठेवण्यास मुळींच हरकत नाहीं. ह्यापासून विषम ज्वराची भीति नाहींशी होते असें कित्येकांचें म्हणणें आहे.

चहा विकत घेतांना तो फार चेंगरून चुरा झालेला नसावा; तसेंच आंत केरकचरा फारसा असूं नये, आंतील पत्ते सर्वच मोठे, जून, जाड व काळे असूं नयेत तर त्यांत कांहीं लहान व कोंवळे असावे. उत्तम जातीच्या चहांत नेहमीं त्याचे देठ व फुलें बरींच असतात. जुन्या चहाला वास चांगला येत नाहीं. चाहा बनल्यावर त्या पाण्याला उत्तम वास यावा. स्वाद मधूर असून कडवटपणा नसावा. तसेंच तयार झालेल्या पाण्याला रंग काळसर नसावा. चाहाच्या पत्यांत भेळ बरीच असते म्हणून त्याची परीक्षा करण्याची रीत थोडक्यांत सांगतों. चाहा बनवल्यानंतर त्यांतील पाला घेऊन त्यांपैकीं कांहीं पत्ते उघडून एका स्वच्छ कांचेच्या तुकड्यावर पसरावे व वर तसाच दुसरा एक पातळ कांचेचा तुकडा ठेऊन उजेडांत ते दोन्हीं धरावे. खऱ्या चाहाच्या पानाचे कांठ कांतल्यासारखे एक देंठाच्या दोन्हीकडील थोडथोडा भाग सोडून बाकी सर्वभर असतात आंतील शिरा मध्य शिरापासून निघून कांठापर्यंत जाऊन त्यास न मिळतां किंचित आंतल्याबाजूस वळतात व त्यांच्या अग्रामध्यें व पानाच्या काठामध्यें थोडा भाग रहातो. पानें लहान मोठीं यावर कांहींच प्रमाण नाहीं. परंतु वर सांगितलेल्या शिरांचे रचनेवर मुख्य लक्ष दिलें पाहिजे. व्यापारी लोक कधीं कधीं एकदा बनलेल्या चहाचा पाला वाळवून पुनः दुसऱ्या चाहांत भेळून विकतात हें मात्र शोधून काढणें साधारण मनुष्यास बरेंच कठीण आहे.

चहा व काफी पिणारे आजीकडेस सहस्त्रावधि लोक सांपडतील. तर इतके लोक त्याच्या नादीं लागले आहेत याचें कारण काय! असा सहज प्रश्न निघतो. हे दोन पदार्थ सर्व प्रतीच्या लोकांचे उपयोगी आहेत. ज्यांस विचार शक्ति जास्त खर्च करावी लागते त्यांच्या शक्तीची वृद्धि होऊन तीस तीव्रपणा जास्त येतो. तसेंच अंगमेहनत करणाऱ्यास त्याच्या योगानें नेहमीच्याच अन्नावर जास्त मेहनत करण्याची शक्ति अंगांत येते. अन्न नेहमींपेक्षां थोडें कमती असलें तरी काम करण्याची हिम्मत खचत नाहीं किंवा शक्ति कमी पडत नाहीं व अन्न कमी झाल्यानें शरीर वजनानें कमी पडत नाहीं. खाणेंपिणें बरोबर जर आहे तर चहा काफीनें मनुष्य वजनानें जास्त वाढेल यांत संशय नाहीं. बाहेरून चिंतांत त्रस्त होऊन घरीं आल्यावर काफी किंवा चहा यांच्यासारखे शांती व आराम देणारे दुसरे पदार्थ नाहींत असें म्हटलें तरी चालेल. परंतु उत्तेजनार्थ काफी किंवा कडक चहा लहान मुलांस कधीं देऊं नये. कारण त्यापासून मग त्यांचें जास्त उत्तेजन येते व तें जास्त झाल्यास आंकडी येऊं लागते. हिरव्या चहाला काळ्या चहापेक्षां स्वाद जास्त असतो परंतु तो शरीराला फार बाधक आहे म्हणून नुसता त्याचा उपयोग करूं नये. सुवासाकरितां काळ्या चहांत तो थोडा टाकावा. हिरव्या चहानें प्रकाशय बिघडून हातापायांना कंप सुटतो, व झोप नाहींशी होऊन काळजांत कापरें सुटतें. नेहमीं ह्याचा उपयोग केला तर, दररोज अन्नपचन होत नाहीं, मनांत भित्रेपणा उत्पन्न होऊन केव्हां केव्हां सर्व शरीर निर्जीव होऊन रहातें. म्हणून ज्यांस चहाची जरूरी आहे त्यांनीं हिरवा चहा सर्वथैव वर्ज करून नेहमीं काळ्या चहाचा उपयोग करावा. आमच्या लोकांत लहान मुलांस फक्त काफीवर कित्येक ठेवतात तर ही मोठी चूक आहे. तसेंच उपोषणाच्या दिवशीं किंवा अडचणीच्या प्रसंगीं प्यालेच्याप्याले चहा पिऊन लोक फक्त त्यावरच रहातात असें केल्यानें क्षुधामंद होऊन विकार उत्पन्न होतात. प्रत्येक मनुष्यास प्रतिदिवशीं निरनिराळ्या वेळीं मिळून दोन प्याले काफी किंवा चहा मिळाला तर पुरे आहे.

हल्लीं हिंदुस्थानांत चहाचें पीक बरेंच होत आहे व हा चिनी चहापेक्षां चांगला आहे असें पुष्कळांचें म्हणणें आहे.
सु. प.

☞ हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख २२ माहे नोवेंबर सन १८८० इसवी. अंक ४६


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार डाक इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल

## नोटिसांबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ८२ |

## जाहिरात.

### लोहमार्ग

अथवा.

### मराठी आगगाडी.

( १० आवृत्ती )

मुख्यत्वेंकरून रेल्वेकडील लोकांकरितां व ज्यांस शास्त्रीय विषयाची अभिरुची आहे अशांकरितां आगगाडीच्या विशेष माहितीचें मराठी भाषेंत नवीन पुस्तक. किंमत २ रुपये आणि टपाल खर्च ४ आणे. पुस्तकें मुंबईत इंदुप्रकाश छापखाना, गोपाळ नारायण आणि कंपनी, काळबादेवीचा रस्ता आणि पुण्यांत ज्ञानप्रकाशांत रोख किमतीस ता० १५ नोवेंबर पासून विकत मिळतील.

विशेष सूचना — सदर विषय इतर देश भाषांतून प्रसिद्ध व्हावा व तसा करण्यास सदर पुस्तकापासून यत्किंचित् मदत व्हावी ह्मणून ह्या पुस्तकांत, उर्दू हिंदी आणि गुजराथी टाइटल व अनुक्रमणिका हीं घातलीं आहेत. शिवाय मराठी मुळाक्षरांत तारायंत्रद्वारा ( इंग्रजी मुळाक्षरांप्रमाणें ) पाठवितां यावें ह्मणून तारायंत्राच्या खुणा बसवून घातल्या आहेत.

विष्णु चिमणाजी कर्वे,
स्टेशनमास्तर सनावद.
होळकर स्टेटरेल्वे.

## शोध पाहिजे.

**अवश्य वाचा.**

जिल्हा खानदेश पैकीं तालुका चाळिसगांव यांतील चाळिसगांवीं एक मुलगा राम नांवाचा उमर वर्षे अजमासें १३।१४ चा आला असून सांगतो कीं सोलापुराकडील दुष्काळाच्या वेळीं माझी विधवा आई नांवें काशीबाई ही मला बरोबर घेऊन देशावर निघाली, आणि सुरत मुक्कामीं मला निजलेला टेवून निघून गेली. कोठें गेली हें मला माहित नाहीं आई सांगत असे कीं आपण ऋग्वेदी ब्राह्मण असून कोल्हापुराकडे निव गांव आहे तेथील राहणारे आहोत. मला भाऊबंद वगैरे हे आहेत कीं नाहीं हें मला माहित नाहीं, व माझी मौंज झाली नाहीं अशी हकीकत आहे.

ह्मणून आह्मीं सर्व देशबंधूस व वर्तमानपत्रकर्त्यांस विनंती करितों कीं, उदार बुद्धीनें ह्या गरीब मुलाच्या आईचा व जातीचा अगर याच्या आप्तवर्गाचा शोध लावल्या पत्यावर कळवावा व सर्व वर्तमानपत्रकर्त्यांनीं माय लेंकराची गाठ घालण्याकरितां किंवा याची जाती कळल्यास चाळिसगांवीं आह्मी याची मौंजी बंधन करूं ह्याकरितां ही जाहिरात निदान तीन वेळ तरी प्रसिद्ध द्यावी.

मुक्काम चाळिसगांव ता. १२ नोवेंबर सन १८८०

माधवराव रघुनाथ देवभानकर
व वासुदेव रामचंद्र मोहनी हेडमास्तर
चाळिसगांव

## वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक मंडळीकडून.

देण्यांत येते कीं, येत्या डिसेंबर महिन्याची तारीख २४ रोज शुक्रवार पासून या मंडळीचा पुढें लिहिले विषयांत उमेदवारांची परीक्षा घेऊन बक्षिसें देण्याचा वार्षिक समारंभ सुरू होणार आहे. याजकरितां ज्या उमेदवारांची परीक्षेस येण्याची इच्छा असेल त्यांचे लेखी अर्ज खालीं सही करणाराकडे "प्रमोदसिंधु" छापखान्याच्या पत्त्यावर तारीख १२ माहे डिसेंबरच्या आंत पोंचतील असे यावे.

विषय १ ला—" आपल्या देशांत पूर्वी प्रत्येक गावीं पंच मार्फत पंचायती होत असत यांपासून कोणकोणते फायदे होत होते त्याविषयीं माहिती देणें. हल्लीं सरकारची ह्या कामांत कोणत्या प्रकारची मदत आहे व पंचमार्फत आतां कोणचीं कामें होण्यासारखीं आहेत हें सांगावें. पंचाचे आंगीं कोण कोणते गुण असावेत "

विषय २ रा—" सुधारलेल्या देशांत खानेसुमारी करितात, तींत कोणती माहिती साधारणपणें मिळवितात, त्या माहिती पासून जे फायदे होतात ते कांहीं देशांतील खानेसुमारीचे आंकडे घेऊन स्पष्ट करून दाखवावे. आपल्या देशांत खानेसुमारी विषयीं लोकांचे वाईट समज असतील ते दूर करावे.,,

येणेंप्रमाणें दोन विषय नेमिले आहेत. पहिल्या विषयांत पहिलें बक्षीस रुपये ३० चें व दुसरें रुपये २० चें नेमिलें आहे. दुसऱ्या विषयांत पहिलें बक्षिस रुपये २५ चें व दुसरें रुपये १५ चें नेमिलें आहे.

परीक्षेस येणारे उमेदवारांनीं समारंभाचे पूर्व दिवशीं या सभेच्या चिटणिसास भेटावें.

उमेदवारांस लागू असण्याचे नियम खाली दिले आहेत त्यांकडे अवश्य लक्ष द्यावें.

१ उमेदवाराचें वय १६ वर्षांपेक्षां कमी नसावें.

२ उमेदवारानें उभे राहून भाषण करावें व जवळ लेखी टिपण बोलते वेळीं ठेवूं नये.

३ प्रत्येक उमेदवारानें अर्ध्या तासावर भाषण करूं नये. परंतु जरूर वाटल्यास भाषण करणारास अर्ध्या तासापूर्वींच रजा देण्याचा व वाटल्यास मुदत अधिक एक तासपर्यंत वाढविण्याचा अधिकार परीक्षकांस आहे. कोणी कोणाही व्यक्तीस अनुलक्षून लागून भाषण करील किंवा सरकाराच्या किंवा धर्माच्या विरुद्ध भाषण करील किंवा बीभत्स शब्द भाषणांत घालील तर त्याचें भाषण बंद करण्यांत येईल.

४ ज्या उमेदवारांचे निरनिराळ्या विषयांत अधिक गुण लागतील त्या उमेदवारांस बक्षिसें दिलीं जातील परंतु एक तृतीयांशापेक्षां गुण कमी लागल्यास मुळींच इनाम दिलें जाणार नाहीं.

सन्मानार्थ नेमलेल्या अगर दुसऱ्या एकाद्या स्वतंत्र विषयावर कोणाची भाषण करण्याची इच्छा असल्यास त्यांस परवानगी आहे.

उमरावती तारीख २८ अक्टोबर १८८०

यशवंत गोविंद
सभेचे चिटणीस.

## सुबोधसार

भाग पहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारांस विशेषेंकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषासही व्यवहारांत समयविशेषीं कसें बोलावें व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखें आहे हा ग्रंथ जाड कागदावर खिळेछापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ८१० आणे टपाल खर्च ८८६ आह्माकडे पाठविल्यास पुस्तक तावडतोब रवाना केलें जाईल. कळावें ता. २६ आक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

## नोटिस

आकाजी वल्लद उकरडा कुणबी वगैरे वस्ती मौजे मागल प्रगणे माहागाव तालुके दारव्हा जिल्हे वणी यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं पूर्वी मी नोटिस तारीख ५।१०।८० इसवी रोजीं दिली त्याचा जबाब ता. २५।१०।८० इसवीचा आला तो ता ९।११।८० इसवी रोजीं पोहचला. ता. ५।१०।८० इसवीची नोटिस दिली त्याचा जबाबदार न होतां मायबापाचे फंदानी लागलीस त्यास हें बरोबर नाहीं. १५ दिवसांचे आंत माझे घरीं यावें. ह्मणून लिहिलें त्यास तुह्मी मनुष्यांत नसोन तुह्मी घरीं एकही दिवस राहत नाहीं व मनुष्यांत नसल्याकारणानीं तुमचा बाप मजवर जबरदस्ती करीत आहे हें मला सोसवत नाहीं यास्तव ही अखेरची नोटिस देण्यांत येते कीं मला बापाचे घरीं दोन वर्षे अकरा महिने झाले असून अन्न खर्च दरमहा रुपये ४ प्रमाणें १४० रुपये कर्ज झालें आहे तें व तुह्मी पुरुषत्वांत असल्याची माझी खात्री करून देऊन मला घेऊन जावें असे तुह्माकडून १५ दिवसांचे आंत न झाल्यास रीतिप्रमाणें दुसरा गंधर्वाचा नवरा करीन हें खूप समजावें रुपयाबद्दल कायद्याप्रमाणें फिर्याद करून रुपये घेण्यांत येतील. कळावें तारीख १५ नोवेंबर सन १८८० इसवी.

( सही ) कौंधि मर्द आकाजी कुणबी
वस्ती सावंग बुा प्राा चिकणी
तालुके दारव्हा इचे
हातची बांगडी.

## नोटिस.

या जाहिरातीनें खालीं सही करणार सर्व लोकांस असें जाहीर करितो कीं, आमचे मालकीचें व नावाचें पटाखत, १० वर्षांचे करारानें बिरामशा वल्लद कमालशा फकीर चतारीकर यांजपासून लिहून घेऊन रजिष्टर ही केलें होतें तो दस्तऐवज आमचे पासून हारवला आहे. तो कोणास सापडला असल्यास खालीं लिहिल्या पत्यावर आमचे स्वाधीन करावा. सदई दस्तऐवज आणून देणारास आह्मी ५ पांच रुपये बक्षीस दाखल देण्याचें कबूल करितों हें सर्वांस कळावें. तारीख १६ माहे नोवेंबर सन १८८० इ०

( सही ) मोतीलाल जयगोपाल साहू दुकान चतारी तालुके बाळापूर याचे हातची सही मारवाडी

## नोटिस

रा. राघोबा तेजपाल दुकान बाळापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं पेठ बाळापूर एथें आमची हवेली असून ती सुमार ३० वर्षांपासून तुह्मास भाड्यानें दिली. व त्या जागेत आमची जिनगी सुमार १००० दहा हजाराची होती. ती तुह्मास एक दोन वेळ मागितली असतां दिली नाहीं यास्तव तुह्मास या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत सदई हवेली व जिनगी आणि घराचें भाडें असें दावें न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून घेतलें जाईल. कळावें तारीख १६ नोवेंबर सन १८८० इसवी.

( सही ) तुळजाबाई मर्द रामजीलाल तर्फे बंधू चुणीलाल भवानीदास दस्तुर खुद.

वऱ्हाडसमाचार.

मिति कार्तिक वद्य ५ शके १८०२

## सर सालरजंग.

आमच्या हैदराबाद सरकारचे दिवाण सर सालरजंग योंजविषयीं अलीकडे इंग्लिशांमध्यें दोन लेख प्रसिद्ध झाले आहेत. पुण्याच्या सार्वजनिक पुस्तकांत एक, व मुंबईच्या उइक्ली टाइम्समध्यें दुसरा. त्यांत टाइम्समध्यें सर सालरजंग यांची उत्तम तसबीर छापून माहितीकारितां तो निबंध लिहिलेला आहे या दोन्ही लेखांतील माहिती आमचे वाचकांस उपयुक्त वाटेल सबब ती आह्मी देण्याचें योजिलें आहे. आज टाइम्समधील लेखाचा मतलब कळवितों:—

सर सालरजंग सन १८३४ त जन्मले. त्यांनां हल्लीं ४६ वे वर्ष आहे. त्याचें सगळें नाव नबाब मीर तरबअली खान बहादुर सालरजंग सुजाउद्दौला मुकत्यार उलमुलूक एवढें आहे. यांचे पूर्वज मदीना शहराकडून प्रथम कोकणांत आले व विजापुरच्या एका थोर घराण्यांतील मुलीशी त्यांचा संबंध झाला व पहिल्या निजामाच्या कारकीर्दींत त्यानीं त्या दरबारांत नोकरी पतकरली व तेव्हांपासून त्यांचा एकनएक पुरुष त्या दरबारांत रहात गेला व त्यांची भरभराट होत गेली. लार्ड कार्नवालिस साहेब गवरनर जनरल यांच्या कारकीर्दींत हैदराबादेस मीर अलम दिवाण होते ते यांच्याच घराण्यांतील होत. त्यांच्या मागून त्यांचे जावई मुनयिर उलमुलूक अमीर उल उमराव दिवाण झाले ते सालरजंग यांचे आजे होत. त्यांच्या मागून त्यांचे पुत्र सिराज उलमुलूक दिवाण झाले ते सालरजंग यांचे चुलते होते व ते सन १८५३ तील मे महिन्याच्या २७ वे तारखेस मरण पावले व त्यांच्या तिसरे दिवशीं सर सालरजंग हे दिवाण झाले. तेव्हां यांनां एकोणिसावें वर्ष होतें. यांनीं इंग्रजी रेसिडेन्सींत आपलें वय घालविलें होते व त्यामुळें हे चांगले तरबेज होते. हे दिवाण झाले त्याच सालीं निजाम सरकारचा मोठा पिकाऊ वऱ्हाड प्रांत इंग्लिश सरकाराकडे गेला होता त्यामुळें सरदार लोक व इतर मुसलमान लोक स्वस्थचित्त नव्हते, सरकारी खजिन्यामध्यें कांहीं शिल्लक नव्हती, धोरेबंदीची रीत अफाट खर्चीची व कमफायद्याची अशी होती, धर्मवेडे, दांडगे व बंडखोर अशा लोकांनीं हैदराबाद शहर भरलेलें होतें तशा प्रसंगीं यांचे हातीं दिवाणगिरी आली. यांनीं पहिल्यानें कामदार लोकांचे पगार कमी केले त्यांत आपलादेखील पगार कमी केला. पोलिसचा बंदोबस्त केला आणि आरब, रोहिले वगैरे उपद्रवी लोक एकत्र जमून गडबड न करितील अशी योजना केली. अशी ४ वर्षे वहिवाट चालली तेणेंकरून राज्यसुधारणेचें चिन्ह बरेंच दिसूं लागलें. व्यापारास तजेला आला जमाबंदी वाढली व लोकांनां आपल्या मालाची व जीविताची शाश्वती वाटत नव्हती ती वाटूं लागली. पण इतक्यांत सन १८५७ सालचें बंड उद्भवलें! तेणेंकरून सर्व हिंदुस्थानांत गडबड झाली. हैदराबादेंत तर राजरस्त्यावर लोक जमून इंग्लिशा विरुद्ध उठण्याच्या गोष्टी करूं लागले. मध्य हिंदुस्थानचे व दक्षिण प्रांतांतले लोक हैदराबादेकडे चित्त पुरवून राहिले. तेथें बदफैलीस फाव मिळता तर सारे हिंदुस्थानांतील इंग्लिश सरकारचें राज्य पालथें झालें असतें. मुंबईच्या गवरनर साहेबानीं हैदराबादच्या रेसिडेंट साहेबास तार ही केली होती कीं " निजाम बंडवाल्यास मिळतील तर सर्वस्वी नाश होईल. मुंबईच्या व मद्रासच्या बाजूलाही बंडाच्या ज्वाला पोंचत चालल्या होत्या; पण आनंदाची गोष्ट हीचकीं निजामसरकार बंडांत सामील झाले नाहीं खवळलेल्या व बंडास जाऊन मिळण्यास तयार असलेल्या हत्यारबंद लोकांस गुपचूप बसविण्याचें मोठे शहाणपणाचें काम सालरजंग यानीं आपले केवळ २४ वर्षांचे वयांत केलें. याचवेळस आणखी प्रसंग कसा आला होता तो पहा! त्याच बंडाच्या ऐन भरांत निजाम मरण पावले त्यांच्या चिरंजिवास गादीवर बसविण्याच्या समारंभास रेसिडेंट साहेबास शहरांत नेलें व ते परत बंगल्यावर येत आहेत तों बंडवाल्यांनीं दिल्ली सर केली हें वर्तमान व्हाईसराय साहेबांकडून रेसिडेंट साहेबास तारेंतून आलें. तार येण्या बरोबर त्यानीं सालरजंग यांस बोलावून नेऊन ती गोष्ट सांगितली तेव्हां ते ह्मणाले कीं येथलि बाजारांत आज तीन दिवस ही गोष्ट कळलेली आहे. शाबास सालरजंगाची! लोक बेदिल, निजाम मरण पावलेले, बंड वाल्यांची सरशी, व अशा प्रसंगांत ते सर्व युरोपियन कामदारांस शहरांत आपल्या घरांत नेतात तेव्हां याहून आणखी मर्दुमकी काय पाहिजे ? जर सालरजंग लोकांच्या इच्छेला अनुकूळ होते तर तेथील सर्व गोरे लोक विन आयासानें त्यांच्या हातांत सांपडले होते त्यांचा नाश करण्यास त्यांस क्षण न लागता. पण सालरजंग यांचें अंतःकरण इंग्लिशांविषयीं फार शुध्द, त्यांचा पोंच मोठा, व कर्तबगारी मोठी बांकी. तेणेंकरून सर्व बिघडलेल्या लोकांचें त्यांनीं आकलन केलें, त्यां प्रसंगीं सालरजंगच्या जिवावरही कित्येक वेळां प्रयत्न झाले पण त्यांच्या भरंवशाच्या आरब लोकांनीं शेवटपर्यंत इमानदारी राखिली त्यामुळें कोणाचें कांहीं चाललें नाहीं रेसिडेन्सी वरही हल्ला होणार होता पण तो प्रसंग सर सालरजंग यांच्या कर्तबगारीनें टाळला गेला. हिंदुस्थानच्या एका मोठ्या राज्य कारभाऱ्यांनीं त्यावेळीं असें ह्मटलें आहे कीं सालरजंगच्या या वेळच्या सहाय्याची किंमत केली जाणार नाहीं.

बंडाचें अरिष्ट टळल्यावर सालरजंग यांनीं मुलखाच्या सुधारणुकीकडे पुन्हा चित्त पुरविलें. दोन वर्षांमागें जो दुष्काळ पडला होता त्याच्या हकीकतीचा निजाम सरकारचा नुकताच रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून सालरजंग यांच्या कारकीर्दींच्या पहिल्या वीस वर्षांची माहिती कळते ती अशीः— राज्याची वसूल ७४ लक्ष रुपये होता तो अडीच कोटि रुपये झाला. लोकवस्ती पहिली होती त्याच्या तिजाई अधीक वाढली. रस्ते झाले व एक मोठा रेल्वे झाला. पाट बंधाऱ्याचीं कित्येक कामें झालीं. कित्येक जिल्ह्यांची मोजणी झाली. विद्याखातें झालें. व पोलीस खातें चांगलें झालें. पण या सर्व गोष्टी केवळ सालरजंग यांच्या हिमायतीवर झाल्या. लोकांचा सन १८५७ सालांतील जो त्यां विषयीं विरुध्द ग्रह तो फारसा बदलला नाहीं. व त्यांचा पाडाव करण्याविषयींही लोकांची खटपट होती. सन १८६९ त निजाम अफझूल उल दौला मरण पावले व सालरजंग रिजेंट झाले आणि अमिरीकबीर हे कोरिजेंट झाले. युवराज प्रिन्स आफ वेल्स मुंबईस आले तेव्हां अल्पवयी निजामसरकाराला मुंबईस नेण्याची विशेष खटपट झालेली सालरजंग यांच्याच प्रयत्नानें रहित झाली. व पुढें प्रिन्स आफ वेल्स यानीं त्यांस विलायतेस बोलाविलें व त्या प्रमाणें सालरजंग तिकडे गेले व त्यांची बहुत मान्यता झाली. पण पुढें ते परत आल्यावर हिंदुस्थानचे नवीन गव्हरनर जनरल व त्यांच्या भोंवतालचें नवीन मंडळ यांनीं त्यांच्याशीं कांहीं तऱ्हेवाईक वर्तन केलें. सालरजंग दिवाण झाल्याच्या पूर्वीं थोडेच महिने वऱ्हाड प्रांत इंग्लिश सरकाराकडे गेला होता व तो परत मिळविणें हा त्यांचा साहजीक कल असल्यामुळें व त्याजबद्दल त्यानीं सरकारांत काम चालविल्यामुळें हिंदुस्थान सरकारास वाटलें कीं विलायतेंत कांहीं मोठमोठे वजनदार लोकांचें या कामास सालरजंग यांस पाठबळ मिळालें आहे. ती गोष्ट मनांत ठेवून लार्ड लिटन यानीं सालरजंग यांचा प्राइव्हेट सेक्रेटरी काढून टाकिला व सालरजंगचें आणि ज्यांचें पिढीजाद शत्रुत्व ते ग्रहस्थ त्या दरबारांत कोरिजेंट केले एके वेळीं तर अशा अडचणीचा प्रसंग आणला होता ह्मणतात कीं सालरजंग यानीं राजीनामाच देण्याचें त्यांस भाग पडावें. पण ते फार पटाईत व हैदराबाद दरबारचें भाग्य चांगलें ह्मणून त्यांवर अनेक प्रसंग आले तरी ते सर्व टळून ते डगमगले नाहींत. आतां ते सुस्थितींत आहेत पण राज्यकारभारात दोन हात झाल्यानें व ते परस्पर बेरोख असल्यानें त्यांच्या उद्योगीपणास बरीच कमतरता आली त्यास उपाय नाहीं.

साऱ्या हिंदुस्थानांत उत्तम पोशाखी असें सालरजंग यांस नाव आहे व तें अन्यथा नाहीं. त्यांचा पोशाख अगदी साधा असतो ते लहान पांढरें पागोटें घालतात. शिरपेंच वगैरे त्यांस आवडत नाहीं. त्यांचा बांधा सडपातळ असून ते उंच आहेत. त्यांचें मुखकमल शांत व मननशील दिसतें. त्यांनां इंग्लिश भाषा चांगल्या रीतीनें लिहितां आणि बोलतां येते व मनुष्यास वश करून घेण्याची त्यांची सरणी विलक्षण आहे. वऱ्हाड प्रांत परत मागण्याच्या त्यांच्या विचारास प्रतिकुळ अशा एका मोठ्या कामदारानीं ह्मटलें आहे कीं मोठे वजनदार आणि पदवीचे अशा इंग्लिश गृहस्थांनां हैदराबादेस जाण्याविषयीं कोणी उत्तेजन देऊं नये. कारण ते तेथें गेले ह्मणजे त्यांच्या विचारांत सालरजंग निःसंशय फरक पाडतील.

सर सालरजंग हे साऱ्या हिंदुस्थानांत जसे वजनदार आहेत तसेच ते परम उद्योगीही आहेत. ते नित्य सहा वाजतां उठतात व आपला दरबार करितात. तेव्हां गोरगरीब कसल्याही लोकांस त्यांच्या पुढें जाण्यास मोकळीक असते. नंतर ते अभ्यास करितात खजिन्याचे हिशेब तपासतात, व परशियन मुनशीसी रेसिडेन्सीकडील पत्रव्यवहार संबंधे गोष्टी बोलतात. नंतर १०॥ वाजतां न्यायाधीश व इतर कामें घेऊन आलेले लोक यांच्या भेटी व बोलणीं होतात. नंतर पावतास सुमार भोजनाकडे जातो. नंतर पूर्व दिवशींचे अर्ज घेऊन मुख्य मुनशी येतो त्याचें काम ऐकून त्यास हुकूम देतात, बारा वाजतां जे भले गृहस्थ त्यांच्या खानगी भेटीस जातात त्यांच्या मुलाखती हातात. व १२॥ वाजतां शहरांतील सरदार लोकांचा दरबार होतो. व याच वेळेस मुनसीकडून रेसिडेंट साहेबाकडे जाणारीं पत्रें सह्या होण्यासाठीं येतात. नंतर दोन वाजतां खालील दर्जाचे आफिसर, सावकार लोक व कानाफिडेन्सियल एजंट यांच्या भेटी होतात ५ वाजतां अश्वशाळा पहातात व मग शहरांतून हवा खावयास निघतात. नंतर येऊन भोजन होतें आणि मग रात्रीचे १०॥ वाजतपर्यंत त्यांचा खासगी पत्रव्यवहार चालतो. याप्रमाणें त्यांचा नित्य क्रम आहे.

सर सालरजंग यांस दोन पुत्र व दोन कन्या आहेत. वडील पुत्राचें वय १८ वर्षांचें आहे. सर सालरजंग सन १८६७ त केसी एस आय झाले. आणि सन १८७१ त जी सी एस आय झाले. व सन १८७६ त आक्सफोर्ड एथील युनिव्हर्सिटीनें डी सी एलची आनररी डिग्री त्यांस दिली असा त्यांचा इतिहास आहे.

---

We have had a few heavy showers of rain this week accompanied by a fall of hail. The fall has been productive of good for the Rabi crop as it will help the growth of the wheat. The fall of hail will no doubt slightly damage the Kharif which is ready for harvest. Already there has been a slight rise in the price of Jawari but scarcely perceptible. We hope these last rains will not influence the market, for the poor will be the sufferers in the event of prices rising inordinately, though there are no such apprehensions at present.

The cotton crop will no doubt suffer by these rains for as we learn the first pickings of cotton are already being carried away, and the produce not picked will of course be somewhat blackened, This will materially influence the quality of the Berar cotton.

The rains holding off when the Kharif was sown raised serious apprehensions of an impending famine. We have been very fortunate in escaping that calamity, by the falls of rain at the eleventh hour now that prospects are comparatively favorable, we are threatened with locusts on one side while the elements are engaged in a fearful conflict in bringing about matters to an unfavorable crisis. It is hoped that these events will not operate more disastrously than the persistent drought caused at the begining of the season. Opinions are at present divided as to the

effects of the present rain. It only this we have not much to fear, since we have to look to existing facts rather than to opinions and we hope to receive favorable reports in regard to enquiries which we have instituted in this matter. Cattle will benefit by the present fall of rain for the grass crop will be more luxurient than it otherwise would have been had no rain fallen. While discoursing on the grass crop, an idea has suggested itself in regard to fodder for cattle. We are not aware of any reason, why a crop of fodder for cattle should not be specially cultivated as in many parts of England. The precarious dependence on the fall of rain for a grass crop is any thing but prudent. A short fall of rain invariably is visited on cattle not having the means of obtaining a sufficient nutricious fodder, and to provide against this, it would be more advisable to allot certain plots of field specially for the growth of such plants as may be utilized for the use of cattle as fodder whenever necessity arose. We are aware that this will not commend itself to the agricultural public, but it is politic in the interests of government to provide for dumb animals as well, and to advise the cultivator to supply this desideratum. No doubt when this matter is forcibly brought to the mind of the Kunbi embracing the benefits in all its bearings, the pliant Kunbi will adopt it, notwithstanding that the proposal at first sight may go against his grain.

---

A most shocking case of murder is reported from Paturda. A young Marwadi lad about 10 years of age left his house to go and play with some of his companions at school. On his way to the school it is reported that he was met by one of his masters who took him to his (master's) house and there perpetrated the most diabolical and atrocious of cold blooded murders ever heard of. The lad was stabbed till he was left for dead, then put into a box which was locked and numerous weighty articles put on it the lad revived after a time and his cries and groans attracted the attention of neighbors, who went into the house and found the lad bathed in his blood and locked up in a box. The box was opened and the lad taken out who lived to make a dying declaration implicating one of his masters as the perpetrator of the foul deed. The lad expired 5 or 6 hours after he was discovered. The master has been apprehended, but at present beyond his own confessions which he is said to have retracted and the dying declaration of the lad no tangible evidence is forthcoming. The motives for the perpetration of the crime are not clearly ascertained but as the lad had on his person Jewellery of gold to the extent of about 30 tolas it is probable the motive was actuated by a desire to obtain possession of the jewelry.

---

A Jaghirdar is now in the custody of the Akola Police under a charge of theft. We have not received full particulars of the case, but as far as we have learned, the charge appears unfounded.

---

Some of our readers are perhaps not aware of the new arrangement of the Post Office that a remitter of an Inland Money order may also attach to the form of application a Post Card, which will be delivered to the Payee with the Money Order; but it should be borne in mind that the remitter or sender should write the name and address of the payee on the front side and any instructions or communication he desires to be conveyed to the payee on the reverse side of the Post Card.

We are glad to see that our Post Offices are getting more ingenuous and generous too.

---

The Rajah of Durbhanga has for sometime been anxious to secure a good house at Simla. He offered a large figure for Sir H Roberts' house "Snowdon" which was declined, he has however purchased "Wheatfield," which belonged to Sir Edwin Johnson, for Rs.66000. The house is as nice as the price paid for it.

---

Mr H. S. Nicholetts, Assistant Commissioner. 2nd Class. Hyderabad Assigned Districts, and Officiating Deputy Commissioner, 3rd Class, has been granted privilege leave for 3 months, with effect from 1st December 1880, or from such subsequent date as he may avail himself of it.

---

The Resident is pleased to appoint Zorawar Khan, Naib-Kazi of AKola, to be a Special Magistrate in the Hyderabad Assigned Districts, and to invest him with the power of a Magistrate of the 3rdClass, to be exercised within the town of AKola.

---

The Resident is pleased to invest Tahsildar Ambadas Santu, Magistrate of the 2nd Class, with powers under section 3 of Act 1. of 1878, to try cases under the said Act.

---

## वऱ्हाड

या आठवड्यांत गुरुवारीं थोडा व शुक्रवारी दिवसां आणि रात्रीं मोठा पर्जन्य पडला. व गाराही पडल्या. हल्लीं हवा बरी आहे. या पर्जन्यानें कांहीं नुकसान होईल म्हणतात.

---

मि० नीलिस साहेब येथें असिस्टंट कमिशनरचे कामावर आले.

---

रा. रा. त्रिंबकराव यशवंतराव एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस अडगाव कोर्टाचे मदतीकरितां अकोटास नेमिलें.

---

रेसिडेंट साहेब विलायतेस गेल्यावर त्यांचे जागीं कर्नल ब्राडफोर्ड रजपुतान्याचे पोलिटिकल एजेंट यांस नेमणार असें पायोनियर मध्यें लिहिलें आहे.

---

एका असिस्टंट मास्तराचें अघोर कृत्य पातुर्डे तालुके जळगाव एथील १० रुपये पगाराचा असिस्टंट मास्तर गणपती देशमुख यानें तेथील मारवाड्याच्या एका १० वर्षांच्या वयाच्या कन्हू नावाच्या मुलाचा दागिन्याचे लोभानें भयंकर रीतीनें खून केला. तो मुकदमा टाकळी एथें मि. हेर साहेबफर्स्ट क्लास माजिस्त्रेट यांच्यापुढें चालणार आहे गेले आठवड्यांतील शनिवारीं हा मुलगा दिवसां एक वाजतां सदर्हू मास्तरानें आपले घरीं कांहीं भुलथापीनें नेला मास्तर. मजकूरचें स्वतंत्र घर नसून त्याचा मामा रा. रा. सिताराम देशमुख याचे घरीं तो राहत होता व बसण्यां उठण्याची त्याची एक स्वतंत्र खोली होती. त्या खोलींत तो मुलगा आला व त्याचे अंगावर सुमार सातशे रुपयांचे सोन्याचे दागिने होते त्यांविषयीं मास्तराला अभिलाष बुद्धी होऊन त्यानें त्या मुलाला गुप्तीनें सुमार १२ जागीं जखमा केल्या तेव्हां मुलगा बेशुद्ध झाला. पण मास्तरानें तो मेला असें मानिलें व त्यालां एका मोठ्या पेटींत घालून व त्यावर दोन तीन मोठाले दगड ठेवून व रजईचें दडपण घालून पेटी बंद केली व खोलीस कुलूप घालून तो शाळेकडे चालता झाला. कांहीं वेळानें मुलगा शुद्धीवर येऊन कन्हूं लागला तें घरांत देशमुख यांचीं माणसें हिंडत फिरत होतीं त्यांस हें काय असावें म्हणून संशय येऊन त्यांनीं बेभाट केला. मग मास्तराला आणवून खोली उघडली व पेटी पाहिली तों आंत मरणोन्मुख झालेला मुलगा दिसला. नंतर पोलिसानें जळगावाहून डाक्तर आणविला, त्याच्या जखमा शिवविल्या आणि मुलाचें तोंडचे शब्द लिहून घेतले त्यांत मास्तरानें आपणास मारिलें असें त्यानें सांगितलें नंतर मुलगा मरण पावला. याप्रमाणें हें अति नीच व अघोर कृत्य देशमुख घराण्यांतील व मास्तर झालेल्या राक्षसी पुरुषानें केलें असें समजतें. आतां चौकशींत काय निष्पन्न होतें पहावें!

---

अकोला म्युनिसिप्यालिटीनें पुढील वर्षाचे बजेटांत लायब्ररीकरितां दरमहा १० रुपये वर्गणीचें सांगशन केलें आहे हें पाहून आह्मांस संतोष वाटतो. बेडर लोकांचे शाळेस व मुलींचे शाळेसही या कमिटीकडून मदत आहे.

---

अकोला हायस्कुलाचे प्रवेश परीक्षेस ६२ विद्यार्थी आले होते त्यांतून ४१ पास झाले त्यांचे टिपण :— अकोल्याचे १७ पैकीं १२, अकोट १२ पैकीं ९, पातुरचे ४ चे ४, बाळापुरचे ४ चे ४, चिखलीचे ७ पैकीं २, अडगाव ३ चे ३, जळगाव २ चे २, पिंपळगाव २ चे २, शिगाव २ पैकीं १, दर्यापुर १ चा १, खामगाव ५ पैकीं १ व देऊळगाव २ पैकी कोणी नाहीं., सर्व्हिस परीक्षा अजून पुरी झाली नाहीं.

---

हैदराबाद—गुरुवारीं ता. ११ नोवेंबर रोजीं रेसिडेंट साहेब सिमल्याहून परत आले. स्टेशनावर पुष्कळ मंडळी त्यांस आणावयास गेली होती. आठ दिवस हैदराबादेस सारखा पाऊस झाला. आतां थंडी पडूं लागली आहे. शनिवार पासून घोड्यांच्या शर्यती सुरू झाल्यां.

---

१५ वे तारखेची रेसिडेन्सी आर्डर आली. तींत परीक्षेचा निकाल छापलेला नाहीं. प्रमोदसिंधूत लोकवार्ता लिहिली आहे कीं फारच थोडे उमेदवार पसार झाले. परीक्षा मोठी ती एक वासुदेव जाणे! दुसरे कोणास कांहीं ठाऊक नाहीं.

---

येथील नव्या धर्मशाळेला जोडून एक स्वयंपाकगृह, महार लोकांकरितां एक-जागा, व पायखाने करण्याचे राहिलें, होते त्यांच्या सुरवातीची तयारी झाली. या कामाकरितां खामगावच्या कित्येक उदार गृहस्थांनीं सुमार सांडेपांचशे रुपये वर्गणी दिली असें कळतें.

---

रा. रा. परशराम गणेश अंबडेकर डिपुटी कमिशनर आफिसांतील ५० रुपयांचे कारकून यांस अडगावास ७५ रुपयाची शिरस्तेदारीची जागा मिळाली व ते तिकडे गेले. मि. शेख कासम यांस त्यांचे जागीं ठेविलें.

---

मि० निकोलेट साहेब उमरावतीचें ऑफिशियेटिंग डिपुटी कमिशनर यांस डिसेंबरचे पहिले तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

---

मि. जोरावरखान येथील नायब काजी यांस अकोला शहराकरितां स्पेशियल माजिस्त्रेट नेमिलें व थर्ड क्लास माजिस्त्रेटचे त्यांना अधिकार दिले. या भल्या गृहस्थास हा भूषणास्पद अधिकार मिळाला हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

---

रा. रा. अंबादास संतो मेहकरचे तहशीलदार व सेकंडक्लास माजिस्त्रेट यांस सन १८७८ चे पहिले आक्टाचे तिसरे कलमांतील अधिकार दिले.

---

मे. दस्तुर बहिमनजी साहेब सि. आय. ई. हे खामगांव व अकोला येथील स्मालकाज कोर्टांचे आफिशियेटिंग जडज आहेत तोंपर्यंत त्यांस असा अधिकार दिला आहे कीं ते अकोल्यास व खामगावास कधीं कोर्ट भरवितील त्या दिवसांच्या नोटिसा त्यांनीं जुडिशियल कमिशनर आफिसांत किंवा डिपुटी कमिशनर आफिसांत आणि अकोला व खामगाव येथील स्मालकाज कोर्टांत लावीत जाव्या.

## वर्तमानसार.

बोखाऱ्याच्या अमीराचा मुलगा सयद अबदुल मलीक पेशावर एथें महामारीचे उपद्रवानें मरण पावला. सिरहिंदकडे यात्रेला जाण्याच्या उद्देशें तो तेथें आला होता व त्याला ४० रुपये रोजाची नेमणूक होती.

रंपा एथील दंगा समाप्त झाला. व तिकडे कामगिरीस असलेल्या फौजास परत जाण्याचे हुकूम झाले.

खानदेशचे पोलिस इन्स्पेक्टर रा. रा. शिवराम पांडुरंग केरकर विषम ज्वराचे आजारानें १० वे तारखेस धुळ्यास मरण पावले. हे गृहस्थ फार प्रसिद्ध होते.

पुण्याचे रा. रा. नंदराम नाईक गवंडी १४वे तारखेत मरण पावले. यांचें वय ८५ वर्षांचें होतें यांजवळ द्रव्य पुष्कळ असून हे मोठे धर्मात्मे होते. तुळसी बागेंतील राममंदिराचा जीर्णोद्धार यांनीं केला.

मि. लायल साहेब हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी कंदाहाराकडे गेले होते ते परत आले.

मुंबईच्या गवरनर साहेबाच्या मोठ्या मुलीचें महाबळेश्वरी १०वे तारखेत लग्न झालें

वासुदेव बळवंत फडके याच्या प्रकरणांत प्रसिद्धीस आलेले मेजर ड्यानियल यांस इंग्लंडांत चीफ कानस्टेबलची जागा मिळाली या जागेचा पगार सालीना चार हजार रुपये असून भत्याबद्दल वगैरे दरसाल एक हजार रुपये मिळतात.

काबूलचा अमीर अबदूल रहिमान यानें नुक्तेच अली गुलाखान याचे कन्येशी विवाह लाविला आहे.

मि० जीस्टस केंबाल हे रजेवर आहेत तोंपर्यंत त्यांचे जागीं मि. नानाभाई हरिदास यांस मुंबई एथील हायकोर्टाचे जडज नेमिलें.

सरकारानें सेविंग ब्यांकेच्या संबंधानें नवे नियम करून प्रसिद्ध केल आहेत व आजपर्यंत १००० रुपयेपर्यंत ब्यांकेत ठेवण्याची जो मोकळीक होती ती आतां ५०० रुपये पर्यंतच केली आहे व एक वर्षांत ५०० हून जास्त रकम घेतली जाणार नाहीं असें ठरविलें आहे. तसेंच कोणासही दरमहा १०८१०८८ पेक्षां जास्त व्याज मिळणार नाहीं व प्रत्येक दीड रुपयास दरमहा १ पै अगर १८८ रुपयास महिना एक रुपया अगर दरमहा दर शेकडा ४८२८६ प्रमाणें व्याज देण्यांत येईल. मुद्दाम परवानगी घेतल्यावांचून कोणा मनुष्यांस दोन खातीं करण्याचा अधिकार नाहीं तरी सार्वजनिक संबंधाच्या पैशाकरितां वेगळें खातें ठेवण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारची व्यवस्था या नव्या नियमांत केली आहे तरी सरकारी रेलवेंतील नोकरांस जास्त रकम ठेवण्यास मोकळीक दिली आहे.

हिंदुस्थानांतील एक ब्राह्मणाचा मुलगा अमेरिकेंत विद्याभ्यासाकरितां गेला आहे.

कोंडलेल्या जागेंत चार घटका तंबाखू ओढीत बसल्यास त्यापासून प्रकृतीस मोठा धोका येतो असें एका शोधकाचें ह्मणणें आहे. न्या. सिं.

आनरेबल रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक सी. एस. आय. यांस मुंबई एथें मि० नानाभाई हरीदास यांच्या जागीं सरकारी वकील नेमिलें.

श्रीमंत होळकर सरकारची तबियत थोडी नादुरुस्त असल्या विषयीं तार गेल्यावरून त्यांचे पुणे एथें असलेले कुटुंबाची स्वारी गेले गुरुवारीं इंदुरास निघून गेली.

भट मोक्षमुल्लर हे "प्राच्यदेशीय धर्म पुस्तकें" या नांवाची इंग्रजींत ग्रंथमाला तयार करीत आहेत. त्यांत वायपुराणाचें इंग्रजी भाषांतर प्रो. रा. गो. भांडारकर यांनीं करण्याचें पत्करिलें आहे व रा. रा. काशिनाथपंत तेलंग बारिस्टर यांनीं गीतेचें भाषांतर करण्याचें पत्करिलें आहे. ज्ञा. च.

अफगाणिस्थान प्रकरण — अफगाणीस्थानांत अद्याप स्वस्थता झाली नाहीं. अबदूल रहमानावर लोकांचें प्रेम जडत नाहीं. सैनिक लोक नूतन अमिराची नौकरी करूं इच्छित नाहींत. दंगा सुरू असून अबदुल रहमानाचा वध झाल्याच्या बातम्या आहेत परंतु त्या खऱ्या किंवा खोट्या हें निश्चयात्मक समजत नाहीं. आयुबखान जवळच असून तो लोक जमवीत असल्याची वदंता आहे. काबूल, गिझनी आणि हिरात यांच्या दरम्यान सतत पत्रव्यवहार चालू असून अयुबखानानें अबदुल रहमान याज विरुद्ध खटपट करून आपल्या नशिबाची एक वेळ पुन्हा परिक्षा पहावी ह्मणून त्यास पुष्कळ ठिकाणांहून उठावाचीं बोलावणीं येत आहेत आणि तो चोंहोंकडे प्रिय होत चालला आहे या विषयीं संशय वाटत नाहीं. पुष्कळ कंदाहारी लोकांस वाटत आहे कीं, तो इंग्लिशांस शरण येऊन कंदाहारच्या गादीवर बसेल. आयूबखान आपल्या सैन्यांतील लोकांस दररोज पुरा शिधा देत असल्यामुळें त्याच्या सैन्यांत नवीन लोकांची भरती होत आहे. आयुबखान इराणास गेला नसून तुर्कस्थानांतील, अमिराच्या सैन्यास फितुर करण्याच्या खटपटींत तो आहे असें ह्मणतात. कंदाहारच्या गादीवर आयुबखानाचा हक्क इंग्लिशांनीं मान्य केला तर आफगाण प्रकरणाचा लौकर निकाल होण्याचा संभव आहे असें कित्येकांचें ह्मणणें आहे. अबदूल रहमानचा खून झाल्याची गोष्ट खरी आहे व त्या दंग्याचा पुढारी प्रसिद्ध महमदजान हा आहे असें ह्मणतात. अबदुल राहेमान हा अमिर झाल्यावर त्याणें महमदजान यास मुख्य प्रधान करून त्याच्या भावास कमान्डर इनचिफ नेमला व महमद याचा फार सन्मान केला त्या अर्थी असें होऊं नये असें दिसतें तरी महमदजान हा इंग्रजांचें पक्कें शत्रुत्व करणारा असल्या कारणानें तसें होण्याचा संभवही आहे; तरी अद्याप खात्रीपूर्वक कांहींच समजत नाहीं.

सर लुई काव्हनारी यांची तरवार एका इसमाजवळ सांपडली ती मुलाखतीच्या प्रसंगीं गव्हरनरजनरल यांस नजर करण्याचा अमीर यांचा विचार आहे.

कंदाहारच्या आसपासचे प्रदेशांत सर्वत्र शांतता असून लोक कांकूं केल्यावांचून साऱ्याचा वसूल देत आहेत.

पुणें येथें मि० अणा किर्लोस्कर वगैरे कित्येक गृहस्थांनीं संगीतशाकुंतल नाटकाचे दोन प्रयोग करून दाखविले, त्यावेळीं झालेल्या टिकीट विक्रीच्या उत्पन्नांतून त्यांनीं पुणें येथील नेटिव जनरल लायब्ररीकरितां २०० रुपयांचीं पुस्तकें घेऊन दिलीं.

निझाम सरकारच्या हद्दींत आजपर्यंत अफूचें पीक होत हात तें यापुढे करूं नये, असें आमच्या सरकारानें ठरावल आहे. व तें निजाम सरकारच्या दिवाणांनीं कबूल केलं आहे

आयुबखान इराणांत गेला नसून तुर्कस्थानांतील अमीराच्या पलटणांबरोबर त्याचें बोलणें चालू आहे, व पुष्कळ लोक त्यास येऊन मिळत आहेत, व कदाचित् त्याचा सासरा इंग्लिशांशीं नम्रपणानें वागण्याबद्दल त्याचें मन वळवील असाही अनुमास आहे; व जर सरकार त्याचा कंदाहारावरील हक्क कबूल करीत असेल तर हा सगळाच तंटा मिटून त्याचा व अबदुल रहमान याचा सख्यभाव कसा राहील एवढाच काय तो विचार शिलक राहील.

लिव्हरपूल येथें नुक्तेंच लग्न झालें त्यामध्यें इंग्लिश लेकांत जें 'मी पतीस मान देईन, त्याच्यावर प्रीति करीन, व त्याची आज्ञा पाळीन " हा करार करण्याचें तिनें नाकारिलें!!

माजी अमीर शेअर अली यांच्या दोन विधवांचीं लग्नें महंमद जान यांजबरोबर लावून दिल्यामुळें अबदुल रहिमान यांच्या विरुद्ध लोकांचीं मनें अधिकच खवळलीं आहेत.

रशियामध्यें धान्याची महर्घता झाल्यामुळें तेथील सरकारानें गल्ल्याच्या मुख्य व्यापाऱ्यांस हद्दपार करूं अशी दहशत घातली आहे.

मद्रास इलाख्यांत पुष्कळ खोट्या नोटी केल्याचा बोभाट बाहेर आला आहे.

गव्हरनर जनरल यांचे बडोदे येथील एजंट मि० मेलव्हिल हे येत्या फेब्रुवारी महिन्यांत एक वर्षाच्या फर्लोवर स्वदेशीं जाणार असून ते रजा संपली ह्मणजे ती नौकरी सोडणार, व तसें झालें असतां दिवाण साहेब सर माधवराव हे आपल्या कामाचा राजीनामा देणार; व तेथील चीफजस्टिस मि० खरशेटजी रुस्तमजी हेही प्रकृति नीट नसल्यामुळें नौकरी सोडणार असें मुं. स. चा एक बातमीदार लिहितो. एजंट मि. मेलव्हिल नौकरी सोडणार ह्मणून दिवाण साहेब राजीनामा देणार या दोन्ही गोष्टींचा संबंध काय? इं. प्र.

मद्रासचे गव्हरनर ड्यूक आफ बकिंघहाम विलायतेस काम सोडून जाणार ह्मणून त्यांस मद्रासच्या लोकांनीं मानपत्र देऊन त्यांचें कांहीं स्मारकही करण्याचा विचार केला आहे असें समजतें.

अल्बेनियन लोकांनी दुलसिग्नो प्रांत मुसलमान्यांनी सोडून द्यावा म्हणून दरविशपाच्छा यानीं हुकूम केला होता त्याचा त्या लोकांनीं असा जबाब दिला कीं आह्मी आपले मुलखाचें जीव जाइ तोंपर्यंत संरक्षण करण्याचा निश्चय केला आहे. ने. ओ.

हिंदस्त्रियांची दुःस्थिति— ब्राह्मणी स्त्रियांचे नवरे मेल्यावर मूळ त्यांस वपनाचेंच काय प्रयोजन आहे हें समजत नाहीं. धर्मशास्त्रकार तरी असे दुष्ट बुद्धीचे कसे झाले? नवऱ्याकरितां स्त्रीनें आजन्म केशवपन करून रहावें हा त्यांच्या स्त्रीपुरुषरूप अन्योन्य संबंधाचा अपूर्व रासायनिक प्रयोग आहे! अरेरे! आह्मी लोकांनीं आपल्या अबलांशीं हा किती छळवाद मांडला आहे? आह्मी तर ह्मणतों कीं, स्त्रियांस नवऱ्याकरितां एक मंगळसूत्र मात्र मिळालें असतें तेवढें तो मेल्यावर पाहिजे तर तिणें टाकून द्यावें. बाकी विद्यमान स्थितींत जें तिचें केशवपन करवितात. तिची चोळी काढतात. तिच्या बांगड्या फोडतात, तिच्या गळेसऱ्या काढतात, व तिचे कुंकू पुसून टाकतात हें काय लक्षून; हें सर्व वैभव तिला नवऱ्याकरितां कां मिळालें आहे? नाहीं. तें तर तिला तिच्या कौमार्यापासूनच मिळालें असतें. तिणें त्या नवऱ्याचें तोंडही पाहिलें नसतें किंवा त्याची वार्ताही ऐकिली नसते तेव्हां पासूनच ती आपली तिपेडी व पांचपेडी वेणी घालून तींत अनेक प्रकारचीं फुलें गुंफीत असते व नाना प्रकारचे नग घालीत असते. ती नवरा मिळण्यापूर्वींच अंगांत चोळी, कांचोळी घालून हातांत बांगड्या, बिलोर, गोखरू, कांकणें वगैरे कांचेचे व सोन्याचे अलंकार धारण करीत असते व त्याचप्रमाणें लग्नाचे पूर्वीं पासूनच ती कपाळीं कुंकूं व गळ्यांत अनेक प्रकारच्या गळेसऱ्या व माळादि कंठभूषणें धारण करीत असते. अतएव सर्व कांहीं तिला नवऱ्याच्या पूर्वींच मिळालें असतें. तेव्हां तिला त्या सर्व वैभवापासून तिचा नवरा मेल्यामुळें नागविणें ह्मणजे हा कोण जुलूम? याचा कोणासच कां विचार नसावा? गेला बिचारा विष्णुशास्त्री अबला पक्षीय तेवढाच काय तो अहो भाग्य पुरुष होता. तेव्हां येणेंप्रमाणें विचाराच्या, तर्कांच्या व सहृदयतेच्या वगैरे सर्वच गोष्टींपासून अत्यंत दूर अतएव अयुक्त व अश्लाघ्य असें जें कर्म आणि तेंही पुरुष जातीच्या नापिताकडून करविणें हा किती निर्लज्जपणा व निर्दयता आहे? आणि बरें, अशा प्रकारापासून अनर्थ तरी कसे ओढवतात याचें प्रसिद्ध 'मनोरमा' नाटकांत उदाहरण प्रत्यक्ष दाखविलें आहेच. तेव्हां आतां तद्विषयक जास्त लिहिण्याचें कारण नाहीं. आपल्या लेखाच्या संबंधानें आज आह्मास इतकेंच लिहावयाचें आहे कीं, आमच्या नाशिकांत तर नाहीं, परंतु पंचवटींत एक न्हाव्याची स्त्री बायकांचें केशवपन करीत असते तरी तिचा चालावा तसा रोजगार चालत असल्याचें दिसत नाहीं व विधवा स्त्रिया तिची पर्वा ठेवीत नाहींत असें अवलोकनांत आलें आहे हें फार गैर आहे. याविषयीं आमच्या नाशिकच्या भटांनीं अवश्य विचार करणें वाजवी आहे, परंतु त्यांस असे सोयीचे व हिताचे विचार कोठून सुचतील व न सुचतां दुसऱ्यानें सुचविले तरी तिकडे लक्ष कोण देतो? आह्मी या पत्राचे द्वारें अशी सूचना करतों कीं, येथील नाशिक वृत्ता सारख्या पत्रानें हा विषय हातीं घरून लोकांमध्ये एतद्विषयक ऊहापोह सुरू करावा. व न्हाव्यांनींही आपल्या बायकांस आपलें कसब शिकवावें. न्हाव्यांच्या बायका न्हाव्यांप्रमाणें हजामती करूं लागल्यास त्यांत कांहीं कमीपणा नसून उलट त्यांच्या उद्योगास बरेंच साह्य झाल्यासारखें होईल. शिंप्याची बायको शिंप्याबरोबर शिवावयास बसली, धोब्याची बायको धोब्याबरोबर कपडे धुईल, व रंगाऱ्याची बायको रंगाऱ्यास कपडे रंगवण्यास लागेल तर त्यांत कमीपणा मानण्याचें तें काय कारण आहे? तर इकडे नाशिकच्या न्हाव्यांनीं पोक्तपणें लक्ष द्यावें, व ब्राह्मणांनीं आपल्या अनाथ व दीन विधवांची लज्जा बाळगावी. ब्रा. प्र.

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें

ज्यांची एकनिष्ठा व स्वामीभक्ति दिवसेंदिवस अधिकाधिक वृद्धिंगत होत आहे. ह्या राजेरजवाड्यांवर सरकारचा पूर्ण भरंवसा असून तो दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत आहे. वर लिहिलेल्या गोष्टीच्या अस्तित्वाविषयीं सर्वांत उत्तम पुरावा हटला ह्मणजे अफगाणिस्थानांतील लढाईच्या संबंधानें सरकारास मदत देण्याची तत्परता व ह्या राजेरजवाड्यांचें व त्यांच्या सैन्याचें उत्कृष्ट वर्तन होय. पंजाब इलाख्यांतील राजेरजवाडे व सरदारांनीं व त्यांचे सैन्यानीं सरकारास जी मदत केली तिचे संबंधानें राणी साहेबांचे संमतीवरून सरकारानें आपली कृतज्ञताबुद्धि दाखविण्याकरितां मोठमोठाले किताब व पदकें दिलीं आहेत, व ज्या इतर सर्व लोकांनीं ह्या लढाईच्या संबंधानें आपलें कर्तव्यकर्म उत्तम रीतीनें बजाविलें आहे त्या सर्व इसमांस उत्तम प्रकारचीं बक्षिसें देण्यास हिंदुस्थान सरकार तयार आहे. ह्या प्रसंगीं राणी सरकारचे हुकुमावरून हिंदुस्थानांतील राजेरजवाडे व संस्थानिक आणि सरदार यांस आह्मी असें जाहीर करतों कीं, त्यांचें व त्यांच्या प्रजेचें कल्याण व्हावें अशी सरकारास मोठी इच्छा आहे. ह्या राजेरजवाड्यांची राज्यव्यवस्था उत्तम रीतीनें जगास जाऊन त्यांच्या प्रजेस सुख व्हावें ही गोष्ट राणी सरकारास फार आवडती आहे. राजेरजवाडे व संस्थानिक यांची योग्यता वाढून त्यांस फायदा व्हावा येवढीच फक्त इच्छा सरकारास आहे असें नाहीं, परंतु सरकारची आणखी अशीही पूर्ण इच्छा आहे कीं, ह्या राजेरजवाड्यांच्या रयतेस सुख मिळालें पाहिजे, व एखाद्या संस्थानचा मोठेपणा व संपत्ति पहाणें झाल्यास सरकार सदर्हू संस्थानिकांचे दरबाराचे थाटमाटावर अथवा त्यांचे सैन्याच्या उत्तम तयारीवर व वगैरेवर लक्ष न देतां त्यांची सर्व प्रजा उत्तम सुखांत व आनंदांत आहे किंवा कसें ह्या गोष्टीकडे लक्ष पुरवितें, व तदनुरूप सदर्हू संस्थानिकांच्या मोठेपणाची गणती करते वगैरे गोष्टी सर्वत्रांस स्पष्ट रीतीनें जाहीर होणें फार अगत्याचें आहे. आज ह्या दरबारांत जे राजेरजवाडे व सरदार जमा झाले आहेत त्यांनीं वर लिहिलेल्या गोष्टी लक्षांत ठेवाव्या, व त्यांनीं आपल्या वंशपरंपरेनें चालत आलेल्या संस्थानचा निरंतर कारभार पहावा, व हीं संस्थानें न्यायानें त्यांजकडे चालविलीं जातील, व त्यांनीं आपापले ताब्यातील रयतेची प्रीति संपादन करण्याच्या कामांत मोठ्या दक्षतेनें वागावें व आपल्या राज्यव्यवस्थेंत ज्या सुधारणा करणें फार अगत्याचें आहे, त्याही सुधारणा नियमित रीतीनें सुरू कराव्या; कारण एखाद्या संस्थानांत गडबड सुरू झाल्यास सरकारचा असा अभिप्राय होणार आहे कीं, सदर्हू संस्थानांतील राजव्यवस्था नीट रीतीनें चालत नाहीं. पंजाब इलाख्यांतील रयतेनें देशांतील शांततेपासून आपला चांगला फायदा करून घेतला, व अशा स्थितींत तिनें आपला राकटपणा व इतर लढाऊ गुण जाऊं दिले नाहींत. या गोष्टीबद्दल ह्या रयतेची मोठी शिफारस करणें फार जरूर आहे रयतेच्या एकंदर वर्तनाचें व मनोविकाराचें प्रतिबिंब त्यांच्या सैन्यांत दृष्टीगोचर होतें, व ह्या सैन्यानें आफगाणिस्थानांतील लढाईंत विलक्षण शौर्य व राजनिष्ठा वगैरे गुण दाखविले याबद्दल सरकार त्यांचें फार आभारी आहे. सरकारानें आजपर्यंत पंजाब प्रांतावर ईश्वराच्या दयेनें जे अनेक उपकार केले आहेत ते ह्या पंजाबी रयतेनें वरील वर्तनानें उत्तम रीतीनें परत केले असें समजलें पाहिजे.

---

मृत्यू— रा. रा. नारायण माधव परांजपे मुंबईच्या नेटिव आपिनियन पत्राचे अेडिटर मरण पावले हें कळविण्यास आह्मांस फार दुःख वाटतें. हे विद्वान्, नीतिमान, व मोठे सुशील होते. तसेंच जें वर्तमानपत्र त्यांनीं हातीं घेतलें होतें तें मोठें वजनदार असल्यामुळें त्यांची थोरवी सहज सर्वांच्या लक्ष्यांत येईल. असें उत्तम रत्न ४५ वर्षांच्या वयांत नाहींसें झाल्यामुळें आह्मांस अत्यंत खेद वाटतो. पण ईश्वरीइच्छेपुढें कोणाचा काय इलाज.

---

During the week a few more heavy showers of rain came down consummating its task of destriuction. We are informed that many fields of Jowaree in such places where hail fell have been so utterly destroyed as to be past redemption, the probable loss is variably estimated. Some fields towards the villages of Loni and Barling are simply spoiled. Except the wheat, the Rabi has not escaped unscathed for in some parts, the light grains have been carried away in the rush of waters caused by the rain, the rains have been pretty universal so far as this District is concerned But the injury is confined to such tracts as were visited by hail storms.

---

Many of our readers are aware that the Govt. Savings Banks were established in Berar in 1870, in only two Districts, namely, Akola and Oomraotee, numbering 401 and 402. But since of late they are established also in Bassim, Buldana, Ellichpur and Wun Districts of Berar, accordingly the banks are getting very popular indeed. The yearly rate of interest is also increased from Rs 3¾ to Rs 4 and one sixth per centum per annum. The Savings Banks are really great bleassings to the poor class of people!

Gunpatrao Assistant school Master of Paturda was tried before Mr Hare Assistant Commissioner of Akola and committed to the Sessions. The enquiry occupied a good deal of the magistrate's time.

---

The Akola Deputy Commissioner's Office was inspected by the Judicial Commissioner Colonel Bushby during the week. The inspection lasted three days and it may therefore be inferred that it was a very searching one.

---

The Viceroy's movements will probably be as follows: — On Monday, at four o'clock, His Excellency will hold a levee, to be followed by a review of all the troops in Bombay, including the gallant 66th Regiment, which suffered so severely at Maiwand. In the evening the noncommissioned officers and men of the regiment will be entertained at dinner, the Marquis of Ripon dining with the Commander-in-Chief. The next day (Tuesday) at 4-30 P. M., His Excellency will atten an amateur dramatic performance at St. xavier's College, and subsequently in the evening will be present at a statedinner at Government House, Parell, which will be followed by an evening party. The caves at Elephanta will be visited on Wednesday, and on Thursday His Excellency will proceed to Kirkee and inspect the Camp, and go from thence to Gunesh Kind, where there will be an evening party. Friday will be occupied in visiting the city of Poona, the Viceregal party returning to Bombay the same day by special train. Another state dinner will be held at Parell Government House the same night, followed by a ball. On Saturday morning at 10 30, the Viceroy will go to Calcutta. —*Times*.

---

NATIVE GIRLS at the Public Educational Examinations.—It is gratifying to notice that native girls have been gradually induced to present themselves for public examinations, either in connection with the University or for admission to the public service in Bombay Miss Buchoobai Rastamjee Master, a pupil of the Government Girl's School at Karelwady, recently submitted herself for the second class certificate of qualification for admission to the public service, and was the only Gujrati student who successfully passed the examination. It may be mentioned that Miss Bacnoobai also successfully competed for the scholarship offered to the native girls a few year ago by the late Miss Mary Carpenter. Another Parsee girl, the daughter of Mr. Dhunjeebhoy Nusserwanjee Wadia, presented herself at the Matriculation Examination of the Bombay University, held in the begining of last week.

*i. p,*

## वऱ्हाड

याही आठवड्यांत पावसाचा जोर पुष्कळ होता. गुरुवारीं मोठा पाऊस पडला. व शनिवारपर्यंत आकाश आभ्राच्छादित होतें परवापासून खुलावट आहे. उम्पा जोंधळ्याचें कोठें कोठें थोडें नुकसान झालें, पण रब्बीला फार चांगला पाऊस झाला असें ह्मणतात

---

शनवारीं ता० २० रोजीं अकोला म्युनिसिप्यालिटीची जनरल कमिटी भरली होती त्यावेळीं व्हाईस प्रेसिडेंट साहेबांनीं बजेट तयार केलें होतें तें वांचून मंजूर झालें. डिपुटी कमिशनर साहेबांकडेही ते पूर्वीं पाहण्यास पाठविलें होतें. कोंडवाडे फंडांतून सिविल स्टेशन खर्चाकडे ७,५०० रुपये मिळावयाचे तेव्हां प्रे. नीं बजेटमध्ये जमेस धरिले होते ती रकम मिळण्याविषयीं प्रेसिडेंट ह्मणजे डिपुटी कमिशनर यांनीं संशय घेतला व त्यावरून कमिटीनें ते रुपये न मिळाल्यास तितक्यापुरता दुसरा खर्च कमी करण्याविषयीं बजेटांत दुरुस्ती करावयाचें ठरविलें. सिव्हिल स्टेशनास मिळणारे जिल्ह्यांतील कोंडवाड्याचे फंडाचे पैशाबद्दल म्युनिसिप्यालिटी आणि डिपुटी कमिशनर यामध्यें प्रस्तुत वाद उत्पन्न झाला आहे. त्याविषयीं मागें आह्मी लिहिलें आहे त्याचा निकाल अजून झाला नाहीं. अस्तु. त्याविषयीं आणखी एक वेळ आह्मी सविस्तर लिहू. चालू सालचे म्युनिसिप्यालिटीचें बजेट कोंडवाडे फंड गाळाऊन केल्यास १९३०० रुपयांचें आहे व मागील शिल्लक ४२२३ रुपये आहे. त्यांत खर्च नव्या कामाकरितां ५००० रुपये, रिपेरीकरितां ६७५० रुपये, व इस्टाब्लिशमेंटकरितां ८९४८॥ रुपये घातला असून शिल्लक २७०४॥ रुपये राहील असें दाखविलें आहे.

---

जुडीशियल कमिशनर आफिसांतील हेडक्लार्क मि० जोन्स साहेब यानीं ३ महिन्यांची रजा घेतली त्यांचे जागेवर त्याच आफिसचे क्लार्क आफ धिकोर्ट रा. रा. भास्कर सखाराम जयवंत यांस नेमिलें व त्यांचे जागेवर इलिचपुरचे क्लार्क आफ धिकोर्ट रा. रा. वासुदेव सदाशीव पिंसाळकर यांस नेमिलें असें कळतें

---

रा. ब. नारायणभाई दांडेकर विद्याखात्याचे डायरेक्टर वऱ्हाडाचे कामाकरितां येथें आले आहेत. एक दोन दिवशीं प्रांतांत जातील.

---

कर्नल बेल साहेब कमिशनर यांची पत्नी शुक्रवारीं विलायतेस गेल्या. त्या निमित्तानीं युरोपियन मंडळींत मेजवान्या सुरू होत्या व मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. इ. यांना ही एक मेजवानी दिली.

---

मि० लक्ष्मीपती नायुडु बारिस्टर यांजवर उमरावतीस अब्रू घेतल्याचे संबंधानें मि. मरो साहेब लोकलफंड इंजिनियर यांनीं फिर्याद केली आहे.

---

जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी फिरावयास गेली. वाशीमाकडे जाऊन नंतर यवतमाळाकडे जाईल.

---

अगर येथें मयत देवाजी देशमुख याचे माणकी नावाचे स्त्रीनें जार कर्माच्या योगानें गर्भसंभव झाला होता व मूल उपजतांच त्याचा तिनें नाश केला त्याजबद्दल तिजवर मुकदमा होऊन तिला येथें आणिलें आहे.

---

नोटिस.

बाळाजी वल्लद एकोबा सुतार वस्ती मौजे जनुन तालुके खामगाव यास खालीं सही करणार इजकडून या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं मला पाटाची बायको करून आणल्यास ३ वर्षें झालीं असून रीतीप्रमाणें तुह्मी पुरुषांत नसून जनाचे रीतीप्रमाणें तुमचा माझा संबंध होत नसून प्रपंच होत नाहीं. तर तुह्मी आज तारखेपासून आठ दिवसांत मला फारकती द्यावी तसें तुह्मी न केल्यास तुह्मावर मी लग्नसंबंध तोडण्याबद्दल फिर्याद करून तुह्माकडून फिर्यादीचे खर्चासुद्धा भरून घेईन. कळावें तारीख २७ माहे नोवेंबर सन १८८० इसवी.

(सही) सनी मर्द बाजाळी सुतार
रहाणार निराड ता. खामगाव
निशाणी बांगडी.

---

वर्तमानसार.

इराण देशांत कुर्द लोक दंगा करीत आहेत. त्यांपैकीं पुष्कळांस जिवें मारिलें, जखमी केलें, आणि कैद केलें असून त्यांचा दंगा मोडण्याच्या कामीं इराणास मदत करण्यास आपण तयार आहों असें रशियानें कळविलें आहे. ने० ओ०

लाहोरमध्यें गवनर जनरल साहेबांची स्वारी निघाली असतां काश्मीरचे महाराज यांस घोडेस्वारांच्या मागें लहानसान सरदारांबरोबर स्वारींत जागा दिली होती ती त्यांस न आवडून स्वारींतून ते बाहेर निघाले.

भावलपूरचे नबाब यांस कमांडर आफ दि स्टार आफ इंडिया, आणि पतियाळा व पुर्थला येथील महाराजांस कंप्यानियन आफ दि स्टार आफ इंडिया अशा पदव्या दिल्या.

दीर्घायुष्य— बंगाल्यांत हरू बेबा नांवाची एक बाई मेली तिचें वय एकशें एकवीस वर्षांचें होतें. मरणाचे पूर्वीं सुमारें पांच तास तिला असमाधान झाल्यासारखें वाटल्यामुळें ती निजली व तेथेंच मेली असें स्टेट्समन वरून कळतें.

धरणीकंप — आस्ट्रियाच्या आग्नेयी दिशेस आग्राम प्रांतांत वारंवार धरणीकंप झाल्यामुळें तो प्रांत अर्धा जमीनदोस्त झाला म्हणून तेथील सुमारें दोन हजार लोक आपलीं घरें दारें सोडून पळाले. त्यांनीं परत येऊन पुनः शहर वसवावें म्हणून तेथील सरकार त्यांस पैशांची मदत करीत आहे व शहर नीट करण्याकारितां सुमारें १८०० मजूर लोक लावले असून पन्नास हजार गुलडेन खर्च करणार असें व्हायनाहून आलेल्या ता. १३ व १६ च्या तारेवरून समजतें.

रशियाच्या बादशहाच्या विरुद्ध खटपट करणाऱ्या निहिलिस्ट मताच्या लोकांपैकीं पांच असामींस फांशी दिलें आणि अकरा असामींस जीवंत असे तों पर्यंत खाणींत सक्त मजूरी करण्याची शिक्षा मिळाली. सु. प.

आयर्लंडांत पुन्हा एका जमीनदाराच्या एजंटाचा लिवरिक एथें खून झाला.

हिंदुस्थानची खानेसुमारी लवकरच व्हावयाची असल्यामुळें आपल्या ताब्यांतील सर्व आफिसरांनीं सदरहू कामांत मुलकी खात्यांतील कामगारांस मदत करावी असा कमांडर इन् चीफ यांजकडून त्यांस हुकूम फर्माविण्यांत आला आहे.

नुकताच सरकारांतून एक ठराव झाला आहे कीं, जमिनीचे धाऱ्याचा पैसा खिस्तीप्रमाणें वसूल न आल्यास पुढें दहा दिवस वाट पाहून जमीन एकदम सरकारांत खालसा करण्याची तजवीज होईल.

अपूर्व वेग— अमेरिकेंत विजेच्या योगानें गाड्या चालवितात त्यांचा वेग हल्लीं तासास ४० मैल आहे तो प्रत्येक तासास २०० मैल करण्याची तिकडे खटपट चालली आहे असें म्हणतात.

तुर्कस्थानांतील जमाबंदीच्या खात्यांत सुधारणा करण्यासाठीं सर्व राष्ट्रांच्या मतानें कमिशन नेमावें अशी इंग्लंडानें सूचना केली आहे.

आन. एल. आशबर्नर सी. एस. आय यांचो पांच वर्षांची मुदत भरल्यानंतर ते कौन्सलांतील जागा सोडून जातील आणि त्यांच्या जागीं हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरींनीं मि० टी. सी. होप यांस नेमिल्याचें कळतें.

चीन व रशिया यांजमधील तहाचा शेवट नीट रीतीनें होईल असें रशियाचें वर्तमानपत्र-अगेन्सरसी यांजवरून समजतें.

हें आमंत्रण किंवा वारंट?— भावलपुरच्या नबाबास लाहोरच्या दरबारास येण्याविषयीं आमंत्रण गेलें होतें परंतु आपली प्रकृति नीट नाहीं सबब दरबारास येववणार नाहीं असें नबाबांनीं कळविलें. त्यावरून पंजाबच्या गव्हर्नरांनीं मुलतानच्या सिव्हिल सर्जनास त्यांची प्रकृति तपासून येण्यास सांगितलें त्याप्रमाणें त्यांणी तपास करून नबाब दरबारास येण्यास योग्य नाहींत इतके आजारी आहेत असा रिपोर्ट केला. यांजवरून राजे रजवाड्यांविषयीं इंग्रज बादशहांची नजर किती बारीक आहे हें दिसून येतें.

मुंबईचे गव्हर्नर येत्या महिन्यांत काठेवाड प्रांतांत फिरण्यास जाणार आहेत. ते प्रथम १३ व्या तारखेस भावनगरास जाऊन १९ वीस रेल्वे चालू करण्याचा समारंभ करितील. आणि १६ वीस दरबार भरावितील. १७ वीस सोनपुरीस जातील तेथून पालिठाण्यास जाऊन शत्रुंजय पर्वतावर जातील नंतर सोनपुराहून रेल्वेनें जितपुरास जाऊन जुनागड एथें तेथील नबाबास ता. २० रोजीं भेटतील आणि २१ वीस गिरनार पर्वतावर जातील. २३ वीस गोंधळ एथें जाऊन २४।२५ आणि २६ हे तीन दिवस राजकोटास मुक्काम करितील आणि तेथें नवानगरच्या जाम साहेबांस भेटतील. तेथून धांगध्रास जाऊन तेथून वडवाणास येऊन रेल्वेमार्गें मुंबईस परत येतील.

वायव्य प्रांतांत यंदा पिकें फारच वाईट असल्यामुळें लोकांच्या निर्वाहाची पंचाईत आहे व पुष्कळ लोक एव्हांपासून बाह्य प्रदेशास जाऊं लागले आहेत.

दुलसिग्नो जवळ दरविश पाच्छा यांनीं तुर्की सैन्य तयार ठेविलें आहे.

तुर्कस्थानच्या जमाबंदी खात्याच्या सुधारणेसाठीं सर्व राष्ट्राच्या सल्लयानें कमिशन नेमावें अशी इंग्लंडानें सूचना केल्याचें मि० ग्लाड्स्टन यांनीं प्रसिद्ध केलें आहे.

इटाली देशांत भयंकर तुफान होऊन अतिशय नुकसान झालें.

काश्मीरच्या महाराजांच्या अमलांतील गिलजिट प्रदेशांच्या आसपासचे कांहीं पहाडी लोक बंडावा करूं लागले आहेत म्हणून त्यांस अटकाव करण्यासाठीं महाराजांच्या सैन्यांतील ७०० लोक घेऊन मेजर बिडल्फ गेले आहेत. बंडखोरांचा उद्देश महाराजांच्या अमलांतून निघून स्वतंत्र होण्याचा आहे.

गिझनीहून भरंवशालायख असें वर्तमान समजतें कीं गिल्झै लोकांनीं अबदुल रहमान यांच्या पक्षाचा अनादर करून याकूबखान आणि मूसाजान यांच्या पक्षास मिळण्याचा निश्चय प्रसिद्ध केला.

काशीचे पंडित आठवड्यांतून दोनदा "पीयूष सीकर" या नांवाचें वर्तमानपत्र काढण्याचा विचार करीत आहेत. जगांतील सर्व संस्कृत भाषाभिज्ञांनीं या पत्रास साह्य करावें अशी ते उमेद बाळगितात. इं प्र

नेटिव ओपिनियनचा हरद्याचा बा० म्ह० कीं:—" परवां जबलपूर मेल ट्रेनीनें येत असतां एका बाईनें तात्काल झालेलें मूल टेंभुरणी व हरदा या दोन स्टेशनामध्यें टाकलेलें सांपडलें. ह्या बाईसाहेब सेकंड क्लासांत बसल्या होत्या. कारण सांपडलेलें मूल रेल्याच्या बाजूस न सांपडतां मध्यें सांपडले. ईश्वरी चमत्कार अतर्क्य खरा ! पहा, जनन कोठून व मोचन सेकंड क्लासाच्या शौचालय द्वारें, हें बालक मेलेलें वजन करून पहातां १। शेर भरले. यावरून डाक्तर साहेब म्हणतात कीं नुकत्याच बाळंत झालेल्या स्त्रीचें असावें व पिंपळास प्रादिक्षणा घालून व नवस सायास करून लेकरूं मागण्याच्या बायां पैकीं हें स्त्रीरत्न नसावें आणि सेकंड क्लासांत बसून प्रवास करणारें असल्यामुळें फक्कड रंगेल असावें, व चोरीमारीचा गणपती असावा. एरवी मातृवात्सल्यापासून पराङ्मुख राहून राक्षसी मायेची व उलट्या काळजाची ही बाई नव्हती. असल्या मासलेवाईक रत्नाचा शोध चालला आहे.

रा० रा० विठ्ठलराव वासुदेव ऊर्फ अण्णा साहेब फडके तात्या महाराजांचे कारभारी यांस ता० १९ नोवेंबर सन मजकूर सोमवार रोजीं सायंकाळीं श्रीक्षेत्र नाशिक येथें देवाज्ञा झाली. हे गृहस्थ पुणें येथील सार्वजनिक सभेचे उत्पादकांपैकींच होते. यांचे मरणामुळें सार्वजनिक कामास बराच धक्का बसला असें म्हटलें असतां हरकत नाहीं.

थोडेच दिवसांपूर्वीं सर रिचर्ड टेंपल यांनीं बरमिंगहम् येथें मद्यपान निषेध या विषयावर व्याख्यान दिलें त्यांत त्यांनीं असें बोलून दाखविलें कीं, इंग्लंडांत मद्यपान करणारे इंग्रज लोकांची जितकी जास्त संख्या आहे तितकी परदेशीं मुळींच मिळावयाची नाहीं. त्यांहून पूर्वे-कडील देशामध्यें जे इंग्रज लोक आहेत, ते तर या दुर्व्यसनाचे संबंधानें फारच नियमित झाले-आहेत; शिवाय तिकडील लष्करी खात्यांतील लोकांमध्यें या संबंधानें फारच सुधारणा झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येतें.

सिंद व नाभा येथील राजांनी प्रत्येकीं ९०,००० रुपये प्रमाणें पेट्रियाटिक फंडास दिले.

इंग्लंडांत नुक्तेच एका ब्यांकेचें ३०००० रुपये किंमतीच्या नोटा घातलेलें एक पाकेट हरवलें व तें ज्यास सांपडलें होतें त्यानें तें आणून दिल्याबद्दल ब्यांकेनें त्यास १० रुपये बाक्षिस दिलें. केवढें औदार्य हें ! !!

एक तुर्की कामदार डुलसिनो सोडून देण्याच्या संबंधानें तयार केलेला जाहिरनामा वाचून दाखवीत असतां त्यास कोणी एकानें गोळी घालून ठार केलें. पु. वै.

---

## सुबोधसार.

भाग पहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारज्ञांस विशेषेंकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चांगली माहिती होऊन सामान्य पुरुषासही व्यवहारांत समयविशेषीं कसें बोलावें व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखें आहे हा ग्रंथ जाड कागदावर खिळेछापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ०।० आणे टपाल खर्च ०।०६ आह्माकडे पाठविल्यास पुस्तक ताबडतोब रवाना केलें जाईल. कळावें ता. २६ आक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

## जाहिरखबर

सर्वत्र लोकांस खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं कजबे जामोद तालुके जळगांव जिल्हे अकोले या गांवीं मयाराम छोटुलाल या नावची सावकारीची आमची दुकान असोन मयाराम हे मैत झाले आहेत. मयाराम याची वारीस बायको चवथी बाई जवजे मयाराम ही असून तिचा नवरा म्हणजे मयाराम हा मैत झाल्यावर दुकानचें नांव जें पूर्वीं मयाराम नथमल या नावचें होतें तें बदलून वर तिनें नांव मयाराम छोटुलाल दाखविलें आहे तें ठेऊन आपले तर्फे दुकानेंचे काम करण्यास व इस्टेटीची व्यवस्था पहाण्यास नौकर या नात्यानें छोटुलाल नंदराम मारवाडी याजला नेमिलें होतें व त्या नौकराचें वर्तन वगैरे चांगलें दिसल्यावर त्याजला कुल्मुखत्यार पत्र देण्याचें ठरविलें होतें पण सदर्हु नोकर छोटुलाल ऱ्याणें बाईच्या मर्जी प्रमाणें न वागतां कपट करून मला मैताचे बायकोनें दत्तक घेतलें आहे व मी मालक आहे असें सर्वत्रास खोटें भासवून आपला बराच फायदा करून घेतला ही गोष्ट आमची मालकीण चवथी बाईचे जेव्हां समजण्यांत आली तेव्हांच अशा कपटी मनुष्यास तिणें आपले दुकानावरून काढून दिलें आहे व मजला कुलमुखत्यारपत्र दिल्यावरून हल्लीं मी त्या दुकानचें सर्व काम पाहात आहे. बाई तर्फे सर्व दुकानची व्यवस्था पाहाण्याचा अधिकार मला असल्यामुळें मी बाईच्या आज्ञेनें सर्वत्रास असें कळवितों कीं ह्या नोटिसीचे तारखेपासून आमचे दुकानच्या संबंधानें ज्याज्या लोकांकडेस आमचें घेणें असेल त्यात्या इसमांनीं सदर्हु काढून दिलेला छोटुलाल मारवाडी यास कांहीं एक पैसा देऊ नये किंवा त्याची पावती घेऊ नये त्याचा या दुकानासी अर्थाअर्थीं कांहीं संबंध राहिला नाहीं व त्याजला बाईनें दत्तकही घेतला नाहीं. ह्या नोटिसी नंतर जो कोणी असामी आमचे दुकानचे संबंधाचा पैसा छोटुलाल याजला देईल तर तें देणें आमचे घेण्यांत मजुरा धरलें जाणार नाहीं व कायदेशीर होणार नाहीं. त्याची सर्व जबाबदारी सदर्हु इसमास पैसा देणारावर राहील. सारांश ह्या नोटिसी नंतर छोटुलाल यासी आमचे दुकानचे संबंधानें जो म्हणून कांहीं व्यवहार होईल तो सर्व निरर्थक समजण्याचा आहे तसेंच ज्या ज्या व्यापारी अगर शेटसाहु लोकांचें आमचे कडेस घेणें असेल त्यांणींही ह्या नोटिसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आंत खाली सही करणाराकडे कजबे जामोद या गांवीं आमचे दुकानीं येऊन आपलें घेणें रुजू करून घ्यावें तसें न केल्यास नोटिसीच्या मुदती नंतर जर कोणी आपले घेण्याचें मागणें करील तर त्यांचे घेण्याबद्दल आह्मी बिलकुल जबाबदार होणार नाहीं व त्याची जबाबदारी आह्मावर राहाणार नाहीं कळावें तारीख २० माहे नोवेंबर सन १८८० इ०

( सही ) गणेशदास शालिग्राम
मारवाडी मुकत्यार निसबत चवथी बाई.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवर तारीख २९ माहे नोवेंबर सन १८८० इसवी अंक ४७

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

## लोहमार्ग

अथवा.

## मराठी आगगाडी.

( ९० आकृती )

मुख्यत्वेंकरून रेल्वेकडील लोकांकरितां व ज्यांस शास्त्रीय विषयाची अभिरुची आहे अशांकरितां आगगाडीच्या विशेष माहितीचें मराठी भाषेंत नवीन पुस्तक. किंमत २ रुपये आणि टपाल खर्च ४ आणे. पुस्तकें मुंबईंत इंदुप्रकाश छापखाना. गोपाळ नारायण आणि कंपनी काळबादेवीचा रस्ता, आणि पुण्यांत ज्ञानप्रकाशांत रोख किमतीस ता० १९ नोवेंबर पासून विकत मिळतील.

विशेष सूचना — सदर विषय इतर देश भाषांतून प्रसिद्ध व्हावा व तशा कृत्यास सदर पुस्तकापासून यत्किंचित् मदत व्हावी ह्मणून ह्या पुस्तकांत, उर्दू हिंदी आणि गुजराथी टाइटल व अनुक्रमणिका हीं घातलीं आहेत. शिवाय मराठी मुळाक्षरांस तारायंत्रद्वारें ( इंग्रजी मुळाक्षरांप्रमाणें ) पाठवितां यावें ह्मणून तारायंत्राच्या खुणा बसवून घातल्या आहेत.

विष्णु चिमणाजी कर्वे,
स्टेशनमास्तर सनावद.
होळकर स्टेटरेलवे.

## नोटिस

हरकिसन नंदराम मारवाडी दुकान कजबे सुनगाव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, कजबे सुनगांव या गांवी मयाराम छोटुलाल या नावाची आमचे मालकीची दुकान असून दुकानची मालकीण चवथी बाई इजकडून आजपर्यंत छोटुलाल नंदराम हा काम पहात होता व प्राणें आपले तर्फेनें तुह्मास कजबे मजकूरचे दुकानावर व्यवस्था पहाण्यास नेमलें असून तुह्मी त्या दुकानची वहीवाट करीत अहात परंतु ज्या छोटुलाल यार्णे तुह्मास नेमिलें होतें त्याणें मालकीण चवथी बाई इसी कपट करून व लोकांस मला दत्त घेतलें आहे व मीच मयाराम छोटुलाल या नावाचे दुकानचा मालक आहे असें खोटें भासवून आपला बराच फायदा करून घेतला हें त्यांचें कपट उघडकीस आल्यावरून मालकीण बाईनें त्याजला काढून टाकिलें आहे व त्याचा ह्या नोटिसीचे तारखेपासून आमचे दुकानाशी कांहीं संबंध राहिला नाहीं सबब तुह्मास असें कळविण्यांत येतें कीं, तुह्मी आमचे संमती खेरीज छोटुलाल यांजला कांहीं पैसा किंवा कागदपत्र देऊं नये. मालकीण बाईनें आह्मांस कुलमुकत्यारपत्र देऊन सर्व दुकानाच्या व्यवस्था पाहण्याविषयीं नेमिलें आहे व त्याप्रमाणें हल्लीं आह्मी पहात आहो करितां तुम्हास असें कळविण्यांत येतें कीं नोटिशीचे तारखेपासून १२ दिवसांचे आंत सदरील दुकानचा हिशेब व कागदपत्र आह्मास कजबे जामोद यां गांवीं आमचे दुकानावर येऊन समजून द्यावे व हिशेब आणि कागदपत्र समजून देईपावेतो दुकानचे संबधानें ज्या लोकांकडून घेणें असेल तें तुह्मी वसूल करूं नये व कोणास कर्जही देऊं नये. नोटिशी नंतर जो तुह्मी व्यवहार कराल त्याची सर्वस्वी जबाबदारी तुमच्या जातीवर राहील. मुदतीप्रमाणें कागदपत्र व हिशेब तुह्मी न समजून दिल्यास मुदत पुरी झाल्यावर या नोटिशीचे खर्चासुद्धा तुम्हावर सिरस्तेप्रमाणें दिवाणी कोर्टांत तजवीज केली जाईल कळावें तारीख २० माहे नोवेंबर सन १८८० इसवी.

गणेशदास शाळिग्राम मारवाडी मुकत्यार
निजबत चवथी बाई.

## नोटिस.

छोटुलाल नंदराय मारवाडी राहणार कजबे जामोद तालुके जळगांव जिल्हे अकोले यांत खाली सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं कसबे जामोद या गावीं आमचे मालकीची साहुपणाची दुकान मयाराम छोटुलाल या नावाची असोन मयाराम याची बायको चवथी बाई इजकडून दुकानचे काम करण्यास व व्यवस्था पहाण्यास तुम्हास नवकर ठेविलें होतें व तुमची वर्तणुक विश्वासूपणाची या चार महिन्यांनीं कळून आल्यावर तुम्हास कुलमुकत्यारपत्र देण्याचा बाईचा असलेला विचारही तिनें तुम्हास कळविला होता. त्या शर्तींवर तुम्ही नौकर राहिला असून पुढें बाईशी कपट करून खोटेच सर्व लोकांस मला बाईनें दत्तक घेतलें आहे व मीच आतां सर्वस्वी मालक झालों या प्रमाणें भासवून तुम्ही आपला फायदा करून घेतला. तुमचें नावाशी आणि आमचे दुकानचे मयाराम छोटुलाल या नावाशीं संबंध मिळाल्यामुळें कदाचित लोकांसही तुमचें ह्मणणें खरें भासण्याचा संभव आहे पण हें तुमचें कपट उघाडकीस लवकरच आल्या कारणानीं सदर्हु मालकीण बाईनें तुम्हांस नवकरीवरून दूर करून मला मुकत्यारपत्र देऊन दुकानचे संबंधानें व्यवस्था पहाण्यास व काम करण्यास नेमिलें आहे. व मी हल्लीं पहात आहे आणि तुह्मास सर्व दुकानचें घेणें देण्याचे संबंधाचा हिशेब व कागदपत्र मला समजून देण्याविषयीं सांगितलें असतां त्याप्रमाणें अद्याप पावेतो तुह्मी केलें नाहीं. सबब या नोटिसीनें मुद्दाम खर्च करून तुह्मास कळविणें भाग झालें आहे तर नोटिसीचे तारखेपासून १९ दिवसांचे आंत तुह्मी सर्व दुकानचा हिशेब आणि कागदपत्र समजून द्यावे व दुकानचे संबंधानें लोकांकडून घेणें असलेला आमचा पैसा तुह्मी बिलकूल वसूल करू नये व कोणाचे देणें असेल तर तें तुह्मी देऊं नये. तुमचा अर्थाअर्थी कोणत्याही रितीनें आमचे दुकानासीकारभार करण्याचे बाबतींत कांहीं एक संबंध राहिला नाहीं हें पक्कें समजावें आणि या नोटिसींतील मुदतींत सांगितल्याप्रमाणें तुह्मी तजवीज न केल्यास नोटिसीची मुदत पूर्ण होतांच या नोटिसीचे खर्चासुद्धां तुह्मावर दिवाणी आणि फौजदारी कायद्याप्रमाणें आह्मांस तजवीज करणें भाग पडेल. कळावें तारीख २० नोवेंबर सन १८८० इसवी.

( सही ) गणेशदास शाळिग्राम मारवाडी
मुकत्यार निसबत चवथीबाई.

## नोटिस

चुनीलाल चैतराम मारवाडी दुकान कसबे जामोद तालुके जळगाव जिल्हे अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं कसबे मजकुरीं आमची दुसरी दुकान साहूपणाची मयाराम छोटूलाल या नावची आमचे मालकीची असून दुकानची मालकीण चवथीबाई इजकडून आजपर्यंत छोटुलाल नंदराम हा काम पहात होता. व त्याणें आपले तर्फेनें तुह्मास कसबे मजकूरचे दुकानावर व्यवस्था पहाण्यास नेमलें असून तुह्मी त्या दुकानची वहिवाट करीत आहात परंतु ज्या छोटुलाल याणें तुह्मास नेमिलें होतें त्याणें मालकीण चवथीबाई इसी कपट ककन व लोकांस मला बाईनें दत्तक घेतलें आहे व मीच मयाराम छोटुलाल या नावचे दुकानचा मालक आहे असें खोटें भासवून आपला बराच फायदा करून घेतला. हें त्याचें कपट उघडकीस आल्यावरून मालकीणबाईनें त्याला काढून टाकलें आहे व त्याचा या नोटिसीचे तारखेपासून आमचे दुकानाशी कांहीं संबंध राहिला नाहीं सबब तुह्मास असें कळविण्यांत येतें कीं तुह्मी आमचे संमती खेरीज छोटुलाल याला कांहीं पैसा किंवा कागदपत्र देऊं नये. मालकीणबाईनें आह्मांस मुकत्यारपत्र देऊन सर्व दुकानाच्या व्यवस्थ पहण्याविषयीं नेमिलें आहे व त्याप्रमाणें हल्लीं आह्मी पहात आहो करितां तुह्मास असें कळविण्यांत येते कीं नोटिसीचे तारखेपासून १९ दिवसांचे आंत सदर्हू दुकानचा हिशेब व कागदपत्र आह्मांस कसबे जामोद या गावी आमचे दुकानावर येउन समजून द्यावें व हिशेब आणि कागदपत्र समजून देईपर्यंत दुकानचे संबंधानें ज्या लोकांकडून घेणें असेल तें तुह्मी वसूल करूं नये व कोणास कर्जही देऊं नये. नोटिसी नंतर जो तुह्मी व्यवहार कराल त्याची सर्वस्वी जबाबदारी तुमच्या जातीवर राहील. मुदतीप्रमाणें कागदपत्र व हिशेब तुह्मी समजून न दिल्यास मुदत पुरी झाल्यावर या नोटिसीचे खर्चासुद्धां तुह्मावर सिरस्तप्रमाणें दिवाणी कोर्टांत तजवीज केली आईल कळावें, तारीख २० नोवेंबर सन १८८० इसवी.

( सही ) गणेशदास शाळिग्राम मारवाडी
मुकत्यार निा. चवथीबाई

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. खाली लिहिलेला मजकूर छापण्याची मेहरबानगी करावी.

मनुष्यानें कोणतीही गोष्ट पाहिली नाहीं तोंपर्यंत अभाव असतो. मी या तालुक्यांत येऊन बरेच दिवस झाले परंतु नजिकचे कारंजें शहर पाहिलें नव्हतें तें पहाण्याचा प्रसंग थोडे दिवसांपूर्वीं आला. कारंजा ( बीबी ) या दोन्ही नावानी ते शहर प्रसिद्ध आहे. याची वस्ती ११००० लोकांची आहे. पहाण्यासारखें काय तें तलाव आणि विठ्ठलमंदीर रा. रा. तुकारामजी काण्व सावकारानी बांधलें आहे. त्याजमध्यें मुशाफर लोक रहाण्यास सर्व प्रकारच्या सोई केल्या आहेत आणि जागाही रमणीय असून स्वच्छ आहे दवाखाना, शाळागृह, पोलिस स्टेशन, आनररी मॉजिस्त्रेट कोर्ट, स्टांप वेंडर आणि रेजिस्ट्रेशन इतके कारखाने असून श्रीमान गृहस्थ बरेच आहेत. हवेल्या मोठमोठाल्या आहेत गावा भोंवतालचें कुसूं पडलें आहे फक्त त्यांतील चिरेबंदी मोठमोठाले दरवाजे आपली पूर्ण शोभा दाखवित आहेत परंतु त्यांच्या बरोबरीच्या भिंती पडल्या असल्यामुळें विशोभित दिसतात. सरकारी शाळा फार दिवसांपासून भरभर टींत आहे परंतु आलिकडे एक गावठी शाळा थोडे दिवसांत सुरूं झाल्यामुळें मुलांची संख्या बरीच कमी झाली आहे. गांव डोंगराच्या पायथ्याशी वसलेला आहे आणि लांबट वस्ती असून सुशोभित दिसत नाहीं. इतके असून स्वच्छता फारच कमी आहे. अशा ठिकाणी स्वच्छता कमीं असणें हें गैर आहे.

स्वच्छता या विषयावर आलिकडे बरेच वादविवाद सुरू आहेत. परंतु कोणत्या प्रतींतल्या लोकांस तें लागूं आहेत. आपल्या लोकांमध्यें चार प्रकार आहेत, श्रीमान, गर्भश्रीमान, मध्य स्थितींतले लोक आणि कनिष्ठ प्रतींतले लोक. आतां कनिष्ट प्रतींतल्या लोकांच्या स्थितीबद्दल विचार केल्यास वाचकांस मार्गे आढळले असेल आणि पुढें नेहमीं आढळेल ; कीं, कित्येक लोकांस पोटभर

दोही वेळा शुद्ध भाकर आणि चटणी देखील मिळणें मुष्कील अशा लोकांमध्यें स्वच्छता ती काय आणि ती कशी राखावी हें त्यांस समजून त्याप्रमाणें अम्मलबारी होण्यास कित्येक युगेंही पुरणार नाहींत. कोणी ह्मणतात घाणेवर निजावें, कोणी म्हणतात कीं अंथरुणावरील कपडा वारंवार बदलावा म्हणजे अंगांतील द्रव लागून कपडा खराब होतो व त्याच्या वासापासून प्रकृती बिघडती. आतां ज्याला पांघरण्याला आणि अंथरण्याला एक कांबळच असतो. त्याणें जर ती दूर केली तर त्यास ईश्वरानें निर्माण केलेली पृथ्वीच काय ती मिळणार. कळावें. तारीख १५—११—८० इ० मुक्काम कामरगाव.

एक फिरस्ता क्ष.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

विनंती विशेष— मौजे भालेगांव प्रगणे मेहकर ऐथें पुंजाजी निकम याची लेक गरोदर होती तिला प्रथम मुलगी झाली नंतर नाग सुमारे २ हात बाहेर आला व बाकीचा भाग आंत होता इतक्यांत जवळच्या बायका फार घाबरून त्यांनीं सदर्हु प्रसंग सर्वांस कळविला. बाळंतीण त्या वेदनेनें व दहशतीनें लागलीच मरण पावली. त्यापूर्वीं नागास ओढून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु निघेना शेवटीं तुकडे करून काढिला.

एथें मे. डे. क. सा. जिल्हा बुलढाणें यांची स्वारी ८—१० दिवस राहून लोणारच्या तलावाचा लिलांव तारीख १७ रोजीं करून जानेफळास गेली. यांची काम करण्याची शैली फार उत्तम आहे. नवीन आलेले तहशीलदार रा. रा. परशराम गणेश आपले कामांत फार हुशार असल्यामुळें सर्व रयत यांच्यावर फार खुष आहे, व हेच कायमचे होऊन राहोत अशी इच्छा करितें. शाळेची स्थिती उत्तम प्रतींत आहे. एथें लायब्ररी चालू सालचे आरंभास स्थापन झाली त्या दिवसापासून एथें बरींच पत्रें येतात. दवाखाना उत्तम प्रतींत असून त्या खात्याचे वरिष्ठ अधिकारी तपासणी करून खुष होऊन गेले. हें डाक्टर यांस भूषणार्ह आहे.

तासगावकर नाटककार मंडळी सुमारें ३॥ महिने येथें होती. त्यांनीं बरेच खेळ केले. व त्यांचे लोकप्रियतेमुळें सरकारी व गावकरी मंडळीचे साह्यानें उत्पन्नही बरेंच झालें. सदर्हू मंडळींत जानकी ऊर्फ ताईथत्तीण या नावाची एक स्त्री आहे. ती आपले कामांत फार उत्तम आहे. व त्याचप्रमाणें आणखीही कांहीं पात्रें बरीं आहेत. नाटकाचे मालक रा. रा. विष्णु बाबाजी साठे हे अल्पवयीं असून देशावराबर फिरत असतां हरएक ठिकाणीं लोकप्रियता मिळवितात हें त्यांस भूषण आहे.

एथें पोष्टमास्तर रा. रा. बामन सखाराम ह्मणून आहेत. हे विद्वान् असून लोकप्रिय आहेत यांनां पगार फार कमी आहे. पूर्वी १० रुपये होतां ह्मणून ऐकतो. त्याकडे लक्ष दिलें ह्मणजे ( सतीच्या दारीं काळ्या व शिंदळीच्या दारी हत्ती ) या ह्मणीचें स्मरण होतें. पूर्वी यांच्यावर चिखलीच्या मंडळीनें बरेंच सुदर्शनास्त्र टाकिलें होतें परंतु अपिलांत चौकशीअंतीं निर्दोष ठरले त्यामुळें मेहकर एथें कामावर पूर्वीप्रमाणें नेमून पाठविले यांची काम करण्याची शैली फार उत्तम आहे. रजिस्टरें बंग्या व मनिआर्डरी वगैरेच्या कामांत लोकांस यांच्यापासून बिलकूल त्रास नाहीं. एथें चीफ कानस्टेबल हुशार असून स्वभावानें फार सालस आहेत. मे. पोलिस इन्स्पेक्टर साहेब तर पहिले प्रतीचे हुशार असून गुन्हे तपासांत आणण्याची शैली यांचे अंगीं उत्तम-प्रतीची आहे. टौन पोलिसापासून रयतेस त्रास आहे पण उभयता वरिष्ठ चांगले असल्यामुळें रयतेस त्रासाची व्हावी तसी इजा होत नाहीं. एथें सार्वजानिक कामासाठीं कांहीं शेतीचे नंबर पूर्वीं सर्वानुमतें गुरें चारण्याकरितां रा- रा. हणमंत रामचंद्र तहशिल्दार यांनीं पोक्त, प्रामाणिक व सत्यवादी रा. रा. जीवनराम शेट मारवाडी पाहून त्यांचे नांवें करून दिले. व त्यांचा पैसा तितक्यापुरता अंशाप्रमाणें वसूल करावा असें ठरले होते व त्यांनीं कबूल केलें होतें. त्याप्रमाणें बरेच दिवस वहिवाट जारी होती परंतु अलीकडे त्यांचे सत्य जबानीकडे लक्ष न राहतां बराच पैसा ते वसूल करितात. त्यामुळें गरिबगुरिबास व प्रजाशास पुष्कळ त्रास होतो. इकडे त्यांनीं लक्ष द्यावें अशी त्यांस सूचना आहे, कमेटीकडे असलेले लोक संभावित आहेत परंतु त्यांस विद्येची कमताई असल्यामुळें कमेटीचे नियमाकडे त्यांचें लक्ष बरोबर पोचत नाहीं त्यायोगें व्हावीं तशीं कामें किंवा विचार त्यांचे हातून होत नाहींत; करितां त्यांचेचे दर्ज्याचे नवीन शिकलेल्या पैकीं कांहीं इसम शरीक करणें उचित आहे.

पत्रविस्तार फार झाला सबब पुरें करितों पुन्हा दुसरे वेळेस भेट घेईन. लोभ असावा, ही विनंती. कळावें तारीख २४ नोवेंबर सन १८८० इसवी. मुक्काम मेहेकर.

पिशाच्य.

---

## वऱ्हाडसमाचार.

मिति कार्तिक वद्य १२ शके १८०२

---

## व्हाईसराय साहेब.

लार्ड रिपन साहेब हिंदुस्थानचे व्हाइसराय शनिवारीं पहाटस मुंबईस येणार होते. व पुढें ते काय काय करणार याविषयीं टाइम्स मध्यें लिहिलें आहे तें असें:—

सोमवारीं ४ वाजतां लेव्हि ह्मणजे धुळभेटीचा समारंभ होईल. नंतर पलटणीची कवाईत होईल. सायंकाळीं अफगाणिस्थानांतून आलेल्या ६६ व्या पलटणीच्या आफिसर लोकांच्या मेजवानीचा समारंभ होईल. मंगळवारीं तिसरे प्रहरीं सेंटझवियर कालेजांत नाटक होईल. संध्याकाळीं परळावरील सरकारी बंगल्यावर मेजवानी होईल. बुधावारीं घारापुरीची कोरीव लेणीं पहाण्यास जातील. गुरुवारीं पुण्यास येतील. व खडकी एथें पलटणीची कवाईत होईल व संध्याकाळीं गणेशखिंडीवर सरकारी बंगल्यांत मेजवानीचा समारंभ होईल. शुक्रवारीं पुणें शहर पहातील. व त्याच दिवशीं मुंबईस परत जातील. व तेथें दुसरा सरकारी मोठा खाना व बाल होईल. आणि शनिवारीं सकाळीं १०॥ वाजतां स्पेशियल गाडीनें निघतील ते सोमवारीं तिसरे प्रहरीं ४॥ वाजतां कलकत्यास जाऊन दाखल होतील असें समजलें आहे.

---

## ह्मैसुर.

दक्षिण हिंदुस्थानांत ह्मैसूर प्रांत असून तेथें नेटिव राज्य असतां कांहीं कारणानें इंग्लिश सरकारानें तें राज्य आपल्या व्यवस्थेखालीं घेतलेलें आहे. त्याला सुमारें ४८ वर्षे झालीं. तें राज्य विलायतेंस पुष्कळ खटपट केल्यावरून तेथील राजास परत द्यावें असा ठराव कित्येक वर्षांपूर्वीं झालेला आहे पण त्याची अंमलबजावणी झालेली नाहीं. हल्लीं तेथील राजपुत्र वयांत येण्याचा सुमार झाला व त्याला इंग्लिश सरकार लवकरच राज्यपदाभिषीक्त करणार आहे. हें ऐकून सर्वांस संतोष झाल्यावाचून रहाणार नाहीं तेथील चिफ कमिशनर मि. गार्डन साहेब आतां लवकरच कलकत्यास जाणार आहेत. तेथें व्हाइसराय साहेबांची भेट घेऊन राज्य स्वाधीन करण्याचा प्रकार व दिवस ठरवितील. युरोपियन व युरेशियन कामदार हल्लीं तेथें पुष्कळ आहेत त्यांस मोठी काळजी पडली आहे कीं नेटिवांचें राज्य झाल्यावर आपल्या नोकऱ्यांचें काय होईल ? नेटिव तरुण विद्वान् लोक स्वराज्यांत गोठाल्या हुद्यावर नेमावे असा त्या दरबारचा विचार आहे व तो फार चांगला आहे. चीफ कमिशनर हे मग रेसिडेंट होऊन रहातील व कुर्ग प्रांताचा कारभार त्यांकडे राहील. बंगलोर शहर ह्मैसूर प्रांतांत असून तेथें युरोपियन वस्ती मोठी आहे व तेथील हवा पाणी चांगलें आहे. तें इंग्लिश अधिकारांतून जाऊ नये अशी खटपट चालू आहे व त्याप्रमाणें घडेल असें इंग्लिश वर्तमानपत्रांचे बातमीदार लिहित आहेत. असो. चीफ कमिशनर साहेब कलकत्याहून परत आले ह्मणजे सर्व गोष्टींचा चांगला खुलासा होईल व तो आह्मी आपले वाचकांस कळवू.

---

## लाहोरच्या दरबारांतील भाषण.

व्हाईसराय साहेबांनीं १५वे तारखेस लाहोर एथें मोठा दरबार भरविला होता. व तेथें राजे, संस्थानिकं वगैरे बहुत जमले होते त्या प्रसंगीं व्हाइसराय साहेबांनीं भाषण केलें तें:—

पंजाबांतील महाराज, राजे, संस्थानिक आणि इतर सभ्यगृहस्थहो, आह्मी हिंदुस्थानांत कामावर येऊन थोडेच दिवस झाले इतक्यांत आपणा सर्वांच्या या राजधानीं शहरांत भेटी होण्याचा सुसमय प्राप्त झाला याजबद्दल आह्मांस फार संतोष वाटतो. आपणांतून कित्येकांचा व आमचा पूर्वींच परिचय झाला आहे व कित्येकांच्या आजच भेटी झाल्या तरी या प्रसंगाच्या या लाभाबद्दल आह्मी सर्वांचे आभारी आहो. आह्मी या प्रांतांतून फिरत असतां सुवृत्तेची व सुधारणुकेचीं पुष्कळ चिन्हें आह्मांस दिसून आलीं व बहुत लोकांनीं स्नेहभावानें व प्रीतीनें आमचा आदरसत्कार फार चांगला केला. येणेंकरून आह्मांस परम संतोष झाला. आपल्या हिंदुस्थान देशाचें सर्व कल्याण या देशांतील जमीनीच्या स्थितीवर व त्या जमीनीपासून आपला फायदा करून घेणार लोकांचे स्थितीवर बहुतांशीं अवलंबून आहे. ह्मणून त्या दृष्टीनें या प्रांतांतील स्थिति फार समाधानकारक आहे असें दिसून आह्मांस फार संतोष झाला. राज्यकर्त्यांकडून या कामांत जितकी जनर पोंचविणें अवश्य आहे तितकी या प्रांतांत पोचून गेली असल्याचें आह्मी सर्वांस कळवितों. पंजाब प्रांतांतील सर्व जिल्ह्यांत जमीनीचे दर फार विचारानें व काळजीनें ठरविण्यांत आले आहेत व ते योग्य रीतीचे आणि योग्य काळपर्यंत चालणारे आहेत ह्मणून त्या योगानें शेतकीची स्थिति सुधारून सर्व देशाची संपत्ती व उद्योगी लोकांचा हुरूप वाढण्याचा संभव आहे. वायव्य प्रांताचे सरहद्दीवरील जमीनीचे धारे ठरविण्याच्या कामाकडे पंजाब सरकारानें विशेष लक्ष दिलें आहे; कारण सदर्हू ठिकाणचे राजेरजवाडे व संस्थानिक यांणीं सरकारची जी कामगिरी उत्तम रीतीनें बजावली आहे त्या कामगिरीबद्दल त्यांचे उपकार फेडणें जरूर आहे.

पंजाब इलाख्यांतील लोखंडी सडका पुष्कळ वाढल्या असल्यामुळें शेतकी व व्यापार यांचा फायदा झाला पाहिजे. हल्लीं ह्या इलाख्यांत दोन लोखंडी सडका असून त्यांपैकीं एकीचें काम पुरें झालें आहे, व ह्या सडकेनें सर्व इलाख्याचा संबंध समुद्राशीं जोडला गेला आहे. दुसऱ्या सडकेचें काम सुरू असून ती सर्व इलाख्याचा संबंध पेशावर शहराशीं जोडणार आहे, व यामुळें मध्य एशियाखंडांतील सर्व व्यापार ह्या हम रस्त्यानें चालेल असें समजलें पाहिजे. ह्या दोन लोखंडी सडका पंजाब इलाख्यांतील दुरदूरच्या जिल्ह्यांत जाऊन पोंहोचल्या असल्यामुळें राज्याचें संरक्षण चांगल्या प्रकारें होत असून अतस्त दळणवळणही फार वाढलें आहे.

पंजाब इलाख्यांतील सर्व प्रकारच्या रयतेंत विद्येचें पाऊल हळू हळू पुढें सरत आहे, व रयतेस विद्येची अभिरुचि असून तिचें ग्रहण करण्यास रयतेस मानासिक शक्ति आहे, ह्या गोष्टी ऐकून आह्मांस फार संतोष झाला. चांगल्या प्रकारची विद्या शिकण्याचा जो मुख्य व खरा हेतु आहे तो मागें न पडतां विद्येपासून अपापसांत फरक पडणार नाहीं व परकीय गोष्टींची हौस फाजील रीतीनें न वाढतां सर्व रयत एक विचारानें विद्या शिकून आपली सुधारणा करील, व आपल्या देशभाषेंत जो चांगुलपणा आहे तो कायम ठेवून त्याची वृद्धि करील अशी आह्मास आशा आहे. पंजाब इलाख्यांत ज्या ज्या गोष्टी आह्मी पाहिल्या त्याजवरून आह्मास असें वाटत आहे कीं संस्थानिक राजेरजवाडे व सरकार या उभयतांचा परस्परांवर भरंवसा अधिक बसत असून एकमेकांचे संबंधानें प्रीतिभाव अधिक जडत आहे, व केसर हिंद यांच्या संबंधानें ह्या राजेरजवा-